UNIVERSAL LIBRARY

OU_192564

UNIVERSAL LIBRARY

# करमणुकीची निबंधमाला

संग्राहिका

श्री. रमाबाई आपटे

सोल एजंट:

केशव भिकाजी ढवळे

गिरगांव, मुंबई ४.

सन १९३५] प्रथमावृत्ति [शके १८५६

किंमत १२ आणे

हें पुस्तक रा. **अनंत विनायक पटवर्धन**, बी. ए.,
यांनी **आर्यभूषण छापखान्यांत** घ. नं. ९३३।७
पेठ भांबुर्डा, पुणें येथें छापून प्रसिद्ध केलें.

# प्रकाशकाचे दोन शब्द

आज के. **हरिभाऊ आपटे** यांच्या १६ व्या मृत्युतिथिदिनानिमित्त नवीन एखादें छोटें पुस्तक त्यांच्या **करमणूक** पत्रांत प्रसिद्ध झालेल्या लिखाणांतील वेंचक उताऱ्यांचें प्रसिद्ध करावें, अशी त्यांच्या कुटुंबानें इच्छा व्यक्त केल्यावरून **करमणुकीची निबंधमाला** श्रीमती रमाबाई आपटे यांनी संग्रहित केलेली प्रसिद्ध करण्यांत येत आहे, तिला बृहन्महाराष्ट्रांतील वाचकवर्गाकडून योग्य आश्रय मिळेल अशी आशा आहे.

आज प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांत ज्या निबंधांचा समावेश केला आहे ते सर्वच **हरिभाऊं**च्या लेखणींतून उतरले आहेत अशी ग्वाही आम्हांस देतां येत नाहीं; तथापि त्यांच्याकडे आलेल्या अनेक लेखांतून निवडून काढून त्यांना ते आपल्या **करमणुकीं**त प्रसिद्ध केले आहेत, यावरून त्या लिखाणाची किंमत बऱ्याच वरच्या दर्जाची आहे असें या पुस्तकाच्या वाचकांना आढळून येणार आहे. यांत **हरिभाऊं**च्या हातचेहि अनेक निबंध आहेत असें दिसून येणार आहे. **हरिभाऊ** आपल्या **करमणुकी**च्या वाचकांचें मनरंजन किती विविध तऱ्हेनें करीत असत व त्यांच्या ज्ञानांत भर टाकण्याची खटपट किती विविध प्रकारची करीत त्याची कल्पना या पुस्तकावरून लोकांना येणार आहे. श्रीमती रमाबाई साहेब या आपला वेळ कसा सत्कारणीं लावित आहेत हें त्यांनीं ह्या पुस्तकांतील निबंध **करमणुकी**च्या फायलांतून निवडून काढण्याच्या बाबतींत घेतलेल्या **श्रमां**वरून दिसून येणार आहे.

**करमणुकींतील करमणूक** हें मनोरंजक पुस्तक गेल्या वर्षी प्रसिद्ध केल्यावर दोन तीन मराठी साप्ताहिकांत त्या पुस्तकास जोडलेल्या चरित्रांत केलेल्या दुरुस्त्यांवरून एक वाद **उत्पन्न** करण्यांत आला होता. मुंबईच्या कित्येक वर्तमानपत्रकर्त्यांना पुण्यांतील लोकांच्या कोणत्याही कृतींत "पुणेरी वृत्ति" दिसून येते. के. हरिभाऊ आपटे यांच्या पुस्तकांतून त्यांचें चित्र व चरित्र अवश्य असावें असें आम्हांस वाटल्यावरून आम्ही आमचे मित्र श्री. व्ही. जी. नाडकर्णी यांचेकडून एक छोटेखानी चरित्र लिहून घेऊन तें प्रथम सन १९२७ सालीं **मध्यान्ह** ह्या पुस्तकास जोडलें होतें व तें **करमणुकींतील करमणूक** या पुस्तकास जोडण्याच्या वेळीं सदर पुस्तकाच्या संग्राहिका श्री. रमाबाईसाहेब आपटे यांनीं त्यांतील कांहीं दोष दाखविल्यावर तें चरित्र छापण्यापूर्वीं तें दुरुस्त करण्यांत आलें; परंतु या दुरुस्तीमुळें पुढें वर्तमानपत्रांमध्यें नसता वाद उत्पन्न होईल

अशी आम्हांस मुळींच कल्पना नव्हती. परंतु तसा वाद मेसर्स बाबाजी सखाराम कंपनी व हरिभाऊ यांच्या व्यवहाराबाबत जी दुरुस्ती सदर चरित्रांत करण्यांत आली, त्यावरून उत्पन्न करण्यांत आला व त्या बाबतींत वर्तमानपत्रांतून कांहीं चर्चा तेव्हां झाली व मला करावयाचा तो खुलासा मीं त्यावेळीं केला आहे. गरिबीची अगर श्रीमंतीची स्थिति कोणाही इसमास निरनिराळ्या कारणांनीं प्राप्त होते. परंतु ही परिस्थिति प्राप्त होण्यांत शील संभाळलेलें आहे किंवा नाहीं हा मुख्य प्रश्न जनता पहात असते. गोविंदराव डुकले एखादा धंदा करण्यांत बुडाले व **हरिभाऊ** यांनीं आपल्या वाङ्मयाची योग्य प्रकारें विक्री केली नाहीं, यामुळें त्या उभयतची स्थिति जरी हलाखीची झाली तरी ते अगर त्यांचे आप्तसंबंधी यांनीं त्यांचेवरील बोजे निवारण्याच्या बाबतींत उच्च मनोवृत्ति राखली किंवा नाहीं या दृष्टीनें त्यांचेबद्दल आदर किंवा अनादर याची भावना ठरणार आहे. या कसोटीस हे दोन्ही गृहस्थ उत्तम तऱ्हेनें उतरणारे होते असा आमचा अनुभव असल्यामुळें या दोघांनाही आपले स्नेही म्हणविणाऱ्या गृहस्थांनीं गेल्या वर्षी उपस्थित झालेला वाद उपस्थित केला नसता तर बरें झालें असतें असें आमचें अद्यापिही मत आहे

या वादांत एका लेखकांनीं हरिभाऊंच्या पुस्तकाच्या प्रकाशकानें कै. केशवराव बाळ यांच्या मृत्यूची संधि साधून रा. नाडकर्णी यांच्या चरित्रांत फिरवाफिरव केली असें विधान केलें आहे. परंतु सुदैवानें केशवराव यांच्या मृत्यूपूर्वीच श्री. रमाबाई आपटे यांनीं चरित्रांत करावयाच्या दुरुस्त्या करून दिलेल्या होत्या व त्या केशवराव यांनीं पाहिलेल्या होत्या येवढेंच आम्हांस येथें नमूद करावयाचें आहे कोणाच्याही चरित्राची माहिती सर्वच एकदम मिळते असें नाहीं. ती क्रमाक्रमानें दुरुस्त केली जाते व याकरतांच आम्हीं हरिभाऊ यांच्या चरित्राचे आतां स्टीरिओ करून न ठेवतां त्याचा कंपोजच कायम ठेवला आहे व या चरित्रांत मिळतील त्या दुरुस्त्या करण्याचें ठरविलें आहे. या पुस्तकांतील कमजास्तीची जबाबदारी विभाजित राहूं नये म्हणून, श्री. नाडकर्णी यांनीं प्रथम चरित्र लिहून आम्हांस उपकृत केलें आहे हें जाहीर रीतीनें नमूद करून यापुढें चरित्राच्या कमजास्तीची जबाबदारी दुसऱ्यावर न पडेल अशी तजवीज आम्हीं केली आहे.

कै. **हरिभाऊ** यांच्या खास लिखाणास त्यांच्या करमणुकींत प्रसिद्ध झालेल्या लिखाणांच्या वेंच्यास महाराष्ट्रभाषाभिमान्यांकडून सदैव आश्रय मिळावा अशी विनंति करून आम्ही रजा घेतों.

आर्यभूषण छापखाना कचेरी,
६२६ शनवार पेठ, पुणें २
फाल्गुन शु॥ १ शके १८५६
ता. ५ माहे मार्च १९३५ इसवी.

प्रकाशक.

# संग्राहिकेची प्रस्तावना

आर्यभूषण छापखान्याच्या सहकार्यामुळें पूर्वसंकल्पाप्रमाणें करमणुकींतील निवडक वाङ्मय प्रसिद्ध करण्याचा उपक्रम गतवर्षापासून सुरू करतां आला याबद्दल आनंद वाटतो. करमणुकींतील चुटके, आख्यायिका वगैरेंचा विनोदी लेखसंग्रह '**करमणुकींतील करमणूक**' या नांवानें मागील श्राद्धतिथीस प्रसिद्ध झाला व त्याच सर्व श्रेय श्री. वामनरावजी पटवर्धन यांस दिलें पाहिजे. वरील पुस्तकाच्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें करमणुकींत **स्वतः** लिहिलेलें पण प्रसिद्ध न झालेलें असें वाङ्मय पुष्कळच आहे. कारण करमणूक सत्तावीस वर्षें अव्याहत चालली होती व पहिलीं कांहीं वर्षें तरी लेखकाच काम सर्वच **स्वतः**स करावें लागे. मधून मधून मित्रमंडळीही मदत करीत; पण साधारणपणें असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, ज्या लेखावर नांव नाहीं ते **स्वतः**चे. दुसऱ्यांच्या लेखांवर बहुधा संबंध किंवा टोपण नांव घातलें जाई. अर्थात् याला कांहीं अपवाद असतील म्हणून यापुढें प्रसिद्ध व्हावयाच्या करमणुकींतील निवडक संग्रहावर **स्वतः**च नांव लेखक म्हणून न घालतां केवळ संग्रहग्रंथ म्हणूनच ते प्रसिद्ध करावयाचें योजिलें आहे.

'**घटकाभर करमणूक**' म्हणून **करमणुकीं**तील निवडक वाङ्मय प्रसिद्ध करण्याचा जो उपक्रम **स्वतः**च आरंभिला होता तोच पुढें चालू ठेवल्याचें व **स्वतः**चें अप्रसिद्ध वाङ्मय प्रसिद्ध होण्यास मदत केल्याचें समाधान मला मिळत आहे त्याबद्दल **आर्यभूषण** छापखान्याच्या चालकांची मी ऋणी आहें.

या स्मृतिदिनाच्या दिवशीं **करमणुकीं**त प्रसिद्ध झालेल्या निवडक निबंधांचा संग्रह '**करमणुकीची निबंधमाला**' या नांवानें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. निबंधांची अनुक्रमणिका चाळून पाहणारास ह्यांतील विषयांची विविधता दिसून येईल. प्रत्येक निबंध माहितीनें भरलेला असून त्याची भाषाशैलीहि नेहमींप्रमाणें साधी, बालबोध व मनोहर आहे. हे निबंध इतक्या वर्षांनीं प्रसिद्ध होत असले तरी त्यांतला ताजेपणा नाहींसा झालेला नाहीं, हेंच त्यांच्या प्रसिद्धीस पुरेसें कारण आहे. हायस्कूलमधील प्रौढ विद्यार्थ्यांस वाचावयास देण्यासारखीं पुस्तकें आजकालही कमींच आहेत. त्यांना ह्या

निबंधांच्या वाचनानें करमणुकीबरोबरच विविध प्रकारची माहिती मिळेल, असा भरंवसा वाटत आहे व म्हणून अशा उपयुक्त पुस्तकास जनतेकडून उदार आश्रय मिळेल अशी मला आशा आहे.

हें पुस्तक प्रसिद्ध करण्यास सर्वतोपरी साह्य केल्याबद्दल **आर्यभूषण** छापखान्याचे चालक श्री. वामनरावजी पटवर्धन यांची मी अत्यंत ऋणी आहें.

आनंदाश्रम, पुणें २.<br>
ता. ३-३-१९३५

**रमाबाई आपटे**

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | आमचें प्राचीनत्व ... ... ... | ३ |
| २ | इंग्रजी महिने ... ... ... | ७ |
| ३ | गृहशिक्षण ... ... ... | १३ |
| ४ | निद्रा ... ... ... ... | १६ |
| ५ | रणवाद्यांचा मोहकपणा ... ... ... | २० |
| ६ | संचय ... ... ... ... | २७ |
| ७ | गृहस्वामिणी ... ... ... | ३० |
| ८ | सृष्टिसौंदर्य ... ... ... | ३४ |
| ९ | पेशव्यांत थोर कोण ! ... ... ... | ३७ |
| १० | इंग्लंडांतील गृहव्यवस्था ... ... ... | ४२ |
| ११ | आर्यांची चर्या ... ... ... | ४७ |
| १२ | छत्र्या ... ... ... ... | ५१ |
| १३ | कुलीन स्त्रियांचा आदर्श ... ... ... | ५४ |
| १४ | मोहरम ... ... ... | ५७ |
| १५ | सेव्य व सेवक ... ... ... | ६२ |
| १६ | अमृतमणि ! ... ... ... | ६४ |
| १७ | तरुणांस उपदेश ... ... ... | ६८ |
| १८ | सृष्टीचा प्रभाव ... ... ... | ७० |
| १९ | सुंदर पुस्तकें ... ... ... | ७४ |
| २० | प्रेम ... ... ... | ७६ |
| २१ | कर्तव्य ... ... ... | ८२ |
| २२ | समुद्राचें गाणें ... ... ... | ८६ |
| २३ | हातरुमाल ... ... ... | ८८ |
| २४ | संभाषण ... ... ... ... | ९३ |
| २५ | झोंपेबद्दल ... ... ... | ९५ |
| २६ | वसतऋतु ... ... ... | ९८ |
| २७ | अनुवंशिक सारखेपणा ... ... ... | १०२ |

२८ मत्कुण–मीमांसा ... ... ... १०६
२९ टॉरपेडो ... ... ... ... १११
३० दुष्काळ ! दुष्काळ !! दुष्काळ !!! ... ... ११५
३१ कार्तिकस्वामी ... ... ... १२४
३२ शकुंतला व मिरांदा ... ... ... १२९



हरि नारायण आपटे.

जन्म-
ता. ८ मार्च १८६४.

मृत्यु
ता. ३ मार्च १९१९.

# हरि नारायण आपटे

## यांचें

# अल्प चरित्र

दृष्टीसमोर असलेल्या माणसाचें अंतरंग शोधणारी, ओष्ठसंभाषणासाठीं आतुर, मुखावर स्मिताची छटा, उंच आणि विस्तीर्ण भालप्रदेश, वाटोळा चेहरा आणि साधारण स्थूल—फार उंच नव्हे व ठेंगूही नव्हे—अशी शरीरयष्टि, अशी **कै. हरिभाऊ आपटे** यांची बाह्यरूपाकृति होती. प्रिय कन्येचा वियोग झाला, त्या दिवसापासून त्यांच्या चर्येवरील स्मिताची छटा मावळली, आणि त्या ठिकाणीं विरक्तीनें पसरलेली गंभीरपणाची छाया दृग्गोचर होऊं लागली. ह्या दारुण कालाघाताचा त्यांच्या देहावरही परिणाम झाला. जरा जोरानें त्यांच्या देहावर आपला पगडा बसवूं लागली आणि पन्नाशीच्या घरास पोंहचण्यापूर्वींच **हरिभाऊ** पंचावन्न साठ वर्षांच्या वयाचे असें वृद्ध दिसूं लागले. यानंतर सातच वर्षें त्यांनीं इहलोकांत वास्तव्य केलें. सन १८६४ सालाच्या मार्च महिन्याच्या आठव्या तारखेस त्यांच्या इहलोकवासास प्रारंभ झाला आणि सन १९१९ सालच्या मार्च महिन्याच्या तिसऱ्या तारखेस त्यांचा इहलोकवास संपला. एकंदर पंचावन्न वर्षांत पांच दिवस कमी इतका काल ते आमच्यामध्यें राहिले आणि एवढ्या अर्धशतकाच्या अल्पावधीच्या कालांत **महाराष्ट्रशारदे**च्या भक्तमंडळींत फार मोठ्या मानाचें, फार मोठ्या कीर्तीचें व चिरस्मरणीय असें स्थान मिळवून ते निघून गेले.

नारायण चिमणाजी ऊर्फ नानासाहेब आपटे यांचे **हरि नारायण आपटे** हे श्रेष्ठ पुत्र. हरिभाऊंचा जन्म खानदेशांत पारोळें येथें त्यांच्या आजोळीं झाला. बारशाच्या दिवशीं या मुलाचें नांव 'बाळकृष्ण' असें ठेवलें होतें; पण कुटुंबांत दुसरा 'बाळकृष्ण' आहे, असें आढळून आल्यावर तें नांव बदलून या नव्या बाळकृष्णाचें 'हरि' हें नांव ठेवण्यांत आलें. हरिभाऊंना मातृसुख फारसें लाधलें नाहीं. ते चार वर्षांचे असतांना त्यांची मातुश्री इहलोक सोडून गेली; या मातृसुखास आंचवलेल्या मुलाचे बापानें विशेष लाड करावयाचे पण बापानें आपल्या मुलाला उचलून घेणें, त्याला खेळवणें, त्याचे लाड करणें ह्या गोष्टी त्या वेळच्या जुन्या वळणाच्या कुटुंबांत अमर्यादपणाच्या म्हणून मानल्या जात असत व त्यामुळें बापानें आपल्या मुलास न घेतां, चुलत्यानें किंवा दुसऱ्या कोणीं आप्तानें त्याला

घ्यावयाचें, खेळवावयाचें, अशी रीत त्या वेळीं असे. त्यामुळें मातेच्या वियोगानंतर हरिभाऊंचें लालनपालन त्यांच्या चुलताचुलतीकडून–महादेव चिमणाजी आपटे व त्यांच्या पत्नी सौ० पार्वतीबाई यांजकडून–होऊं लागलें व या उभयतांचा हरिभाऊंस फार लळा लागला. या वेळीं महादेव चिमणाजी ऊर्फ अण्णासाहेब आपटे हे मुंबईंत फणसवाडींतील एका चाळींत रहात असत. याच ठिकाणीं हरिभाऊंचे लहानपणचे खेळण्याचे बरेच दिवस गेले व त्यांच्या मनावर बालपणांत जे संस्कार झाले तेही याच ठिकाणीं झाले. फक्त मुंजीसाठीं मात्र हरिभाऊ पुण्यास गेले होते. हा आपल्या लाडक्या 'हरि' च्या मुंजीचा समारंभ थाटानें करण्याची त्यांच्या काकूंची फार इच्छा होती; पण तत्पूर्वींच सौ० पार्वतीबाई परलोकवासी झाल्या. अशा रीतीनें हरिभाऊ जरा मोठे होतात न होतात तोंच काकूंच्या मायेचें त्यांचेवरील छत्रही काळानें हिरावून नेलें. नानासाहेबांनीं प्रथम पत्नी निवर्तल्यावर दुसरा विवाह केला. अण्णासाहेबांनीं पुनः विवाह केला नाहीं. कर्त्या बायका अशा घरांतून नाहींशा झाल्यावर आपटे बंधूंच्या संसाराची सगळी व्यवस्था नानासाहेबांची मावशी–चिमा मावशी–ह्या पाहूं लागल्या. हरिभाऊंनाही काकूंच्या मागून त्यांनींच वाढविलें. त्यांना स्वतःचें मूलबाळ असें कांहींच नव्हतें. आपल्या बहिणीच्या मुलांचा संसार तोच आपला संसार असें मानून तो त्या मोठ्या दक्षतेनें चालवीत असत. हरिभाऊंवर त्यांचें अतिशय प्रेम होतें; पण आई नसलेलें मूल म्हणून त्याचे फाजिल लाड न करतां, हरिभाऊंना चांगलें वळण लावण्याची त्यांनीं फार काळजी घेतली. हरिभाऊंचे वडील नानासाहेब हे सरकारी नोकर असून त्यांचे आचार-विचार पक्क्या कर्मठ ब्राह्मणासारखे. चुलते महादेव चिमणाजी–हे पुढें नामांकित वकील झाले (पुण्यांतील 'आनंदाश्रम' ही संस्कृत ग्रंथांचें संशोधन व पुनरुज्जीवन करणारी संस्था यांनींच स्थापन केली)–यांचे आचार-विचार कांहींसे सुधारक पंथाचे. हरिभाऊंचें बालपण यांच्याच सान्निध्यांत गेलें व या मातृविहीन मुलाचें कोडकौतुक त्यांनींच पुरविलें. आईची माया कशी असते याचा अनुभव हरिभाऊंना मिळाला नाहीं. समजावयास लागण्याच्या वयापूर्वींच ती त्यांना सोडून गेली होती; तिची जागा प्रथम त्यांच्या काकूंनीं व तिच्या पश्चात् वडिलांच्या मातुश्री व त्यांची बहीण यांनीं भरून काढली. हरिभाऊंचें बालपण अशा कौटुंबिक परिस्थितींत मुंबईंत एका चाळींत गेलें.

'श्रीगणेशा' शिकण्याचा आरंभ हरिभाऊंनीं मुंबईंत केला व त्यांचें मराठी व इंग्रजी तीन इयत्तांपर्यंतचें शिक्षण मुंबईंस झालें. हा वेळपर्यंत हरिभाऊंचे वडील

व चुलते एकत्र रहात होते, पण महादेव चिमणाजी यांचें वर्तन असह्य झाल्यामुळें नानासाहेबांनीं आपलें बिऱ्हाड पुण्यास नेलें व आपल्याबरोबर आपल्या मुलास–हरिभाऊंसही ते पुण्यास घेऊन गेले व तेथील हायस्कुलांत त्यांनीं त्यांना घातलें. यावेळीं हरिभाऊंचें वय चौदा वर्षांचें होतें. पुण्यांत त्यांना घरीं संस्कृत शिकविण्यासाठीं एक शास्त्री ठेवण्यांत आला होता व त्याच्याजवळ हरिभाऊंनीं काव्यनाटकादिकांचा बराच अभ्यास केला. हरिभाऊ पुण्यास आल्यानंतर दोन वर्षांनीं 'न्यू इंग्लिश स्कूल' ही कांहीं तडफदार तरुण देशभक्तांनीं स्थापन केलेली नवीन शाळा निघाली व हरिभाऊ हायस्कूल सोडून या शाळेंत गेले, व त्याच शाळेंतून मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. यानंतर पुढील शिक्षणासाठीं ते डेक्कन कॉलेजांत गेले, व न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळीनें 'फर्ग्युसन कॉलेज' काढतांच डेक्कनमधून ते फर्ग्युसनमध्यें आले. या कॉलेजांत एक वर्ष घालवून पुन्हां ते डेक्कनमध्यें गेले. या दोन्ही कॉलेजांत मिळून सरासरी पांच वर्षें त्यांनीं काढलीं, पण कॉलेजच्या शिक्षणक्रमांतील सगळ्या विषयांमधील 'पास'ची हद्द ओलांडून जाण्याइतकी तयारी त्यांच्या हातून होऊं न शकल्यामुळें कॉलेजांत पांच वर्षें काढलीं, तथापि 'पासा'चा टिळा त्यांना लावून घेतां आला नाहीं. हरिभाऊंचा ओढा, आसक्ति एका विषयाकडे, त्यांचें मन विशिष्ट विषयांतच रममाण व्हावयाचें, कांहीं विषय त्यांच्या डोक्यांत शिरावयाचेच नाहींत व या विषयांची त्यांना शिसारी यावयाची; पण पासाचा शिक्का पाहिजे तर सगळ्या विषयांत ठराविक मार्कांची मर्यादा ओलांडणें भाग होतें; हरिभाऊंचा आणि गणिताचा तर छत्तिसाचा आंकडा व त्यामुळें हरिभाऊंची कॉलेजच्या परीक्षेंत प्रगति होऊं शकली नाहीं आणि अर्थात् युनिव्हर्सिटीला आपली एखादी पदवी त्यांना अर्पण करतां आली नाहीं; तथापि हरिभाऊ कॉलेजांत 'चमकले' नाहींत असें नाहीं. ते शाळेंत चमकले आणि कॉलेजांतही चमकले. त्यांच्या अंगच्या रसज्ञता व मर्मज्ञता या गुणांचें तेज शाळा व कॉलेज या दोन्ही ठिकाणच्या गुणज्ञ गुरुजनांच्या नजरेस आलें व त्यामुळें हरिभाऊ त्यांच्या सकौतुक प्रेमास व आदरास पात्र झाले. कॉलेजांत त्यांनीं पांच वर्षें काढलीं, पण हें परीक्षांचें कुंपण उल्लंघून जाण्याचें आपल्याला कांहीं साधत नाहीं, असें दिसून येतांच हरिभाऊंनीं कॉलेजच्या अभ्यासक्रमाला रामराम ठोकला आणि लोकदृष्टीचें त्यांचें शिक्षण येथेंच संपलें.

हरिभाऊ यांच्या विद्यार्थिव्रताची समाप्ति मात्र येथेंच झाली नाहीं व ती त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत पुढेंही केव्हांच झाली नाहीं. पहिल्यानें ते जेव्हां मुंबईंत मराठी शाळेंत गेले, त्यावेळीं विद्यार्थ्यांचें जें व्रत त्यांनीं घेतलें, तें हर-

लोकांतून निघून जाण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत त्यांनीं अखंड चालविलें. पहिला "श्रीगणेशा" शिकविणाऱ्या शाळेंत जशा तऱ्हेचे विद्यार्थी ते होते, तसेच इंग्रजी शाळेंत ते होते, व तसेच कॉलेजांत व कॉलेजांतून बाहेर पडल्यानंतर अखेरच्या दिवसापर्यंत ते होते. त्यांचा ज्ञानार्जनाचा हव्यास एकसारखा वाढतच होता. त्यांना लागलेला वाचनाचा छंद म्हणा, व्यसन म्हणा, वेड म्हणा, जबरदस्त होतें, व या त्यांच्या 'व्यसना' पायीं हजारों रुपये त्यांनीं वेंचले. त्यांनीं जेवढें वाचलें, तेवढें वाचलेलीं किंवा वाचणारीं माणसें थोडीच सांपडतील. आपली वाचनाची तृष्णा तृप्त करण्यासाठीं ते नव्या नव्या भाषा शिकले; मराठी ही तर त्यांची मायभाषाच; इंग्रजी व संस्कृत या भाषेचें ज्ञान त्यांनीं शाळेंत व कॉलेजांत संपादन केलें; पण फ्रेंच व जर्मन भाषांतील सरस वाङ्मयाचा आस्वाद घेण्या-करितां ह्या भाषांचेंही अध्ययन करून त्यांनीं या भाषांतीलही कैक ग्रंथ वाचले. सर्व भाषांतील मिळून त्यांनीं वाचलेले ग्रंथ हजारांनीं मोजतां येतील असा त्यांचा वाचनाचा व्यासंग होता. वाङ्मयप्रासादाच्या प्रत्येक दालनांत त्यांनीं परिभ्रमण केलें होतें. त्यांची वृत्ति मधुलोलुप भ्रमरासारखी होती. वाङ्मयाच्या उद्यानांत नवें फूल फुललेलें त्यांना दिसल्यावर त्यांनीं तिकडे धांव घेतली नाही व त्यांतील रसास्वाद घेण्यांत ते तल्लीन झाले नाहींत असें केव्हांही झालें नाहीं. अखेरच्या दुखण्यांत रुग्णशय्येवर वेदनांनीं विव्हळ होऊन पडले असतांना देखील नव्या नव्या ग्रंथांचा परिवार त्यांच्या सभोंवार पसरलेला होता, आणि कोणतेंना कोणतें नवीन पुस्तक वाचून घेऊन ते तशा असहाय स्थितींतही आपली ज्ञानार्जन-पिपासा तृप्त करून घेत असत.

हें एवढें वाचन त्यांनीं कशासाठीं केलें? स्वतःची वाचनाची तहान भागविण्या-साठीं? नव्हे. 'दांडगा वाचक' म्हणून म्हणवून घेण्यासाठीं? नाहीं. विद्वत्परिषदेंत बहुमानाची जागा मिळविण्यासाठीं? तसेंही नव्हे. कीर्ति मिळविण्याची धडपड त्यांनीं केव्हांही केली नाहीं. तिच्या प्राप्तीचा हव्यास त्यांना केव्हांही लागलेला नव्हता. ती आपण होऊन त्यांच्याकडे धांवत आली आणि मराठींतील अद्वितीय कादंबरीकाराचा मुकुट तिनें त्यांच्या मस्तकावर ठेवला. हरिभाऊंचें जीवितकार्य त्यांनीं लिहिलेल्या कादंबऱ्या हेंच आहे. ह्या कादंबऱ्या त्यांनीं जन-मनोरंजनार्थ लिहिल्या नाहींत; त्या पतितांच्या उद्धारासाठीं, दीनांच्या दुःखविमो-चनासाठीं, मार्गभ्रष्टांना सन्मार्गदर्शनासाठीं, हताश झालेल्या हृदयांत नवचैतन्य उत्पन्न करण्यासाठीं, समाजशुद्धीसाठीं, राष्ट्रीय भावना उद्दीपित करण्यासाठीं त्यांनीं लिहिल्या; यासाठींच त्यांनीं अखंड वाचन चालविलें होतें. वाङ्मयाच्या क्षेत्रक्षेत्रांतरीं फिरून सुविचारांचीं बीजें त्यांनीं गोळा केलीं आणि तीं आपल्या कादंबऱ्यांच्या द्वारां आपल्या देशबांधवांच्या मनांत मोठ्या चातुर्यानें पेरण्याचा महदुद्योग त्यांनीं केला.

**"नाहि कस्तूरिकामोदः शपथेन प्रकाश्यते"** ह्या कविवचनाची आठवण हरिभाऊंच्या "आजकालच्या गोष्टी–मधली स्थिति" ह्या पहिल्या कादंबरीच्या प्रकाशनाचा इतिहास करून दिल्याशिवाय रहात नाहीं. ही कादंबरी हरिभाऊंनीं कॉलेजांत असतांना लिहिली, व "पुणें वैभव" ह्या आज अस्तंगत झालेल्या परंतु एकवेळ महाराष्ट्रांत प्रसिद्ध असलेल्या मराठींतील साप्ताहिक पत्रांत ती सन १८८५ सालीं प्रसिद्ध झाली. ह्या कादंबरीचीं पहिलीं दोन प्रकरणें प्रसिद्ध होतांच केवळ पुण्यासच नव्हे, तर सगळ्या महाराष्ट्रांतील वाचकवर्गांत मोठी खळबळ उडाली व 'या कादंबरीचा कर्ता कोण' म्हणून प्रत्येक वाचक विचारूं लागला. हरिभाऊंची इच्छा आपलें नांव कोणाला कळूं न देतां आपलें कादंबरीलेखनाचें कार्य चालावें अशी होती आणि 'केसरी' नें कांहीं कारणावरून त्यांचें नांव मुद्दाम लोकांना सांगितलें नसतें तर हरिभाऊंची इच्छा सफल होऊन कर्त्याचें नांव अज्ञात राहून, फक्त कृति तेवढी वाचकवर्गापुढें आली असती.

"मधली स्थिति" या कादंबरीनंतर हरिभाऊंची "आजकालच्या गोष्टींतली" दुसरी गोष्ट "गणपतराव" ही कानिटकर मंडळीच्या 'मनोरंजन' या मासिक पुस्तकांत प्रसिद्ध होऊं लागली. या कादंबरीवर हरिभाऊंनीं लेखकाचें नांव "पुणें वैभवांतील आजकालच्या गोष्टींचा कर्ता" असें दिलें होतें. कांहीं पाश्चात्य कादंबरीकारांप्रमाणें आपलें नांव गुप्त ठेवून कादंबऱ्या लिहाव्या अशी हरिभाऊंची इच्छा असल्यामुळें 'केसरी'नें केलेला गौप्यस्फोट हरिभाऊंना आवडला नाहीं. कांहीं खरीं व कांहीं काल्पनिक पात्रें योजून समाजांतील सुखदुःखाच्या निरनिराळ्या प्रसंगांचीं हृदयस्पर्शी चित्रें रंगवावींत व लोकजागृति करावी हा कादंबरीलेखनांतला हरिभाऊंचा हेतु त्यांच्या ह्या पहिल्या कादंबरीपासून स्पष्ट दिसतो. हरिभाऊंची ही कादंबरी प्रसिद्ध झाली त्या काळांत कादंबरीसारख्या पुस्तकाकडे तत्कालीन शिष्टमंडळी अनादराच्या दृष्टीनें पहात असत; असलीं पुस्तकें वाचल्यापासून "वाचणारांचीं मनें बिघडून ते नीतिभ्रष्ट होतात" असें त्या वेळचे शिष्ट मानीत असत; असें असतांही विशीएकविशींत लिहिलेल्या हरिभाऊंच्या ह्या पहिल्या कादंबरीनें तिच्या वाचनाची शिष्टमंडळीच्या मनांतही उत्कट उत्कंठा उत्पन्न केली; इतकेंच नव्हे, तर कित्येकांना तिचें पुढलें प्रकरण केव्हां प्रसिद्ध होईल व केव्हां तें आपण वाचूं इतका चटका लागला. यावरून या उद्योन्मुख कादंबरीकाराच्या लेखणींत वाचकांच्या मनांत खळबळ उडवून देण्याचें कसें सामर्थ्य होतें याची साक्ष पटते. कानिटकर आणि मंडळीच्या 'मनोरंजन' या मासिक पुस्तकाचा पहिला अंक १८८६ सालाच्या जुलई महिन्यांत प्रसिद्ध झाला व त्यांत हरिभाऊंनीं लिहावयास घेतलेली दुसरी कादंबरी 'गणपतराव' हिचें पहिलें प्रकरण आलें.

या पहिल्या अंकांत हरिभाऊंच्या नव्या कादंबरीच्या पहिल्या प्रकरणास पहिलें स्थान देण्यांत आलें व याच अंकांत हरिभाऊंनीं लिहिलेल्या ' श्रुतकीर्तिचरित्र ' या नाटकाचा पहिला कांहीं भाग प्रसिद्ध झाला. या नाटकावरही लेखकाचें नांव 'आ. का. गो. ' च्या कर्त्याकडून असेंच घालण्यांत आलें होतें. हें मासिक पुस्तक कांहीं काळ नियमितपणें निघालें; परंतु पुढें या मासिकाचे अंक अनियमितपणें प्रसिद्ध होऊं लागले व शेवटीं तें बंद पडलें. या मासिक पुस्तकांत हरिभाऊंनीं ' गणपतराव ' व ' चाणाक्षपणाचा कळस ' या दोन कादंबऱ्या, ' श्रुतकीर्तिचरित्र ' व ' जयध्वज ' हीं दोन नाटकें, ' मारून मुटकून वैद्यबोवा ' ' पळपुट्या वैद्य ' इत्यादि मोलियरच्या आधारें लिहिलेलीं प्रहसनें, कांहीं लहानसहान गोष्टी, निबंध व कविता लिहिल्या. या मासिक पुस्तकाच्या शिरोभागीं " **आपरितोषाद्विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम्** " ही कविकुलगुरूंची उक्ति ' ध्येयवाक्य ' म्हणून घातलेली असे व त्याप्रमाणें हें मासिक पुस्तक अल्पावधींतच विद्वज्जनांच्या प्रशंसेस पात्र होऊन अशा तऱ्हेच्या वाङ्मयाची अवश्यकता त्यानें सिद्ध करून दिली. या मासिक–पुस्तकाशीं हरिभाऊंचा संपादकीय संबंध होता, व आपल्या ' मनोरंजना ' चा हरिभाऊंना फार अभिमानही होता. तो इतका कीं, कै. काशीनाथ रघुनाथ मित्र यांनीं त्यानंतर आपल्या नवीन काढलेल्या मासिक पुस्तकास ' मनोरंजन ' नांव दिलें ही गोष्ट हरिभाऊंस आवडली नाहीं व पुढें कैक वर्षे तरी ती गोष्ट त्यांच्या मनांत वसत होती. कै. मित्रांनीं आपल्या ' मनोरंजना ' चा पहिला दिवाळी अंक काढला त्यांत घालण्यासाठीं हरिभाऊंकडे त्यांचें छायाचित्र मागितलें, परंतु तें सुद्धां देण्याचें त्यांनीं नाकारलें होतें. पुढें अनेक वर्षांनंतर कांहीं व्यवसायपरत्वें काशीनाथ रघुनाथ मित्र आणि हरिभाऊ यांचा निकट संबंध आला, तेव्हां हरिभाऊंनीं मित्रांच्या ' मनोरंजनां'त लिहिण्यास पहिल्यानें लेखणी हातीं घेतली. हरिभाऊंनीं ' मनोरंजन ' काढण्यांतला हेतु पहिल्याच अंकाच्या प्रस्तावनेंत व्यक्त केला तो असाः–" यांत येणारे विषय, शिक्षणाचा हेतु मुख्य धरून, जितके मनोरंजक व प्रतिष्ठित करवतील तितके करण्याचा आमचा विचार आहे " आणि हाच "हेतु मुख्य धरून" हरिभाऊंनीं आपल्या कादंबऱ्या लिहिल्या, गोष्टी लिहिल्या, नाटकें लिहिलीं— इतकेंच नव्हे तर आपल्या सर्व ललितवाङ्मयाची रचना हाच हेतु मनांत धरून हरिभाऊंनीं केली.

लोकशिक्षणाचें, बहुजनसमाजांत विचारजागृति करण्याचें कार्य विस्तृत प्रमाणावर करण्यासाठीं सन १८९० सालच्या ऑक्टोबरांत हरिभाऊंनीं 'करमणूक' पत्र काढलें. यावेळीं जुन्यानव्या मतांचा झगडा जोरानें चाललेला होता. ' केसरी ' आणि ' सुधारक ' यांची एकमेकांशीं ' दोन हात ' करण्याची

घडाजंगी चालूं होती. सुधारक व त्यांचीं मतें यांच्याविषयीं बहुजनसमाजांत आदर किंवा प्रेम बिलकूल उत्पन्न झालेलें नव्हतें; सुधारकांच्या मतांचा उच्चारही बहुजनसमाजास अभद्र वाणीसारखा वाटे, इतकी त्यांविषयीं लोकांच्या मनांत अप्रीति होती. ही अप्रीति नाहींशी करून इष्ट सुधारणांना लोकमत अनुकूल करण्याचें.कार्य हरिभाऊंनीं 'करमणुकी'च्या द्वारें आरंभिलें. आपल्या लेखणीच्या सामर्थ्याविषयीं हरिभाऊंस आतां आत्मविश्वास उत्पन्न झाला होता;'मनोरंजना' तील त्यांच्या शर्करावगुंठित गुटिकांचें लोक मोठ्या आनंदानें व उत्कंठेनें सेवन करतात हें हरिभाऊंच्या उत्तम रीतीनें प्रत्ययास आलें होतें; म्हणून रूक्ष, तात्त्विक वादविवादाच्या मार्गांत न शिरतां 'करमणुकी'च्या बहुजनसमाजास आवडणाऱ्या मार्गानें त्यांनीं आपलें लोकशिक्षणाचें कार्य जोरानें करण्यास प्रारंभ केला.

'पण लक्षांत कोण घेतो!' ही 'करमणुकीं'त अगदीं प्रारंभीं प्रसिद्ध झालेली त्यांची सामाजिक कादंबरी होय. 'करमणूक' पत्र त्यांनीं अठ्ठावीस वर्षें चालविलें आणि स्वभाषेची आणि स्वदेशाची सेवा त्यांनीं या पत्राच्या द्वारें प्रामुख्यानें केली. 'पुणेंवैभवां'त प्रसिद्ध झालेली 'मधली स्थिति' व त्यानंतर 'मनोरंजन' मासिकांत लिहिलेल्या 'गणपतराव' (ही अपुरीच राहिली) व 'चाणाक्षपणाचा कळस' ह्या दोन कादंबऱ्यांखेरीज बाकी हरिभाऊंच्या सर्व कादंबऱ्या त्यांनीं 'करमणुकीं' तूनच प्रसिद्ध केल्या. ह्या कादंबऱ्यांशिवाय शेंकडों मोठ्या व छोट्या गोष्टी, लहान लहान निबंध, छोटीं चरित्रें, निवडक माहिती, कविता, चुटके वगैरे वगैरे कितीतरी मजकूर त्यांनीं लिहिला व प्रसिद्ध केला आहे. हा त्यांनीं लिहिलेला सर्व मजकूर एकत्र करून छापल्यास हजार हजार पानांचे कितीतरी ग्रंथ भरतील.हा सर्व मजकूर लिहिण्यांत-'करमणुकीं' त येणाऱ्या कोणत्याही मजकुरांत,—त्यांनीं आपलें धोरण मात्र केव्हांही ढळूं दिलें नाहीं. आपल्या लिहिण्याचा लोकशिक्षण हा जो मुख्य हेतु त्याला विघातक अशी एक ओळही त्यांनीं कधीं आपल्या 'करमणुकीं'त येऊं दिली नाहीं आणि अश्लीलतेला तर त्यांनीं 'करमणूक' मधील मजकुरांतच नव्हे, तर तींत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतसुद्धां कधीं डोकावूं दिलें नाहीं. आपल्या समाजास आपल्याला विशिष्ट विचारांचें वळण लावावयाचें आहे, लोकांच्या अंतःकरणांतला अंधार नाहींसा करून कर्तव्याच्या स्फूर्तीची ज्योत तेथें प्रज्वलित करावयाची आहे, हें धोरण डोळ्यांपुढें ठेऊन 'करमणुकी'चा अठ्ठावीस वर्षांचा मार्ग त्यांनीं आक्रमण केला. त्यांचा पहिला जोम पुढल्या वर्षांत टिकला नाहीं. 'करमणुकी'चें काम त्यांनीं पहिल्या पहिल्यानें जितक्या नेटानें केलें तितक्या

नेटानें तें त्यांजकडून पुढें होईनासें झालें; तथापि, 'करमणुकी'चें त्यांनीं निराळ्या तऱ्हेच्या स्वरूपांत पुढें केव्हांही स्थित्यंतर होऊं दिलें नाहीं. प्रचलित राजकारण व सामाजिक, धार्मिक इत्यादि प्रश्नांवर वर्तमानपत्रांतून होणारे वादविवाद यांपासून आपल्या 'करमणुकी'स अलिप्त ठेवावयाची असें जें धोरण त्यांनीं प्रारंभींच ठरविलें होतें, तेंच अखेरपर्यंत त्यांनीं मोठ्या दक्षतेनें कायम राखिलें होतें. आपलीं राजकीय, सामाजिक, धार्मिक इत्यादि बाबतींतील मतें त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांतील पात्रांच्या मुखांतून वदविलीं, आणि तींही मोठ्या खुबीनें व चटकदार रितीनें वदविलीं; पण इतर वर्तमानपत्रांसारखी या 'विषया'ची चर्चा त्यांनीं 'करमणुकीं'तून कधींही केली नाहीं. या प्रश्नाची विशेष चर्चा करण्याची, विशेषतः सामाजिक प्रश्नांची चर्चा करण्याची त्यांना अवश्यकता वाटली, त्यावेळीं त्यांनीं 'सुधारका'चें पुनरुज्जीवन केलें, व या कार्यासाठीं एक दिवसआड निघणारें एक वर्तमानपत्र काढण्याची वाटाघाट याच सुमारास ते व माजी बाबाजी सखाराम कंपनीचे मालक गोविंदराव डुकले यांच्यामध्यें चालली होती. 'करमणुकी'ची व्यवस्था या वेळीं मेसर्स बाबाजी सखाराम कंपनीकडे होती व तिच्या उत्कर्षासाठीं गोविंदराव डुकले यांनीं पुष्कळ परिश्रम केले व पुष्कळ पैसाही खर्च केला. गोविंदराव वारल्यानंतर बाबाजी सखाराम कंपनी बंद झाली; त्यावेळीं व त्यानंतरही अनेक वेळां 'करमणूक आमच्या स्वाधीन करा, आम्ही ती चालवितों' अशी कांहीं जणांनीं हरिभाऊंकडे मागणी केली. तिच्या स्वामित्वासाठीं हरिभाऊंस मोठाल्या रकमाही कित्येकांनीं देऊं केल्या; पण आपली 'करमणूक' आपल्या धोरणानें पुढें कोणी चालवील, असा भरंवसा न वाटल्यामुळें हरिभाऊ ती कोणाच्याही स्वाधीन करावयास तयार झाले नाहींत. हरिभाऊंची 'करमणूक' हरिभाऊंबरोबर विराम पावली !

हरिभाऊंनीं 'करमणुकीं'तून एकंदर १८ मोठ्या कादंबऱ्या लिहिल्या, त्यांपैकीं ८ सामाजिक असून १० ऐतिहासिक आहेत. सामाजिक व ऐतिहासिक हे दोन वर्ग खेरीज करून तिसऱ्या वर्गांत घालतां येण्यासारखी एकच कादंबरी त्यांनीं आपल्या लेखनव्यवसायाच्या अगदीं आरंभीं लिहिली व ती म्हणजे 'मनोरंजनां'त प्रसिद्ध झालेली 'चाणाक्षपणाचा कळस' ही होय. अशा तऱ्हेची अगर वरील दोन प्रकारच्या कादंबऱ्यांहून भिन्न केवळ मनोरंजन करणारी कादंबरी त्यांनीं पुढें लिहिली नाहीं.

ह्याशिवाय 'गड आला पण सिंह गेला' ही कादंबरीवजा ऐतिहासिक मोठी गोष्ट त्यांनीं लिहिली; पण हरिभाऊंच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांपैकीं 'म्हैसूरचा वाघ' 'सूर्यग्रहण' व 'कालकूट' ह्या कादंबऱ्या अपूर्ण आहेत. 'कालकूट' ही कादंबरी यांनीं योजिल्याप्रमाणें पुरी झाली असती, तर ती त्यांची एक अत्युत्कृष्ट कादंबरी

झाली असती; ती त्यांना अर्धीच सोडून द्यावी लागली, याचें कारण त्यांच्या 'करमणुकी' वर व त्यांच्या कांहीं कादंबऱ्यांवर त्या वेळीं येऊं पहाणारें गंडांतर होय. तें गंडांतर त्यांच्या एका हितचिंतकाच्या व थोर मित्राच्या खटपटीमुळें टळलें म्हणून बरें, नाहींपेक्षां त्यांच्या कांहीं उत्कृष्ट कादंबऱ्यांस कायमचा–निदान कांहीं काळ तरी–महाराष्ट्र मुकला असता. 'मी' व 'यशवंतराव खरे' या कादंबऱ्या पुस्तकरूपानें प्रसिद्ध करतांना त्यांचीं शेवटचीं प्रकरणें आज त्या पुस्तकांत जीं आहेत त्याहून निराळ्या तऱ्हेनें लिहिण्याचें त्यांच्या मनांत होतें; पण सदर गंडांतराच्या वावटळीमुळें तो विचार त्यांना सोडून देणें भाग पडलें. 'वज्राघात' ही त्यांनीं संपूर्ण लिहिलेली शेवटची कादंबरी होय. त्यांनीं 'वज्राघात' लिहिण्यास आरंभ केला, त्या वर्षी त्यांच्या आवडत्या मुलीच्या मृत्यूनें त्यांच्या हृदयावर वज्राघात झाला. 'करमणुकी' चे तेव्हांचे चालक गोविंदराव डुकले त्याच वर्षी दिवंगत होऊन बाबाजी सखाराम कंपनीवर वज्राघात झाला व त्यांच्या कादंबरीलेखनावरही वज्राघातच झाला. यानंतर त्यांनीं 'करमणुकीं'त नवीन कादंबरी लिहिली नाहीं. 'पुर्णवैभव', कानिटकर मंडळीचें 'मनोरंजन' व स्वतःची 'करमणूक' यांशिवाय त्यांची कादंबरी अन्यत्र कोठेंही प्रसिद्ध झाली नाहीं. 'काळ तर मोठा कठीण आला' ह्या त्यांनीं दुष्काळावर लिहिलेल्या मोठ्या गोष्टीचें त्यांनींच इंग्रजींत केलेलें भाषांतर मात्र 'रामजी' या नांवानें विलायतेंतील प्रख्यात 'मेसर्स फिशर, अनविन कंपनी' नें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें आहे.

'मनोरंजनां'त प्रसिद्ध केलेल्या नाटकांशिवाय 'संत सखूबाई' व 'सती पिंगला' हीं दोन नवीन नाटकें त्यांनीं लिहिलीं. यांपैकीं 'संत सखूबाई' हें त्यांनीं 'करमणुकीं'त ('वसंत अंकांत' त) लिहिलें. 'करमणुकी' शिवाय इतरत्रही त्यांनीं पुष्कळ लिहिलें; निरनिराळ्या विद्वज्जनसभांपुढें वाङ्मयावर सुंदर भाषणें केलीं व निबंध वाचले; विद्यार्थिदशेंतही त्यांनीं कांहीं चांगले निबंध लिहिले व काव्यरचना केली. साप्ताहिक-अँग्लो–मराठी 'ज्ञानप्रकाशा' चीं व पुढें 'ज्ञानप्रकाश' दैनिक झाल्यावर त्याचीं संपादकीय सूत्रें कांहीं काल त्यांच्याकडे होतीं व 'सुधारका' चें पुनरुज्जीवन केल्यावर त्यांत कांहीं सुंदर निबंध त्यांनीं लिहिले; हा त्यांचा सगळा लेखनोद्योग मनांत आणला म्हणजे वाङ्मयक्षेत्रांत त्यांनीं केलेली कामगिरी केवळ संख्येच्या दृष्टीनेंही फारच मोठी आहे अशी खात्री पटल्यावांचून रहात नाहीं. त्यांच्या आयुष्याचा लेखनव्यवसायांत गेलेला काल साधारणतः पसतीस वर्षांचा आहे. पण त्यांत जास्त नेटाची उत्साहपूर्वक कामगिरी 'करमणुकी' च्या सुरवातीपासून पुढील २०–२१ वर्षांतच झाली. हा सगळा लेखनाचा प्रचंड खटाटोप त्यांनीं लोकशिक्षणासाठीं, बहुजनहित-

साधनासाठीं केला; पैशासाठीं अगर कीर्तीसाठीं केला नाहीं. त्यांच्या गुणांवर लुब्ध होऊन कीर्ति त्यांच्याकडे जशी धांवत आली, तशी लक्ष्मी मात्र आली नाहीं. श्री आणि सरस्वती यांच्यांत छत्तिसांचा आंकडा असतो, हाच सिद्धांत पुनश्च प्रस्थापित करणारें महाराष्ट्रांतील ह्या कादंबरीकारकुलगुरूचें चरित्र आहे. आयुष्याच्या शेवटीं तर सांपत्तिक अडचणींनीं त्यांचें चित्त अत्यंत अस्वस्थ झालें होतें. जे हरिभाऊ कर्तृत्वाच्या आयुष्याच्या सुरवातीस महादेव चिमणाजी यांनीं पुनः पुनः प्रयत्न केले असतांही सरस्वतीची सेवा सोडून धनार्जनाचा कोणताही उद्योग करण्यास तयार झाले नाहींत व हा त्यांचा हेका पाहून महादेव चिमणाजींनीं, "तूं माझें न ऐकल्यास मी तुला माझ्या इस्टेटींतला कांहींही भाग देणार नाहीं" असें निक्षून लिहिल्यावर "मीं मुळीं तुमच्या संपत्तीचा अभिलाष केव्हांच केला नाहीं" असा खणखणीत जबाब ज्यांनीं दिला त्याच हरिभाऊंना बंगाल्यांत एक नवा रेल्वेचा फांटा बांधण्यास निघालेल्या कंपनीचा व्याप आपल्या मागें लावून घ्यावा असें वाटलें, हा योगायोगच म्हणावयाचें ! हरिभाऊंना 'करमणुकी' पासून कांहीं प्राप्ति झाली नाहीं, अगर त्यांच्या कादंबऱ्यांनींही त्यांना लक्ष्मीची जोड करून दिली नाहीं; उलट ह्या सर्व व्यवसायांत त्यांना अखेर डोक्यावर कर्जाचा बोजाच घ्यावा लागला ही आश्चर्य वाटणारी गोष्ट आहे. मेसर्स बाबाजी सखाराम आणि कंपनीचे मालक गोविंदराव डुकले यांनीं मराठी वाङ्मयाचा प्रसार करण्याचा जो उद्योग आपल्या शिरावर घेतला, त्यांतील एक मोठा भाग म्हणून हरिभाऊंची 'करमणूक' व त्यांच्या कादंबऱ्या व त्यांचें अन्य लिखाण प्रसिद्ध करण्याचें काम त्यांनीं अंगावर घेतलें, त्यांत सदर कंपनीस पुष्कळच नुकसान आली. 'आर्यभूषण छापखान्या'नें आणि महाराष्ट्रांतील या नामांकित मुद्रणालयाचे निःसीम सेवक रा. रा. केशवराव बाळ यांनीं वेळोवेळीं त्यांना जें साह्य केलें तें केलें नसतें व अखेर त्यांचे परममित्र गोपाळराव गोखले यांच्या 'सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी' तर्फे हरिभाऊंनीं आपल्या अखेरच्या मृत्युपत्रांत केलेली व्यवस्था मान्य केल्यामुळें हरिभाऊंच्या अंतकाळीं त्यांच्या मनावरील त्यांच्या कुटुंबाच्या स्वास्थ्याच्या काळजीचें दडपण दूर झालें. त्यांच्या कुटुंबाच्या आजन्मनिर्वाहाची व्यवस्था मृत्युपत्राच्या योजनेनें झाली व तिनें त्यांच्या मनाला होणाऱ्या वेदना अखेरीस दूर झाल्या.

हरिभाऊंचे चुलते अण्णासाहेब यांनीं आपल्या संपत्तींतला भाग जरी हरिभाऊंना दिला नाहीं, तथापि त्यांनीं 'आनंदाश्रम' ही संस्था स्थापन करून शिल्लक संपत्तीचा सद्व्यय केला, व त्या आश्रमाची व्यवस्था ठेवण्याचें सर्व काम हरिभाऊंच्या हातीं सोंपवून त्या 'आश्रमाचे व्यवस्थापक म्हणून योजिलें

व या व्यवस्थेप्रमाणें हरिभाऊंनीं या 'आश्रमां'त आजन्म वास्तव्य केलें. त्यांचा लेखनाचा बहुतेक सर्व उद्योग या 'आश्रमांतच' झाला. 'आश्रमा'च्या तिसऱ्या मजल्यावर त्यांची लिहावयास बसण्याची जी लहानशी खोली होती त्या खोलींत आपलें लिहिण्याचें काम ते बहुधा रात्रौ व पहांटेस करीत; केव्हां केव्हां दिवसाही ते लिहावयास बसत, पण दिवसाचा बहुतेक वेळ भेटावयास आलेल्या मंडळीशीं काव्यशास्त्रविनोद करण्यांत जाई. त्यांचें लिहिणें नियमित नव्हतें. ज्या वेळीं त्यांची प्रतिभा जागृत होई, तंद्री लागे, त्याच वेळीं त्यांच्या हातून तावाचे ताव लिहून तयार होत. अशा वेळीं तासांचे तास ते एकसारखे लिहीत बसत आणि त्यांच्या लेखणींतून कागदावर अक्षरपंक्ति झरझर उमटत जात. प्रतिभा-संपन्न लेखकांबद्दल 'वाचमर्थोनुधावति' असें जें म्हटलें आहे, तें त्यांच्या बाबतींत अगदीं खरें होतें. त्यांची भाषा अलंकारादि आभरणांनीं, संस्कृत शब्दांच्या चातुर्यानें अथवा पदलालित्यानें नटलेली नाहीं; तथापि वाचकांचें अंतःकरण ती मोहून टाकते; ती अत्यंत गोड वाटते याचें कारण वरीलच होय; अशा वृत्तींत ते जेव्हां लिहीत असत तेव्हां वर काय लिहिलें हें ते कधींही पहात नसत; ज्यावेळीं त्यांची तंद्री लागत नसे—आणि शेवटच्या दहा बारा वर्षांत असें वारंवार होऊं लागलें होतें—तेव्हां लिहिण्यासाठीं कागद पुढ्यांत घेऊन तासनूतास जरी बसले तरी त्यावर त्यांची लेखणी चालेनाशी होई. एरवीं ते एका शब्दाची खोडाखोड न करतां झपाझप लिहीत जात. 'वज्राघाता'चें पहिलें प्रकरण त्यांनीं अत्यंत सुंदर लिहिलें आहे. तें लिहिण्याची तयारी करून ते चार पांचदां बसले। पण तितक्याही वेळां पांच दहा ओळी लिहून त्यांनीं कागद फाडून टाकले. शेवटीं एका पहांटेस त्यांनीं तें सुंदर प्रकरण लिहिलें आणि त्या पुढचींही दोन प्रकरणें त्याच बैठकींत त्यांनीं लिहिलीं. 'करमणुकी'च्या सबंध अंकाचा मजकूर—कादंबरीचें प्रकरण, गोष्ट, माहिती, चरित्र, चुटके वगैरे सर्व तऱ्हेचा— ते पुष्कळदां एका अगर दोन बैठकींत लिहित असत. ते छापखान्यांतील कंपाझिटरांना अंकाची कापी सारखी पुरवीत असत व अंकास आतां पुढें मजकूर लागणार नाहीं असेंही सांगत. त्यांनीं इतक्या कादंबऱ्या लिहिल्या, पण कोणतीही कादंबरी आधीं संपूर्ण तर राहोच, पण तिचीं बरींचशीं प्रकरणें लिहून मग ती प्रसिद्ध करण्यास आरंभ केला असें कधींच झालें नाहीं. 'करमणुकी'चा अंक निघण्याचा दिवस आजउद्यांवर आला म्हणजे त्यांनीं त्या अंकाचें प्रकरण लिहावयाचें; पण तें इतकें सरस उतरावयाचें कीं तें वाचल्यावर वाचकांच्या मनाला त्याचा चटका लागून 'करमणुकी'च्या पुढील अंकाच्या आगमनाकडे तो डोळे लावून बसावयाचा. हा क्रम सतत पावशतकाहून अधिक काल चालला आणि तेवढा दीर्घकाल या श्रेष्ठ कादंबरीकारानें मराठी वाचकवर्गास गुंगत ठेविलें.

कौटुंबिक सुखाचा वांटा या कादंबरीकाराच्या भागधेयांत विधीनें लिहिला नव्हता असें म्हटलें पाहिजे. अगदीं शैशवांत मातृसुख संपलें; जुन्या वळणामुळें व जुन्या विचारांमुळें पित्याचा लळा लागला नाहीं; तारुण्यांत प्रथम पत्नी व तिला झालेलीं दोन्ही मुलें गेलीं; द्वितीय विवाह केल्यावर नव्या विचारांमुळें वडिलांच्या घरीं मानसिक त्रासांत दिवस काढावे लागले; द्वितीय कुटुंबाच्या पोटीं फार वर्षांनीं त्यांना एक मुलगी झाली, पण जन्मापासूनच तिला रोगानें ग्रासली; 'ताई' त्यांच्या डोळ्यांतील बाहुली, त्यांचा जीव कीं प्राण होती. आयुष्याच्या उतरणीजवळ ते आहेत तोंच काळानें तिला उचलून नेलें आणि यानंतर बरोबर एक वर्षानें त्यांचे परम स्नेही गोपाळराव गोखले गेले; अशीं त्यांच्या कौटुंबिक दशेंत आभाळावर आभाळें येत गेलीं, पण त्यांच्या प्रेमळ स्वभावांत, सौजन्यांत, आदरातिथ्यवृत्तींत अगर स्नेहशीलपणांत कधींही बदल झाला नाहीं. गर्वानें त्यांना स्पर्श केला नाहीं; विनयाची वृत्ति त्यांना केव्हांही सोडून गेली नाहीं; अहंभाव त्यांच्या अंतःकरणांत प्रवेश करूं शकला नाहीं; पितृभक्ताची भावना त्यांच्या हृदयांत अखंड वागत होती.

त्यांनीं वाङ्मयाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांतही पुष्कळ कार्य केलें व त्या क्षेत्रांत बहुमान मिळविला. पुण्यांतील प्रमुख पुढाऱ्यांत त्यांची गणना होती; पुणें म्युनिसिपालिटीचे ते एकवेळ प्रेसिडेंट होते; ज्या युनिव्हर्सिटीची परीक्षा ते पास होऊं शकले नाहींत त्याच युनिव्हर्सिटीनें त्यांना आपल्या अत्युच्च परीक्षेंत पुढें मराठीचे परीक्षक नेमलें; मुंबई युनिव्हर्सिटीमध्यें 'वुइलसन फायलालॉजिकल लेक्चरर' म्हणून त्यांची नेमणूक होऊन त्यांनीं सन १९१५ सालीं Marathi its sources and Development या विषयावर सहा व्याख्यानें दिलीं आहेत. सन १९१५ सालीं पुण्यास भरलेल्या पंधराव्या प्रांतिक परिषदेच्या स्वागतमंडळाचे ते अध्यक्ष होते. त्यांनीं मित्रपरिवार फार मोठा गोळा केला व त्यांत अनेक थोर थोर विद्वान् होते.

अखेर दीपनिर्वाणाचा दिवस आला. सन १९१८ च्या ऑक्टोबरांत त्यांच्या एका डोळ्यास पक्षघाताचा विकार झाला; त्यांतून बरे झाल्यावर बंगाल्यांतील रेल्वेचे शेअर खपविण्यास ते इंदूर कलकत्त्यास गेले. तेथून परत येतांना वाटेंत त्यांना जलोदराचा विकार झाल्याचें डॉक्टरांनीं सांगितलें. औषधोपचारासाठीं ते मुंबईस आले, पण दुखणें वाढत गेलें. यावेळीं सन १९१९ सालच्या मार्च महिन्याची सुरवात होती; त्या महिन्याच्या तिसऱ्या तारखेस ते मुंबईहून पुण्यास गेले. दुपारीं १ वाजतां ते आनंदाश्रमांत जाऊन पोहोंचले आणि त्याच दिवशीं सायंकाळीं त्यांच्या जीर्ण शरीराचा त्याग करून त्यांतील चैतन्य शाश्वतांत विलीन झालें.

# करमणुकीची निबंधमाला

१

## आमचें प्राचीनत्व

हिंदु लोकांनीं प्रथम ज्योतिषशास्त्र निर्माण केलें. त्यांच्या वेधांचें अत्यंत प्राचीनत्व सर्व अर्वाचीन ज्योतिष्यांस मान्य आहे. क्यासिनी, बेली व प्लेफेअर या ज्योतिर्विदांनीं असें प्रतिपादन करून ठेविलें आहे कीं, इसवी सनापूर्वीं तीन हजार वर्षांहून जास्त वर्षांचे हिंदु ज्योतिष्यांनीं घेतलेले वेध अद्याप अवशिष्ट आहेत, व त्यांवरून त्या काळीं त्या शास्त्रांत हिंदूंची पुष्कळ प्रगति झाली होती हें ठरतें. प्राचीन हिंदु लोकांनीं पंचांगांतील कालगणनेची व्यवस्था लाविली होती; ते वेध घेऊन ग्रहणें वर्तवीत व त्यांस चंद्राच्या कलांची व अनेक ग्रहांच्या गतींची माहिती होती; संपातबिंदूंच्या चलनासंबंधें टॉलेमी नामक प्रसिद्ध ग्रुनानी ज्योतिष्यास जें ज्ञान होतें, त्यापेक्षां हिंदू जोशांचें त्यासंबंधीं ज्ञान वस्तुस्थितीस अधिक धरून होतें असें कोलब्रुकसाहेबांचें मत आहे.

गणितशास्त्रांत हिंदु लोक पुष्कळ निष्णात होते. त्यांनीं दशमान पद्धति, शून्यलब्धि, पूर्णांक व सूक्ष्मांक यांचें गणित निर्माण केलें. सगळी दुनिया आंकड्यांच्या चिन्हांबद्दल त्यांच्या ऋणांत लोळत आहे. त्यांनीं भूमिति व त्रिकोणमिति हीं शास्त्रें काढिलीं. एवढेंच नाहीं, तर त्यांत त्यांची पुष्कळ प्रगति झालेली होती. गणितशास्त्रांतील सिद्धांत काढल्याबद्दल जो मान एका पायथॅगोरस यास देण्यांत येतो, त्यांतील बहुतेक मान वास्तविक प्राचीन हिंदु लोकांस दिला पाहिजे.

हिंदु लोक वैद्यकाचाही योग्य अभ्यास करीत. त्या शास्त्रास आयुर्वेद म्हणजे जीवनाचें शास्त्र असें म्हणत. औषधींच्या ज्ञानासंबंधीं विचार करितां असें दिसतें कीं, त्यास ऋग्वेदाचा आधार होता व शस्त्रविद्येसंबंधीं विचार करितां त्यास अथर्व वेदाचा आधार होता. ते त्यास ‘उपवेद’ असें

म्हणत असत. त्याची उत्पत्ति ब्रह्मदेवापासून झाली असें समजतात. चरक, सुश्रुत व वाग्भट ही वृद्ध भिषग्वर्यांची त्रयी होय. यांच्या संस्कृत ग्रंथांचीं अरबी भाषांतरें कालीफ अलमनूर याच्या कारकीर्दींत झालीं. चरकाच्या ग्रंथाचें अरबी भाषांतर इसवी सनाच्या आठव्या शतकाच्या आरंभीं झालें, व अविसेन[1], राझेज[2], व सिरापियन[3] यांच्या अरबी ग्रंथांच्या लॅटीन तर्जुम्यांत त्याचें नांव वारंवार येतें (हन्टर). सुश्रुताच्या संस्कृत शस्त्रविद्येच्या ग्रंथाचा अरबी तर्जुमा, जो 'केलाले-शा-शूर-अल-हिंदी' हा आठव्या शतकाच्या अखेरीपूर्वी झाला, त्याचा लॅटीन तर्जुमा हेप्लरनें व जर्मन तर्जुमा व्हुलर्सनें केला आहे. हे तर्जुमे युरोपियन वैद्यकाचे मूळ आधारभूत ग्रंथ होत. असे पूर्वेकडील वैद्यक ग्रंथ नेऊन युरोपियन लोक सतराव्या शतकापर्यंत तिकडील वैद्यकाची रचना करून घेत होते.

आर्यांस रसायनशास्त्राचें ज्ञान अगदींच थोडें होतें असें नाहीं. त्यांस गंधकाचा द्राव, सोन्याचा द्राव, शंखद्राव, ताम्रभस्म, लोहभस्म, शिशाचें भस्म, कथलाचें भस्म, जस्ताचें भस्म व दुसरे पुष्कळ क्षार, सोरा, गंधक व कोळसा यांचेपासून झालेले अनेक मिश्र पदार्थ यांची चांगली माहिती होती.

पाणिनि ऋषीनें प्रथम शब्दांच्या घटनेचीं सूत्रें व त्यांची व्यवस्था आपल्या अष्टाध्यायी नामक व्याकरणग्रंथांत लाविली आहे. ती इतकी अपूर्व व अप्रतिम आहे कीं, ती पाहून पूर्वेकडील व पाश्चिमेकडील पंडित तोंडांत बोट घालून राहिले आहेत. दुनियेंतील दुसरे लोकांपूर्वी कोश करण्याची कल्पना ह्या आर्यलोकांस चांगली होती. वैदिक सारस्वतादि एक कोश आहे त्यास निघण्टु असें म्हणतात.

---

१. ह्याचें खरें नांव अफ्लाटून. हा बुखाऱ्याचा राहणारा. त्याच्या ग्रंथांत चरकांतून त्रिफळ्याचें वर्णन दिलें आहे. २. हा अरबी वैद्य होता. ह्याचें खरें नांव अलरसी. त्याच्या ग्रंथांतील सुंठीचा उपयोग वाग्भटावरून घेतलेला आहे. ३. हा अरबी वैद्य होता. ह्याचें शुद्ध नांव इवन सिरानी. त्याच्या औषधिशास्त्राच्या लॅटीन तर्जुम्यांत चरकास 'शरफ इंडिया जामस' असें म्हटलें आहे.

आर्य लोकांनीं गायनविद्या फारच पूर्ण दशेला आणिली होती. त्यांनींच सा री ग म प ध नी ह्या सप्त स्वरांचा ग्राम काढिला. त्यांचें गायन व्यवस्थित, सुरस व मधुर असतें.

हिंदुस्थान हें शिल्पसंबंधीं सौंदर्याचें माहेरघर आहे. घुमट, कळस, कमानी व पुष्कळ शिल्पसंबंधीं चतुराईचीं कामें कालचक्राच्या तडाक्यांतून वांचलीं आहेत. तीं जणूं त्यांच्या सौंदर्याचें मुक्यानेंच विवरण करून राहिलीं आहेत. या कलेबद्दल प्राचीन यवन लोकांचें स्तुतिस्तोत्र गाण्यांत येतें. पण त्यांनींही हिंदु लोकांपासून जें या कलेचें शिक्षण मिळविलें आहे तें थोडेंथोडकें आहे असें नाहीं. डॉक्टर डब्ल्यू. डब्ल्यू. हन्टर यांचें असें मत आहे कीं, शिकंदर बादशहानें हिंदुस्थानांतील इमारतींच्या नकला घेण्याकरितां कांहीं कसबी लोक इकडे ठेविले व त्यांनीं त्या इमारतींची पद्धति त्यांचा स्वदेश जो ग्रीस येथें नेली.

धनुर्वेद हें जुनें शास्त्र आहे. त्यांत लढाईच्या कलेचें विवरण आहे. त्यांत निरनिराळ्या प्रकारच्या शस्त्रास्त्रांचें चार सदरांखालीं वर्गीकरण केलें आहे–(१) मुक्त; जसें, चक्र; (२) अमुक्त; जशी, तलवार; (३) मुक्तामुक्त; जसा, भाला; (४) यंत्रमुक्त; जसा, बाण. सैन्य चार प्रकारचें असेः–पायदळ, घोडेस्वार, रथी व हत्तीवर बसणारे योद्धे. त्यांचीं नांवें :–पदाति, अश्वारूढ, रथारूढ व गजारूढ.

हिंदु लोकांचे कायदे त्यांच्या धर्माइतके जुनेपुराणे आहेत. मनु हा त्यांतील अगदीं अगदीं जुना स्मृतिकार अथवा कायदे करणारा होय. व त्याच्या स्मृतीप्रमाणें हिंदु लोकांची सामाजिक व्यवस्था अद्याप लागलेली आहे. हिंदु समाजाच्या वर्णनासंबंधीं हा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे; तो निदान तीन हजार वर्षांचा जुना आहे. याज्ञवल्क्य, पाराशर वगैरे दुसरे स्मृतिकार होऊन गेले आहेत. त्यांचीं वचनेंही मोठीं प्रमाणभूत मानितात व वादांतील सूक्ष्म मुद्यांचा निर्णय करण्यास अद्याप त्यांचाही आधार दाखवितात.

तत्त्वज्ञानाच्या बाबतींत हिंदुस्थानच्या लोकांनीं इतर देशाच्या लोकांस मागें टाकिलें आहे. या विषयावर सहा दर्शनें अथवा ज्ञानाचे आरसे

आहेत; न्याय अथवा तर्कशास्त्र, संख्या अथवा भेदाभेदनिर्णयाचें शास्त्र, वैशेषिक अथवा अणुवाद, योग अथवा ध्यानवाद, मीमांसा अथवा कर्मवाद व वेदांत अथवा ज्ञानाच्या शेवटाचा वाद. ह्या सर्व दर्शनांचा मुख्य उद्देश या सृष्टीचें कोडें उकलण्याचा आहे. आपल्या लोकांत तत्त्वज्ञानाचा मोठा शोक आहे व त्या विषयांत आर्यांची चांगली गति झालेली आहे. चित् व जड यांतील भेद – म्हणजे अभेद् – कोणास प्रथम समजला असेल तर तो ह्याच लोकांस होय. इतर सर्व देशांतील लोक जडसृष्टि व तिचे धर्म यांत रममाण झाले असतां इतिहासाच्या अगदीं अरुणोदयापासून हिंदु लोक ब्रह्मज्ञानाच्या अभ्यासांत अगदीं गर्क झालेले आहेत. हिंदुस्थानांतील आर्य लोक तहाहयात असें मानून चालतात कीं, आपण या मृत्युलोकीं थोडे दिवस यात्रा करण्यास आलों आहों. तेव्हां ह्या दुनियेंतील कोणत्याही वस्तुमात्रांत आपला हिताहिताचा कायमचा गुंता आहे असें मानण्याचें कारण नाहीं. ऐहिक सुखापेक्षां पारलौकिक सुखाकडे त्यांचा मुख्य ओढा आहे, म्हणून सांप्रत कालच्या अनेक विवेकी व तत्त्वज्ञ लोकांस सृष्टीच्या अस्तित्वाच्या कोड्यांचें जें मोठें अतर्क्य गूढ पडून राहिलें आहे, त्याचा उलगडा करण्यास इतर लोकांपेक्षां ते निसर्गतः अधिक योग्य आहेत.

ह्या सगळ्या विद्या वेदग्रंथापासून उत्पन्न झाल्या आहेत. वेद हा शब्द 'विद्' म्हणजे 'जाणणें' ह्या धातूपासून उत्पन्न झाला आहे. तेव्हां वेद ह्याचा अर्थ ज्ञान असा होतो. त्यांत परमात्म्याचें ज्ञान आहे तसेंच जीवात्म्याचेंही ज्ञान आहे

## २

## इंग्रजी महिने

जेव्हां आपण महिन्यांविषयीं बोलतों, तेव्हां आपणांपुढें दोन प्रकारचे महिने उभे राहतात. एक सौर मास (Calender Month) व दुसरा चांद्र मास (Month). जानेवारी, फेब्रुवारी, मार्च इत्यादि कॅलेंडर महिने होत; चांद्र मासांना अशीं नांवें देण्यांत आलीं नाहींत. मन्थ (Month) हा शब्द इंग्रजी मून (Moon = चंद्र) या शब्दावरूनच आला आहे.

इतिहासाच्या पूर्वी बरींच युगें, चंद्राच्या आकारांत क्रमाक्रमानें फरक होत जातो हें लोकांनीं पाहिलें होतें. कांहीं वेळां चंद्र पूर्ण तेजाचा गोळा दिसतो, तर कांहीं वेळां त्याची फक्त कोरच दिसते. कांहीं वेळ तो अर्धाअधिक दिसतो तर कांहीं वेळ मुळींच अदृश्य असतो. हें चंद्राच्या आकारमानांत पडणारें अंतर नियमित आहे. हेंही प्राचीन लोकांच्या लक्षांत आलें होतें व म्हणून मनुष्यें चंद्रावरून वेळ मोजूं लागलीं. एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंतच्या काळाला ते दिवस असें म्हणत व काळाच्या मोठ्या भागाला त्यांनीं महिना असें नांव दिलें असावें. आज इंग्रजी महिन्याविषयीं आपणास विचार करावयाचा आहे.

दुसरी एक गोष्ट त्या काळच्या लोकांनीं पाहिलीसें दिसतें; ती ही कीं, ऋतु क्रमानें येतात व क्रमानेंच जातात. ऋतूंचा तोच क्रम पुन्हां येण्यास १२ महिने लागतात हेंही त्यांना माहित होतें. महिन्यापेक्षांही मोठ्या वेळाविषयीं बोलावयाचें म्हणजे "इतके उन्हाळे" "इतक्या हिंवाळ्या-पूर्वी" असें ते म्हणत. वर्षाच्या ऐवजीं हे शब्द अजूनही आपण उप-योगांत आणतों. "तुला दोन पावसाळे जास्त आहेत," "त्यानें

५० उन्हाळे पाहिले आहेत " या वाक्यांतून वरील अनुवाद केलेला दिसून येईल.

कालांतरानें माणसें जास्त शहाणीं होऊं लागलीं. त्यांनीं शांतपणान व काळजी घेऊन खगोलविद्येचा अभ्यास केला. त्यांना असें दिसून आलें कीं, हिंवाळ्याच्या मध्यभागापासून उन्हाळ्याच्या मध्यभागापर्यंत सूर्य आकाशांत वरवर उगवतो व दिवस हळूंहळूं मोठा होत जातो. वर्षांतील सर्वांत लहान दिवस हिंवाळ्यांत असतो आणि उन्हाळ्यांत सूर्य अतिशय वर आल्यामुळें वर्षांतील मोठा दिवस त्या ऋतूंत असतो.

ह्याप्रमाणें एका उन्हाळ्याच्या मध्य दिवसापासून दुसऱ्या मध्य दिवसापर्यंत ते एक वर्ष धरीत. त्यांच्या वर्षाचे दिवस ३६५ असत. आपणांस आतां माहीत झालें आहे कीं, खरें वर्ष याहून जरा लांब म्हणजे ३६५¼ दिवसांचें असतें.

जरी वर्ष कसें मोजावें हें माहीत होतें, तरी पुष्कळ वर्षेंपर्यंत तिकडील लोक महिने चंद्रावरून ठरवीत. ह्यामुळें फार घोटाळा उडूं लागला. कारण चांद्रवर्षांत ३५४ दिवस असतात व सौरवर्षांत ३६५ दिवस असतात.

ही अडचण टाळण्याकरितां मधून मधून आणखी एक महिना धरावा असें ठरलें. प्राचीन काळीं ज्यू लोक व रोमन आणि ग्रीक लोक आपलीं पंचांगें अशाच रीतीनें करीत. ही मधून मधून महिना घालण्याची पद्धत आपणांकडे अजून चालू आहे; ह्या महिन्यास आपण अधिक महिना—धोंड्याचा महिना—असें म्हणतों.

पण हल्लींची जी युरोपमधील पंचांगाची पद्धत आहे, ती रोमन महापुरुष ज्युलिअस सीझर यानें सुरू केली. प्रत्येक इतिहास वाचणाराला ह्या ज्युलिअस सीझरचें नांव माहीत असलेंच पाहिजे; कारण इंग्लंडावर पहिली रोमन स्वारी ह्यानेंच केली. जगांत जे मोठमोठे वीर होऊन गेले, त्यांत ह्याचा नंबर बराच वर किंबहुना पहिला लागेल. पण तो केवळ योद्धा म्हणूनच प्रसिद्ध नाहीं तर तो मोठा राजकारणी, कायदे करणारा आणि अतिशय विद्वान् लेखक अशी त्याची कीर्ति आहे.

ज्युलिअस सीझरनें असें ठरविलें कीं, साधारण वर्ष ३६५ दिवसांचें असावें व प्रत्येक चौथें वर्ष ३६६ दिवसांचें असावें.

रोमन लोकांचा देव जेनस ( Janus ) ह्याच्यावरून पहिल्या महि-न्याला जानेवारी असें नांव मिळालें. आपल्याकडे जशी कोणत्याही कार्याचे प्रारंभी गणपतीची पूजा करितात, त्याप्रमाणेंच रोमन लोकांमध्यें जेनस ह्या देवाची अर्चा करीत असत. जेनस ह्याच्या देवळाचे सर्व दरवाजे फार पवित्र मानीत व विशेषतः ज्या दरवाजानें रोमन लोक युद्धाकरितां बाहेर जात तो दरवाजा फारच पूज्य मानला जात असे. ह्या जेनस देवाच्या देवळाचे दरवाजे शांततेच्या काळीं बंद असत, पण लढाई सुरू असली कीं ते दरवाजे अहोरात्र उघडे ठेवीत असत.

जेनस ह्या देवाला दोन मुखें आहेत असें रोमन लोक मानीत व त्याच्या मूर्तींतही दोन मुखेंच असत. त्यामुळें त्याला पाठीमागें व पुढें दोन्ही बाजूला पहातां येत असे. त्याचप्रमाणें जानेवारी महिना वर्षाच्या प्रारंभीं असल्यामुळें त्याला जुन्या व नव्या वर्षाकडे बघतां येतें. सीझरनें जानेवारी महिन्यांत ३१ दिवस असावे असें ठरविलें व अजून तीच पद्धत चालू आहे.

दुसऱ्या महिन्यांत रोमन लोकांचा एक शुचिर्भूत होण्याचा–आपल्या श्रावणीप्रमाणें विधि असे. ह्या विधीचें नांव 'फेब्रुआ' ( Februa ) असें होतें. ह्या विधीवरूनच दुसऱ्या महिन्याला फेब्रुवारी असें म्हणूं लागले. सीझरच्या नियमाप्रमाणें फेब्रुआरीचे नेहमीं २९ दिवस असावे. पण प्रत्येक चवथ्या वर्षीं ( Leap year ) ३० दिवस धरावें. तथापि एंपरर ऑगस्ट ह्यानें कांहीं कारणाकरितां २९ चे २८ व ३० चे २९ दिवस केले.

रोमन लोकांची युद्धदेवता 'मार्स' ( Mars ) मंगळ ही होय. त्याच्या स्मरणार्थ तिसऱ्या महिन्याला मार्च असें नांव देण्यांत आलें. रोम शहर ज्यानें स्थापन केलें त्या रोम्युलसचा मार्स हा बाप अशी समजूत होती; तेव्हां अर्थातच मार्सची मोठ्या देवळांत गणना होऊं लागली. सीझरनें पंचांग बदलण्यापूर्वीं मार्च हा वर्षांतला पहिला महिना असे.

रोम शहरांत मार्सचीं पुष्कळ सुंदर देवालयें होतीं. त्याचे उपासक त्याच्यापुढें चिलखतें व शिरस्त्राणें घालून नाचत व कांहीं विशेष समारंभाचे वेळीं त्याला एक घोडा बळी देत. ज्या वेळीं रोमन लोक लढाईस जात, त्यावेळीं ते आपल्याबरोबर मार्स देवाला अर्पण केलेलीं बदकें पिंजऱ्यांत घालून नेत; जर बदकांनीं पिंजऱ्यांतले दाणे ताबडतोब खाऊन टाकले, तर मार्स रोमन लोकांवर संतुष्ट झाला असें ते मानीत; पण जर त्या पक्ष्यांनीं धान्य न खातां आपलीं तोंडें वळविलीं, तर त्या दिवशीं रोमन लोकांचा पराजय होणार असें ते समजत असत.

मार्च महिन्यांत ३१ दिवस असावे असें ठरलें. पाश्चात्यांच्या समजुतीप्रमाणें मार्सचें शील जसें युद्ध, तसेंच या महिन्यांत निसर्गाचें जणूं युद्धच सुरू असतें.

चवथ्या महिन्याचें एप्रिल असें नांव पडलें. एप्रिल हा शब्द 'उघडणें' या अर्थाच्या एका लॅटीन (Aperire) शब्दापासून आला आहे. ह्याच महिन्यांत झाडांना पालवी फुटते व निसर्ग आपल्या हिंवाळ्याच्या झोंपेंतून जागें होतें. एप्रिल महिन्याचे सीझरनें ठरविल्याप्रमाणें अजून ३० दिवस कायम आहेत. ह्या महिन्याच्या पहिल्या दिवसाला "सर्व मूर्खांचा दिवस" (All fool's day) असें नांव आहे. ह्या दिवशीं कोणाला कांहीं चांगलासा उद्योगधंदा नसेल, तर तो दुसऱ्याच्या चेष्टा करण्यांत आपला वेळ घालवितो. ही पद्धत फारच जुनी आहे. पण 'एप्रिल फूल'ची उत्पत्ति केव्हां व कशी झाली याचा अद्याप शोध लागला नाहीं.

'मे' हा पांचवा माहिना होय. पाश्चात्य पुराणांत ॲट्लास (Atlas) या नांवाचा एक राक्षस होता. हा आपल्या खांद्यावर पृथ्वीला तोलून धरतो अशी समजूत होती. ह्याला एक मेया (Maia) नांवाची मुलगी होती. हिच्या स्मरणार्थ ह्या महिन्याला 'मे' अशी संज्ञा प्राप्त झाली, असें कांहींचें म्हणणें आहे. पण कांहींच्या मतें 'वाढणें' या अर्थाच्या लॅटीन धातूपासून हें नांव निघालें असावें.

हें खरें असो वा नसो, मे महिन्यांतच सर्व वस्तूंची वाढ होते यांत शंका नाहीं. ह्याच महिन्यांत झाडांना व वनस्पतींना हिरवीगार पालवी फुटते; आणि फुलांना नुसता भर येतो. इंग्लंडांत पूर्वी मे महिन्याच्या पहिल्या दिवशीं मोठा आनंदोत्सव साजरा करण्यांत येत असे. त्या दिवशीं गांवांतील सर्व मुलें जमून नाचत व गाणीं गात. सर्वांत सुंदर अशी एक मुलगी निवडून तिला फुलांच्या पोषाकानें सजवीत व तिला वसंतलक्ष्मी ( May Queen ) असें म्हणत. शहरांतून ही चाल बहुतेक नाहींशीच झाली आहे. पण खेडेगांवांतून ती कोठें कोठें दृष्टीस पडते. मे चे दिवस ३१ आहेत.

सहावा महिना जून. जूनो ( Juno ) ह्या रोमन देवतेच्या किंवा जूनिअस ( Junius ) ह्या मोठ्या घराण्याच्या सन्मानार्थ हें नांव देण्यांत आलें. तारीख २१ जून हा वर्षांतला अतिशय मोठा दिवस होय.

जुलै महिन्याला रोमन लोक क्विंटीलिस ( Quintilis ) पांचवा असें म्हणत, कारण मार्च हा जेव्हां पहिला महिना होता, तेव्हां जुलै महिना अर्थात् पांचवा असे. जुलीयस सीझर ह्या महिन्याच्या पंधराव्या तारखेस येशू ख्रिस्ताच्या पूर्वी शंभर वर्षें जन्मला. जुलीयस सीझरच्या स्मरणार्थ ह्या महिन्याला जुलै म्हणूं लागले.

आगस्टस सीझर, रोमन बादशाहा, ह्याच्यावरून आठव्या महिन्याला आगस्ट हें नांव मिळालें. याचें मूळ नांव ऑक्टेव्हिअस असें होतें. पण याचें राज्य इतकें उत्कृष्ट झालें कीं त्याला ऑगस्टस ( थोर ) असें नांव मिळालें. ह्याच्या राज्यांतील कांहीं मुख्य गोष्टी या महिन्यांत घडून आल्या म्हणून त्या महिन्याला 'ऑगस्ट' असें नांव प्राप्त झालें. जुलीअस सीझरच्या नियमाप्रमाणें ह्या महिन्यांत ३० दिवस होते; पण कोणाला मत्सर वाटूं नये म्हणून या महिन्याला आणखी एक दिवस देण्यांत आला व दिवसांची संख्या तीच राहण्याकारितां फेब्रुवारींतला एक दिवस कमी करण्यांत आला. तेव्हांपासून फेब्रुवारीचे २८ दिवस व लीप ईअरच्या वर्षी २९ दिवस धरावे असें ठरलें.

नववा महिना सप्टेंबर होय. लॅटीन शब्द Septem ( सातवा ) यावरून हा शब्द निघाला. कारण वर्षारंभ मार्चमध्यें होता, तेव्हां हा महिना सातवाच असे. त्याचप्रमाणें लॅटीन Octo ( आठ ), Novem ( नऊ ), व Decem (दहा) ह्या शब्दांपासून आक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर हे शब्द निघाले.

सॅक्सन लोक नोव्हेंबर महिन्याला 'रक्ताचा महिना' असें म्हणत. कारण ह्याच वेळीं ते आपल्याला खाण्यायोग्य अशा प्राण्यांचा संहार करीत.

इंग्लंडांत नोव्हेंबरच्या पांचव्या तारखेला 'गाय फाक्सचा दिवस' ( Guy Fawkes' Day ) असें म्हणतात. १६०५ सालीं ह्या तारखेला गाय फॉक्स ह्यानें 'पार्लमेंट हाऊस' उडवून देण्याचा प्रयत्न केला होता.

डिसेंबर महिन्यांत ख्रिस्ती लोकांचा मोठा सण 'नाताळ' हा येतो. आपणांस जशी दिवाळी तसा हा सण त्यांना फार प्रिय असतो. डिसेंबर महिन्याची २५ वी तारीख येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस म्हणून पाळली जाते.

३

## गृहशिक्षण

पहिली आणि महत्त्वाची वर्तणुकीची शाळा घर होय. प्रत्येक मनुष्याला नैतिक शिक्षण बरें अगर वाईट घरांतच मिळतें. ज्या संवयी त्याला घरीं लागतात त्या जन्मभर त्याच्या अंगीं खिळून राहतात. कोणी म्हणतात 'केल्यानें देशाटन', कोणी म्हणतात 'पंडित मैत्री', परंतु गृहशिक्षणाखेरीज नैतिक शिक्षण बळावत नाहीं. घरांत मनुष्य मनमोकळा राहतो आणि म्हणूनच त्या हृद्याच्या उघड्या पेटींत चांगलें सामान ठेवितां येतें. बुद्धि जागृत होते व वर्तणुकीला वळण लागतें. घरांत लहान मुलांच्या मनावर जीं नीतितत्त्वें बिंबलीं जातात, त्यांपासून तो म्हातारपणापर्यंत ढळत नाहींत, तेंच त्याचें सार्वजनिक मत होतें. इतकेंच नव्हे,तर त्याचा तो राष्ट्रीय शब्द असतो; आणि एकानें म्हटलें आहे कीं, 'बाळंतिणीच्या खोलींतून राष्ट्रीय स्वतंत्र हवा बाहेर पडते व ज्यांना घरांत शिक्षण देतां येतें त्यांना राष्ट्रालाही शिक्षण देतां येईल. मुलगा घरांतील शिक्षण घेऊन बाहेर पडला कीं तो नागरिक बनतो. तेव्हां सुधारणेची खरी शाळा घर नव्हे का? मनुष्य जन्माला निराधार येतो. त्याचें पोषण व शिक्षण दुसऱ्यावर अवलंबून असतें. जसें त्याला खाऊं घालाल तसा तो मल्ल होईल आणि जसें त्याला शिक्षण द्याल तसा तो शहाणा, वेडा, शूर, भित्रा, पुण्यवान्, पापी या प्रकारचा निवटला जाईल. एकंदरींत मुलांचा दोष पालकांच्या माथीं आहे. मुलांना शिक्षण केव्हां द्यावें याला नेमका दिवस नको. पहिल्या श्वासापासून त्याच्या शिक्षणाला सुरुवात करा. त्याला घाण हवेंत ठेवूं नका म्हणजे तो पुढें कधींही घाणींत राहणार नाहीं. एका बाईनें धर्मोपदेशकाला विचारलें कीं, 'महाराज, मी आपल्या मुलाला शिक्षणासाठीं केव्हां पाठवूं?' तेव्हां तो म्हणाला, 'बाई, तुमच्या मुलाचीं

चार वर्षे वाया गेलीं ! त्या वेळीं तो मुलगा चार वर्षांचा होता. शिवाय मुलें हीं अनुकरणप्रिय असतात; तेव्हां त्यांच्यासमोर वडिलांनीं चांगलें वागावें. निदान त्यांना वाईट संगतीपासून दूर ठेवण्याची खबरदारी घ्यावी. तेव्हां 'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात' ही म्हण कांहीं खोटी नाहीं. जशी सकाळ म्हणजे दिवसाचा प्रारंभ तसेंच बाळपण म्हणजे आयुष्याचा प्रारंभ. कोमल रोपट्यांना फार जपावें लागतें. त्यांना जमिनींत कीड लागण्याची भीति असते; तेव्हां माळी त्यांना कुंड्यांत ठेवतो तसेंच दुर्गुणांचे जंतु मुलाच्या निर्मळ हृदयांत न शिरण्याकरितां त्याला घरांतच ठेविलें पाहिजे. प्रथमतः मूल विश्वाच्या वेशींत प्रवेश करतें नंतर त्याला विश्वचमत्कार दिसून तें अनुकरण करावयास लागतें. त्याची क्रिया नजर टाकण्याची, न्याहाळून बघण्याची, पूसतपास करण्याची, मत बनविण्याची अनुक्रमेंच चढत जाते. तसेंच, काय शिकावें न शिकावें, बऱ्यावाईटांची तुलना करून कोणतें स्वीकारावें ह्याचा विचार त्याच्या डोक्यांत सुरू राहतो. जसें फुललेल्या कापसावर विस्तवाची ठिणगी पडतांच तो पेट घेतो, तद्वत् मुलाच्या उकललेल्या हृदयावर पाहिलेल्या गोष्टीचा त्वरित ठसा उमटतो. मुलाचें मत सहज बनतें; पण शेवटपर्यंत टिकतें. मुलाचें आयुष्य आरशासारखें आहे. कारण त्याचें प्रतिबिंब आयुष्यभर पडलेलें असतें. आनंदानें, दुःखानें, जयानें, पाडावानें त्याच्या आयुष्याचा पाया भक्कम अगर पोकळ होतो. कांहीं गोष्टी परिस्थितीवर अवलंबून असतील किंवा मोठा मनुष्य आत्मसंयमनानें वाईट गोष्टींच्या तावडींत सांपडणार नाहीं. पण लहानपणींच चांगल्या संवयी लावून घेणें बरें, म्हणजे परिस्थितीचा खेद नाहीं व आत्मसंयमन करण्यासाठीं जीवाला क्लेश देणें नको. एकाद्या तत्त्वज्ञान्याला चोरांनीं गांठलें, लुटलें आणि मारलें तर तो समाधान मानील; परंतु बालपणापासून तो तत्त्वज्ञानी राहिला पाहिजे. ज्या घरांत प्रीतीचा पाश, कर्तव्याची दक्षता, दिनचर्येचे नियम, राजदंडाचें भय आणि नीतीचें महत्त्व सांगितलें जातें, त्या घरांतलें मूल तें सन्मार्गानें आणि मुत्सद्दीपणानें जगांतून चाललें पाहिजे, असा आजपर्यंतचा अनुभव आहे.

एक ग्रीक तत्त्ववेत्ता म्हणतो कीं, ‘मुलांना शिक्षण गुलामाकडून द्या कीं हवे तितके गुलाम पैदा होतील.’ सृष्टींतील सर्व पदार्थ आणि देखावे मुलांवर अनुकरणकारक परिणाम करितात. मुलाचें पहिलें अनुकरण त्याची आई होय. एक जण म्हणतो कीं, ‘एक आई शंभर शिक्षकांचें काम करूं शकेल. न बोलतां न मारतां जर कोणी शिक्षण देत असेल तर ती फक्त आईच. खरें म्हटलें असतां घरांत राज्य आईचेंच असतें. कारण तिचाच सर्व मुलांना धाक असतो. बापापेक्षां आईच्या सहवासांत मुलांचा काळ अधिक जातो.’ इमर्सन म्हणतो कीं, ‘सुधारणेचा बराच भाग आयांच्या पदरांत टाकावा लागेल.’ एक ख्रिस्ती मनुष्य म्हणतो कीं, ‘माझ्या आकाशांतील बापा’ ही प्रार्थना जर त्याच्या आईनें त्याला शिकविली नसती तर तो नास्तिक झाला असता. एवढ्यासाठीं बालपणांतील शिक्षणाची संधि मुलांनीं वायां दवडूं नये.

# ४

## निद्रा

**निद्रायत्तं सुखं दुःखं पुष्टिः कार्श्यं बलाबलम् ।**

— वाग्भटः

यथास्थित जेवणखाण होऊन चार गप्पाटप्पा झाल्या; दहाचा सुमार झाला कीं मऊशा गादीवर पडून गुलगुलितशा दुलईनें आच्छादित होऊन हलकेंच आपण झोंपी कां जातों, आणि झोंपी जाणें अगदीं आवश्यकच कां आहे, याचा कधीं आपण विचार केला आहे काय ? झोंपेचें महत्त्व काय आणि तिनें आपणांस एकदम सोडलें तर आपली दशा काय होईल हा प्रश्न आपल्या मनांत कधीं उत्पन्न झाला आहे ? आपली रोजची वेळ झाली कीं शरीर सुस्तावूं लागतें, डोळे ताटकळल्यासारखे होतात, त्यांच्यावर झांपड पडते आणि पापण्याशीं पापण्या घट्ट मिठी मारून बसतात, हें आहे तरी काय ?

निद्रावस्था ही एक शरीरास मोठी विलक्षणच अवस्था येते. या अवस्थेच्या तावडींत आपण सांपडलों म्हणजे मग सगळीं आपलीं इंद्रियें आपापले व्यवसाय थांबवितात. मग कांहीं दिसायचें नाहीं, कांहीं ऐकूं यायचें नाहीं, कांहीं भासायचें नाहीं, कशाचा वास यायचा नाहीं, कशाची रुचि नाहीं, कशाचें ज्ञान नाहीं, कशाचा विचार नाहीं, स्मरण नाहीं, कल्पना नाहीं. या चट साऱ्या आपल्या शक्ति आपला परित्याग करून जातात. कशाही महत्त्वाच्या उद्योगांत गुंतलेले असा, कीं कोण-च्याही मन वेधणाऱ्या करमणुकींत गढलेले असा, या कुंभकर्णप्रियेनें आपले मोहपाश तुमच्यावर टाकले, कीं सर्व व्यवसायांची इतिश्री झालीच ! शरीर व मन दोन्हींही गाढ अंधकारांत निमग्न होऊन जातात. ही महामाया एकट्या माणसासच आपल्या मोहपाशांत पकडते

असेंही नाहीं; सगळ्या चरविश्वावर हिचा अंमल असतो. लहान मूल हिच्या मोहपाशाच्या आधीन होतें, त्याचप्रमाणें अत्यंत वृद्ध पुरुषही होतो. हिच्या तावडींतून सुटण्याचा प्रयत्न करणें दुरापास्त. आजपर्यंत तें कोणास साध्य झालें नाहीं. मनुष्य कितीही बलवान् असो, निद्रेचा ताबा त्याच्यावर आहेच. मनुष्य कितीही चतुर पंडित असो, झोंपेच्या ऐवजीं दुसरें कांहीं काढीन म्हणेल तर अशक्य!

मनुष्यास मात्र झोंप येते असें नाहीं. पशुपक्ष्यांसही झोंप पछाडतेच. त्यांपैकीं कित्येक तर मासानुमास निद्रेंत घालवितात. पक्षी आपल्या घरट्यांत जाऊन निजतात. कीटक आपले व्यापार बंद ठेवून स्वस्थ निजतात. मासेही आपल्या जलगृहांत निद्रित होतात. एवढ्यानेंच संपलें नाहीं. वनस्पतिकोटींतही तीच अवस्था आहे. रात्र झाली रे झाली, कीं झाडें आपलीं पानें मिटूं लागतात. फुलें मिटून खालीं वळतात. कित्येक पक्षी आपल्या पंखांनीं आपलीं डोकीं झांकून झोंप घेतात; त्याप्रमाणें कित्येक फुलझाडें आपल्या फुलाभोंवतीं आपलीं पानें ठेवितात. जीवमात्रास विश्रांति ही अवश्य. सर्व चराचर सृष्टीला श्रांति आली म्हणजे ती घालविण्यास निद्रेसारखें अमृतमय औषध नाहीं, ही गोष्ट खास. निद्रा ही अत्यंत अवश्य. हें व्यापाराचें एक अंगच आहे. दिवस हा व्यवसायासाठीं; रात्र ही विश्रांतीसाठीं. वनस्पतींच्या वर्धनासाठीं व विकासासाठीं वसंत व ग्रीष्म यांची योजना, त्याप्रमाणें शरद् व हेमंत यांची त्यांच्या परिपक्वतेसाठीं व विश्रांतीसाठीं योजना आहे. आमच्या शरीराची रचनाच अशी आहे कीं, कांहीं काळ उद्योग आणि कांहीं काळ विश्रांति अशी परंपरा फारच आवश्यक; त्यावांचून शरीर चालावयाचेंच नाहीं. मनुष्यांत आणि एकाद्या यंत्रांत जो फरक आहे तो हाच. वाफेच्या यंत्रास कधीं विश्रांति लागत नाहीं, त्याला कधीं थकवा येत नाहीं. एकदां चालूं करून त्याची वाफ सरू दिली नाहीं, म्हणजे एकसारखें टक् टक् टक् टक् चालूं असतें. जेव्हां एकादें चाक, नाहीं तर दुसरें कांहीं मोडेल तेव्हां तें बंद पडलें तर पडायचें, नाहीं तर आपलें त्याचें गाडें सुरूच. त्याला कांहीं बदल नाहीं, भिन्न प्रकार नाहीं,

कोणाची सोय, कोणाची गैरसोय पाहाणें नाहीं, राग नाहीं, लोभ नाहीं, दुःख नाहीं, सुख नाहीं; सुरू केल्या मार्गानें विघात होईपर्यंत धोपट चालावयाचें एवढें त्यास टाऊक. अशीच जर आपली माणसाची स्थिति असती, तर आपलें जिणें फारच असह्य झालें असतें. सकाळ नाहीं, संध्याकाळ नाहीं, रात्र नाहीं असा आपला एक दिवसच जर असता तर जिणें दुःसह झालें नसतें तर काय? मनुष्य नानाविध प्रकारांचा मोठा चाहता. यामुळें त्याला कांहीं वेळ उद्योग तर कांहीं वेळ विश्रांतिही फार जरूर.

तेव्हां विश्रांतीची इच्छा ही अगदीं स्वाभाविकच आहे. या जीवदशेच्या सुव्यवस्थितपणास परिमाणानें विश्रांति अवश्यच आहे. मन, शरीर व आत्मा या त्रयीला पूर्ण विश्रांतीचा असा कांहीं काळ अगदीं अवश्यच. ज्या मस्तकांतला मेंदू अहोरात्र व्यापृत असेल, तें मस्तक व तो मेंदू फार काळपर्यंत सुस्थितींत राहणें शक्यच नाहीं. अगदीं गाढ, एक सारखी बराच वेळ नियमित व अबाधित अशी झोंप आपल्या प्रत्येकास पाहिजेच पाहिजे. कारण शरीराच्या भिन्न भिन्न अवयवांना, स्नायूंना व तंतूंना या निद्रेमुळें विश्रांति मिळते, इतकेंच नव्हे, तर अन्नपचनाचा व अन्नसंमेलनाचा व्यापार निद्रावस्थेंत स्वस्थपणें होऊन शरीरस्वास्थ्य फार चांगल्या तऱ्हेनें लाभतें. ज्या कित्येक इंद्रियांच्या क्रिया सतत चालाव्या लागतात, त्या इंद्रियांस सुविश्रांति अवश्य असते. काळीज, फुप्फुस व नाड्या यांना क्रिया आहे आणि विश्रांतिही आहेच. आपलें काळीज धडधड करीत असतें, हा त्याचा उद्योग होय. परंतु एकदां धड्‌ होऊन दुसऱ्यानें धड्‌ होण्याच्या दरम्यानचा वेळ काळजाच्या विश्रांतीचा वेळ होय. काळीज अहोरात्र म्हणजे २४ तास उडतें असा आपला समज आहे. परंतु आतां सांगितलेला दोन दर ठोक्यांच्या मधला वेळ गणून पाहिला, तर २४ तासांत ६ तास त्याची विश्रांति जाते असें होतें. त्याचप्रमाणें श्वासोच्छ्वासक्रियेचें पृथक्करण केलें तर असें दिसून येतें कीं, त्या क्रियेचे तीन भाग पडतात: १ श्वास, २ उच्छ्वास, ३ मध्यंतरींची विश्रांति. २४ तासांपैकीं ८ तास श्वास, ८ तास उच्छ्वास आणि

८ तास विश्रांति अशी वांटणी होते. अशीच स्थिति शरीरांत क्रिया करणाऱ्या सर्व इंद्रियांची आहे.

आपण आपल्या फाजील वर्तनानें विनिद्रता आणूं शकतों असें नाहीं. असे कित्येक लोक आहेत कीं, झोंप घालवावयाचीं औषधें घेऊन अभ्यास अगर दुसरें कांहीं मानसिक काम करितात, पण त्याचा अखेर परिणाम काय होतो ? त्यांच्या मेंदूची संकोचशक्ति अगदीं नाहींशी होते आणि शेवटीं त्यांस मुळींच झोंप येईनाशी होते. शेवटीं प्रकृति अत्यंत बिघडते, वर्षानुवर्षें अंथरुणावर पडून काढावीं लागतात अगर वेड्याच्या इस्पितळाचा आश्रय करावा लागतो. मनुष्य आजारांतून मुक्त झाला असें समजण्यास उत्तम चिन्ह झोंप येणें हें होय. झोंप येत नसल्यास ती आणण्याचा उपाय करणें हा फार उत्तम उपाय. झोंप नादुरुस्त इंद्रियांस आपले व्यापार सुरळीतपणें करण्यास लाविते आणि त्यांच्या आरोग्यावस्थेस त्यांस आणते.

५

## रणवाद्यांचा मोहकपणा

हें प्रत्येकजण कबूल करील कीं, वाद्यांच्या ठायीं अद्भुत मोहकपणा असतो. स्वास्थ्य वा विग्रह यांपैकीं कांहींही चाललेलें असो, तरी आम्हांस हें ठाऊक आहे कीं, त्या शक्तीनें हस्तें परहस्तें मनुष्याचें बरें करून त्यांस उत्तम कामें व मोठमोठे पराक्रम करण्यास लाविलें आहे. गायनवादन हें जसें मनुष्यास प्रिय असतें, तसें तें पशूसहि प्रिय असतें. भगवद्भक्त नारद व तुंबरू ह्यांस जसें तें आवडतें, तसें तें नाग व हरिणें यांसहि आवडतें. हरिणांचें ज्ञान तें काय? पण चांगल्या गायनवादनाची खरी परीक्षा त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही प्राण्यास नसते असें म्हणतात. स्वर्गांत इंद्राच्या वाड्यांत गंधर्व व अप्सरा यांच्या गाण्याचा जलसा चालला तर तेथें काय होत असेल तें कोणीं सांगावें? पण अलीकडे ऐतिहासिक काळांत अकबराच्या दरबारांमध्यें तानसेन गाऊं लागला म्हणजे हरणें तृणांकुर खातांना तीं तें खावयाचें अर्धेंच विसरत असत असें म्हणतात. नागासारखा दुसरा रागीट व दुष्ट प्राणी कोणीं पाहिला आहे काय? पण गारुड्याची पुंगी वाजूं लागली कीं, तो वेडावून आपपर भाव इतका विसरतो कीं, त्यास त्या गारुड्यानें धरण्याचा किंवा मारण्याचा प्रयत्न केला तरी तो त्यास समजत नाहीं, इतका तो बेभान होतो. ईश्वराचे गुणानुवाद गात असतां आमचे भगवद्भक्तही असेच तल्लीन झाल्याचीं उदाहरणें आमच्या पुराणेतिहासांत अनेक आहेत.

२ वीणा, रुद्रवीणा, सारंगी, सतार, अथवा पेटी यांचे स्वर कितीही सूक्ष्म व मधुर असोत; ताऊस अथवा व्हायोलिन यांचें स्वरमाधुर्य कितीही हृदयंगम असो; मुरली अथवा हार्प यांच्या वादनानें कुंजांमधील रासक्रीडा अथवा बॉल यांतील प्रेमप्रयुक्त मधुर कूजितांचीं कितीही

आठवण होवो, पण रणवाद्यांचा मोहकपणा त्यांत आहे असें आम्हांस वाटत नाहीं.* कारण रणभेरी, शंख आदिकरून वाद्यांचा दणदणाट व भुभुःकार अथवा लष्करी बॅण्डचे विचित्र उंच व कर्कश ध्वनि यांच्या योगानें साहसाचीं, शौर्याचीं व पराक्रमाचीं कृत्यें करण्यास जसें हृदय प्रवृत्त होतें, तसें तें दुसऱ्या कोणत्याही वाद्यानें होत नाहीं. सर्व वाद्यांमध्यें हीं वाद्यें अत्यंत उत्तेजक व जणूं वीरमंत्रानें भारलेलीं असतात. रणवाद्यांवर वीरमंत्राची भारणी झाली नाहीं, तर समरांगणावर श्रम व कावाडकष्ट यांनीं बेदम झालेले अनेक वीर केवळ निस्त्राण व हतवीर्य होऊन रणभूमीवर पडतात.

३ आपलें रामायण व महाभारत हीं वाचलीं, किंवा मराठे आदिकरून हिंदूंच्या बखरी वाचल्या, किंवा प्रचलित चालीरीतीचें अवलोकन केलें तर असें दिसून येतें कीं, 'भों भों,' शंख वाजूं लागले कीं भारती वीर किंवा 'गनीम आलारे गनीम आलारे, गनीम आला,' अशीं शिंगें वाजूं लागलीं कीं, मराठी वीरांचे बाहु स्फुरण होऊन व छाती वाढून त्यांच्या अंगरख्याचे बंद तटतटां तुटत असत व दुंदुभी आदिकरून दुसरीं रणवाद्यें वाजूं लागलीं कीं, आपल्यापेक्षां शत्रु कितीही जास्त असले तरी त्यांवर बिनदिक्कत चालून जाऊन ते त्यांस चीत करीत असत व त्यांच्या योगानें धारातीर्थांत स्नान करण्यास त्या शिपायांस उत्सुकता प्राप्त होत असे; एवढेंच नाहीं, तर त्या शिलेदारांच्या घोड्यांसही अवर्णनीय त्वेष उत्पन्न होत असे. कारण, घोडे व दुसरीं अनेक मुकीं जनावरें यांस वाद्यांच्या शक्तीचें सूक्ष्म ज्ञान असतें; पण प्रस्तुत 'मरेंगे तब हटेंगे' अशा मराठे वीरांच्या संरक्षणाचा सर्व मक्ता दयाळू इंग्रज सरकारकडे सर्वस्वीं गेला आहे, तेव्हां त्या गोष्टींचा अनुभव त्या मराठ्यांस स्वतंत्रपणें घेतां येणार नाहीं. पण त्या इंग्रज सरकारच्या पलटणींतील बॅण्डचे रोजच्या राबत्याचे स्वरमेळ निघूं लागले म्हणजे त्यांच्या रणवारूंची कमानदार मान, फुरफुरणाऱ्या नाकपुड्या, राजा-

* गायनवादनकला प्रथम हिंदुस्थानांतून ग्रीस देशांत व तेथून इतर देशांत पसरली असें म्हणतात. सप्तस्वर व तालमेळ ह्यांचें साम्य या गोष्टींची साक्ष देतें.

सारखी ऐट व अप्रतिम पदविन्यास म्हणजे पावलें टाकणें यांचा अत्यंत सुंदर देखावा पहाण्यास त्यांस किंवा दुसरे कोणांस मनाई आहे असें नाहीं. तर मार्च किंवा कूच करीत असतां त्या रणवाद्याचा परिणाम मनुष्यांचे निष्कपटी मित्र जे घोडे यांजवर कसा व काय होतो हें पहाण्याची संधि येईल तेव्हां ती त्यांपैकीं कोणींही वायां जाऊं देऊं नये.

४ 'का इरा'—आमच्या वाचनांत युरोपियन वाद्यांच्या परिणामाचीं कांहीं उदाहरणें आहेत; त्यांतील त्या रणवाद्यांच्या शिपायावरील परिणामाचें उत्कृष्ट उदाहरण म्हटलें म्हणजे 'फॅमकार्स' येथील फ्रेंचांच्या पराजयाच्या वेळचें आहे. त्यावेळीं फ्रेंचांचा पराजय करण्यास मुख्य उत्तेजन रणवाद्यांच्या स्वरांनीं आलें. या फ्रेंच राज्यक्रांतीच्या धुमाळींत 'का इरा' हें लढाईतील गाणें होतें व त्या गाण्याशीं अनेक घातक गोष्टींचा संबंध होता.

५ 'वेस्ट यॉर्कशायर रेजिमेंट' म्हणजे पश्चिमेकडील यॉर्क प्रांतांतील पलटण; हीस तिकडे जुनी चवदावी ( पलटण ) असें नांव पडलें आहे. ह्या पलटणीनें लढाईंत संगिनीच्या धारेवर शत्रूस धरून तें गाणें त्यांच्यापासून जबरीनें घेतलें असें म्हटल्यास चालेल.

६ त्या क्रांतींत बेफाम झालेल्या फ्रेंचांचा जोर मोडण्याकरितां युरोपांतील निरनिराळ्या देशांची जी साह्यसंकेती मंडळी जमली होती, तीस 'अलाईझ' ही संज्ञा होती. त्या अलाईझचा पुढाकार इंग्रजांच्या ड्यूक ऑफ् ब्रन्सनिक नामक जहागिरदाराकडे होता. त्या मंडळीनें इ० स० १७९३ मे, ता० २३ रोजीं 'फॅमकार्स' येथील फ्रेंचांच्या छावणीवर छापा घालण्याचें काम चालू केलें. इंग्रजांच्या वरील चौदाव्या पलटणींत केवळ बहुतेक पोरकट पोरांची भरती होती. त्यांची गांठ एकाएकीं फ्रेंचांच्या चौदाव्या पायदळ पलटणींतील लढाईंत असलेल्या जुन्या वीरांशीं पडली.

७ त्या पलटणींतील तें इंग्रजांचें पायदळ एका डोंगरावर चढून जात असतां त्यांच्यावर त्या फ्रेंच वीरांनीं साधे गोळे व कुलपी गोळे यांचा

असा पाऊस पाडला कीं, तीं इंग्रजांचीं पोरकट पोरें त्या डोंगराखालीं जणूं गुरांप्रमाणें साफ हाकललीं जातील असें वाटलें. पण त्या पलटणीचा सेनापति कर्नल डाईल हा होता. तो ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं पुढें सरसावला व शिबंदीस उत्तेजन देणारें 'का इरा' हें फ्रेंच बॅण्डचें गाणें ऐकून त्यानें तेंच गाणें आपल्या बॅण्डास वाजविण्यास सांगितलें व त्यानें आपल्या पलटणींतील लोकांस हांक मारून म्हटलें कीं, "चला, बाळांनो, पाहतां काय, आपण त्या फ्रेंचांचेंच गाणें घेऊन त्या फ्रेंचांचा नक्षा उतरूं या!" आणि खरोखरीच त्या म्हणण्याप्रमाणें त्या पश्चिम यॉर्कशायरच्या पलटणीनें त्यांचा धुव्वा उडवून दिला. त्यांनीं छापा घालून फ्रेंचांच्या लैनी साफ उडवून दिल्या व तेव्हांपासून आजतागाईत त्या पलटणीच्या दोन्ही बटॅलिअन्स म्हणजे तुकड्या, यांत कोठें मार्च म्हणजे कूच करावयाचें असलें तर 'का इरा' हें गाणें वाजवून ते सरासर पुढें जातात.

८ बॅग्-पाईप. बॅग्पाईप हें स्कॉटलंडांतील हायलँडर्स लोकांचें एक रणवाद्य आहे. ह्याच्या खाकेंत धरावयाच्या वाऱ्याच्या पिशवीवरील तोंडांत धरावयाच्या नळीचा आकार कांहींसा मोराच्या तोंडासारखा असतो. म्हणून ह्या वाद्यास कोणी कोणी इकडे 'मोरबीन' असें म्हणतात. त्याचा प्रवेश अलीकडे गेल्या दोन चार वर्षांपासून मुंबईतील गांवखात्यांत गणपतीच्या उत्सवाच्या वेळच्या चित्रांच्या प्रदर्शनामध्यें झाला आहे. ह्या बॅग्-पाईपचा उपयोग हायलँडर्स लोकांस आजतागाईत बहुत झाला आहे. ह्या मोरबीनीच्या योगानें समरांगणावर अनेक लढवय्या लोकांचीं हृदयें चवताळून ते अनेक वेळां पराक्रमाचीं कर्में करण्यास प्रवृत्त झाले आहेत. त्या मोरबीनी वाजल्या नसत्या तर त्यांच्या हातून जशीं पराक्रमाचीं कृत्यें झालीं आहेत तशीं तीं उठलीं नसतीं, असें तद्भिज्ञांचें मत आहे.

९ ब्याण्णवाव्या हायलँडर पलटणीचा 'क्यामेरॉन' नांवाचा एक सेनापति होऊन गेला. त्याला ह्या मोरबीनीचें महत्त्व अत्यंत वाटे. तें इतकें कीं, पेनिन्शुलर लढाईत म्हणजे स्पेन-पोर्तुगालच्या फ्रेंचांशीं झुंप-

लेल्या लढाईंत जेव्हां त्याचा लाडका मोरबीनवाला त्याच्या बाजूस गोळी लागून पडला, तेव्हां त्यानें त्याच्या बाजूस गुडघे टेंकून त्यास उठविण्याचा प्रयत्न केला व म्हटलें कीं, " तुझ्या मरणापेक्षां माझे वीस शिपाई मेलेले पुरवले असते."

१० हायलँडर्स लोक मोठे कणखर असतात. त्यांच्यावर ह्या मोरबीन वाद्याच्या होणाऱ्या परिणामाच्या अनेक गोष्टी सांगतात. त्या वाद्यावरील त्यांचें अतिशय आवडतें गाणें म्हटलें म्हणजे 'क्यांबेल्स आर कमिंग्' म्हणजे 'क्यांबेल हे येत आहेत' हें आहे. लखनौ येथें इंग्रजांच्या शिबंदीस बंडवाल्यांचा वेढा पडला, तेव्हां त्यांस सोडविण्याकरितां जे शिपाई गेले, त्यांच्या बरोबरच्या मोरबीनीचा आवाज त्या शिबंदीनें ऐकिला तेव्हां त्यांस अत्यंत स्फुरण चढलें. त्यावेळीं सदहु गाणें वाजविलें होतें व त्याचा उल्लेख टेनिसन् नामक इंग्रजी राजकवीनें आपल्या कवनांत केला आहे; तेव्हां ही गोष्ट अनेक लोक खरी म्हणून समजतात; पण तिची सत्यता आजतागायत इतिहासदृष्ट्या मुळींच ठरलेली नाहीं.

११ गॉर्डन हायलँडर्सच्या पहिल्या बटॅलियननें म्हणजे तुकडीनें अलीकडे उत्तरेस दार्गाई येथें जे पराक्रम केले, त्यांची आठवण पुष्कळांस असेल. त्यावेळीं जो जय झाला त्याचें एक मुख्य कारण मोरबीन वाद्याचें मोहक गाणें होऊन गेलें असें म्हणतात. आफ्रिडीस लोक हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवरील डोंगरावर अशी कांहीं मजबूत जागा धरून बसले होते कीं, त्यांस तेथून काढण्यास बहुत प्रयास पडले; एक नव्हे तर अनेक पलटणींनीं त्या जागेवर हल्ला केला. पण त्यांत एकासहि यश आलें नाहीं. कर्नल माथियस हा त्यावेळीं गॉर्डन हायलँडर पलटणीचा पुढारी होता. त्यानें आपल्या लोकांपुढें होऊन म्हटलें, " आमचे गॉर्डन हायलँडर्स पलटणीचे लोक ती जागा घेतील." व मोरबीन वाद्याच्या वादनानें स्फुरण पावलेले त्या हायलंडर्स लोकांनीं शत्रूंचा पुरा मोड करून ती जागा घेतली. तेव्हां 'कॉक ऑफ् दि नॉर्थ्' म्हणजे 'उत्तरेचा एक कोंबडा' हें गाणें चाललें होतें. त्या मोरबीनवाल्यांत फिंडलेटर नांवाचा एक मोर-

बीनवाला होता. तो मोठा रणशूर होता. त्याचे दोन्हीही पायांचे घोटे बंदुकीच्या गोळ्यांनीं पार जायां झाले होते, तरी तो आपल्या सदरहु लष्करी गाण्यानें आपल्या लोकांस एकसारखा उत्तेजन देत होता. म्हणून ह्या शूर बीनवाल्यास आमच्या परलोकवासी राणीनें ह्या कृत्याबद्दल 'व्हिक्टोरिया क्रॉस' नांवाचें पदक दिलें.

१२ लिस्ली नांवाचा तोफखान्यावरील एक फ्रेंच कामगार होता. त्यानें इ० स० १७९२ त एक गाणें व्हॉलंटिअर म्हणजे स्वयंसैनिक लोकांच्या सन्मानार्थ रचिलें. त्या गाण्याचा परिणाम त्या लोकांवर असा झाला म्हणतात कीं, तें गाईल्यापासून त्या स्वयंसैनिकांची संख्या तेव्हांच सहाशांची हजार झाली व तें गाण प्रस्तुत सगळ्या फ्रान्सभर 'मार्सेलिसचें स्तोत्र' म्हणून प्रसिद्ध आहे.

१३ यावरून वाद्याचें महात्म्य प्रत्येक देशांत किती असतें हें उघड दिसेल; मग तो देश हिंदुस्थान, इंग्लंड, फ्रान्स अथवा दुसरा कोणताही असो! एक कवि असें म्हणतो कीं, 'वाद्यानें जंगली माणसाच्या हृदयास मोह उत्पन्न होतो, खडकासारखीं कठीण हृदयें लोण्यासारखीं मऊ होतात, अथवा मांगाच्या फळ्यासारखीं मनुष्यांचीं नाठाळ हृदयें गलबतांच्या फळ्यांसारखीं एकजीव होऊन बसतात." पण भिल्ल कोळी यांसारख्या जंगली लोकांस वीणा, सारंगी, तबला वगैरे कोमल वाद्यांचं वादन आवडत नाहीं. त्यांस ढोल, नगारे, शिंगें वगैरे कर्कश वाद्यांचें वादन आवडतें. मुसलमान लोकांस जसे तडाडणारे तासे आवडतात, त्याप्रमाणें अमेरिकेंतील तांबड्या इंडियनांस टमटमणारीं डफडीं आवडतात. त्यांच्या योगानें त्यांस लढण्यास स्फुरण चढतें. हें जसें पूर्वीं होत आल, तसेंच तें पुढेंहि चालत राहील. कारण रणकंदन माजण्यापूर्वीं बळी पडणाऱ्या लोकांचे कानीं उत्साह व आत्मनिरपेक्षबुद्धि उत्पन्न करणारे ओळखीचे स्वर पडले तर नव्याण्णव वांट्यांनीं त्यांस जय येतो असें आहे.

मोठें तुफान होण्याच्या पूर्वीं हवा शांत होते, त्याप्रमाणें मोठी लढाई जुंपण्यापूर्वीं सेना सामसूम होते. ती सामसूम तोफांचा दणदणाट व कुलपी गोळ्यांची फाटफूट ह्यांनीं मोडते. तो दणका व ताण लढणाऱ्या शिपायांस

सहन होत नाहीं. कारण त्या वेळीं त्यांचें शरीर व मन यांस यमयातना होऊं लागतात. तेणेंकरून ते गर्भगळित झालेले असतात. त्यांस दम यावा व त्यांस पडतील ते कष्ट व दुःख सोसावयाचें सामर्थ्य यावें, म्हणून गंभीर नादाचीं रणवाद्यें लागतात. कारण त्या भेरी, शंख, आदिकरून अमानुष जादूनें भरलेल्या रणवाद्यांच्या नादांत त्यांस ते कष्ट व दुःख सुसह्य होतें व त्यास त्यांचा शीण वाटत नाहीं.

६

## संचय

जेव्हां सुधारणेला आरंभ झाला, तेव्हांच संचयालाही सुरवात झाली. आजच्याप्रमाणें उद्यांचा दिवस सुखानें जावा ही कल्पना जेव्हां माणसांच्या डोक्यांत आली, तेव्हां लोक संचय करूं लागले व ही संचयाला सुरुवात नाणें प्रचारांत येण्यापूर्वीच झालेली आहे. खाजगी सांठा हा संचय होय. ज्याप्रमाणें प्रापंचिक काटकसर करून गृहव्यवस्था सुधारावी, त्याप्रमाणेंच स्वदेशी जिनसा वापरून देशाचीही संपत्ति वाढवावी. घरांत जिन्नस नसला तर जसें चालवून घ्यावें लागतें, तसेंच लागणारी वस्तु देशांत नसली तर थोडी अडचण सोसली पाहिजे. खाजगी आणि देशाच्या धनसमृद्धीशीं एकच मूळ आहे. श्रम करून पैसा मिळविला जातो; मात्र त्याचा संचय करण्याचे दोन प्रकार आहेत. एक तर खर्च बेताचा करून दोन पैसे मागें टाकावे किंवा दोन तास काम जास्त करून अधिक पैसे मिळवावे. प्रत्येक मनुष्याची गृहसंपत्ति ही देशाला भरच आहे व त्यानें पैशाचा अपव्यय करणें ही देशाची नुकसानी होय. म्हणून काटकसरी मनुष्य देशकल्याणकर्ता समजला जातो व उधळ्या मनुष्य हा देशाचा शत्रु मानिला जातो. खाजगी व्यवहाराबद्दल आतां वादविवाद उरला नाहीं. कारण स्वतांची स्थिति व घराची स्थिति सुधारावी हें प्रत्येकजण कबूल करील. मात्र देशाच्या सुधारणेबद्दल अनेक तंटे उपस्थित होतील. उदाहरणार्थ, करांनीं आणि कायद्यांनींहि मनुष्य खालावला जातो. परंतु सध्यां आपणांस त्या गोष्टीशीं कर्तव्य नाहीं. काटकसर करण्याचें मनांत येणें ही उपजत बुद्धि नव्हे. परंतु अनुभव आणि दूरदर्शीपणाचें तें फळ आहे. मनुष्यानें दोन पैसे सांठविण्याला शिक्षण आणि सुधारणा ह्या दोन गोष्टी कारणीभूत झाल्या. माणसें शहाणीं आणि विचारी झालीं,

तेव्हां काटकसर करणें हा गुण त्यांच्याच अंगीं येऊं लागला आणि खरोखरच पुरुषानें आणि स्त्रीनें दूरदर्शी होणें ही शहाणपणाची गोष्ट होय. काटकसरीपेक्षां उधळेपणा अंगीं असणें जास्त नैसर्गिक दिसून येतें. रानटी लोकांना आणि फांशीपारध्यांना उद्यांचा दिवस उगवणार हें सुद्धां कळत नाहीं आणि या त्यांच्या अज्ञानामुळें त्यांनीं जें काय मिळविलेलें आहे, त्याचा ते आजचे आजच फडशा उडवून टाकतात. दूरदर्शीपणा त्यांना मुळींच नसतो. हे लोक बहुतकरून झाडांच्या पोकळींत किंवा पर्वतांच्या गुहेंत राहतात. हें फलमुळांवर किंवा मत्स्यपक्ष्यादि प्राण्यांवर उपजीविका करितात. त्यांची अरण्यांत वस्ती व त्यांचीं हत्यारेंही दगड व लांकडें. ह्यांची तरी किंचित् सुधारणा येथूनच झाली म्हणावयाची; कारण दगडांचा उपयोग हत्यारांऐवजीं करावा, आणि तीं साधनें सांभाळून ठेवावीं ह्या गोष्टी ते येथेंच शिकले व अशा रीतीनें म्हणजे दगडाचा उपयोग हत्यारांप्रमाणें होऊं लागल्यामुळें त्यांना पक्षी जलद मारतां येऊं लागले. मूळच्या रानटी लोकांना शेतकीची विद्या कांहीं अवगत नव्हती; परंतु जेव्हां त्यांना अग्नीची माहिती झाली व त्या-योगानें खनिज पदार्थ वितळूं लागतात असें जेव्हां त्यांस दिसून आलें, तेव्हां त्यांनीं ओबडधोबड हत्यारें तयार करून घरें बांधण्यास सुरुवात केली आणि हीच त्यांची सुधारणा होय. मोठ्या झाडाला पोखरून व तें समुद्रांत फेंकून त्याचा नावेप्रमाणें उपयोग करूं लागले. नंतर नावा, होड्या, तारवें, जहाजें लोक तयार करूं लागले. आणि सुधारणा ही अशीच मंद गतीनें होत असते. मनुष्य सतरा अडचणींत राहिला असता; परंतु पूर्वजांच्या उपयुक्त श्रमाचा त्याला फायदा मिळाल्यामुळें तो अधिक सुधारणेच्या मार्गाला लागला. सृष्टिक्रम असा दिसून येतो कीं, एकदां उगवलेला वृक्ष कधींही नष्ट होत नाहीं; कारण त्याचें बीं वायूनें चोहोंकडे पसरून ठेवलेलें असतें. सजीवांना मृतांच्या काम-गिरीची आठवण असते व अजून पौराणिक काळांतील कोरीव लेणीं व ऐतिहासिक काळांतील ताजमहाल साक्ष देत उभे राहिले आहेत. अशाच रीतीनें शास्त्र व कला अस्तित्वांत आल्या. त्या शास्त्राचें आणि कलेचें सृष्टीकडूनच संरक्षण होत असल्यामुळें मानवी श्रम

वाया जात नाहींत. जरी सर्वत्र झाले नाहींत, तरी कुलांपैकीं कोणाच्या तरी अंगीं त्यांपैकीं थोडा फार अंश रहातो. आपणास वडिलार्जित नुसतें धनच मिळत नाहीं; तर त्यांचे गुणही आपल्या अंगीं येतात. हे गुण वंशपरंपरा चालूं राहतात. शिवाय हा बापानें मुलाला दिलेला गुण घरांत कायम राहून त्या गुणाबद्दल त्या घराची प्रशंसा होते. एकंदरींत आपल्या जन्माचें सार्थक वडिलांच्या बऱ्यावाईट कर्तबगारीवर अवलंबून आहे. मात्र आपण हातपाय हलविल्याविना तें सार्थक होऊं शकणार नाहीं. सर्वांनीं श्रम केले पाहिजेत, मग ते मानासिक असोत, वा शारीरिक असोत. श्रमाखेरीज जीवित व्यर्थ होय. याहून अधिक महत्त्वाच्या श्रमाची आपणास जरूरी आहे. सहनशीलता आणि गांभीर्य अंगीं पाहिजे. योग्य कालीं स्वार्थ सोडून परोपकारही केला पाहिजे. तेव्हां सत्याचा प्रसार आणि सुधारणेची वाढ करण्यासाठीं अत्यंत परिश्रम केले पाहिजेत. अशक्तांना मदत आणि गरीबांचा सांभाळ झीज सोसून केला पाहिजे. अवश्यकतेपेक्षां सुखाकारितां म्हणून श्रम केले पाहिजेत. पृथ्वी, हवा आणि सूर्य आपणांतील प्राणभृततत्त्वें शोषित आहेत, तेव्हां आपणांस अन्न हें खाल्लेंच पाहिजे व थंडीच्या निवारणार्थ पांघरुणें घेतलीं पाहिजेत. सृष्टिक्रम आपणांकारितां चालला आहे. जी जमीन आपण नांगरतों, ती फलदायी होते. श्रीमंत असो वा गरीब असो; त्याला अन्न हें खाल्लेंच पाहिजे. म्हणून सर्वांनीं श्रम करावे हें सोयीचें आहे. अवजड श्रमासाठीं एकमेकांनीं एकमेकांना मदत करावी. शेतकऱ्यांनीं कापूस तयार करावा, कोष्टयांनीं कापड विणावें व शिंप्यानें तें शिवून कपडे तयार करावे, असा श्रमविभाग आणि अशी सांखळी असावी. किंवा संघशक्तीनें एखादें मोठें काम तडीस न्यावें. ज्या ठिकाणीं श्रम आणि चातुर्य खर्च केलें जातें, त्या ठिकाणीं अमोल गोष्ट घडून येते. खरें मानवी जीवित श्रमाचेंच आहे. याबद्दल एक म्हण देखील आहे, ‘ जो श्रम करणार त्यास खावयास मिळणार.’ शिवाय याबद्दल दृष्टांत म्हणून ‘ शेतकरी आणि त्याचे मुलगे ’ ही गोष्ट देखील प्रसिद्ध आहे. आणि ती बहुतेकांना माहीत असेलच. असे श्रम करून, वाजवी खर्च करून आणि भावि कालावर दृष्टि देऊन प्रत्येकानें थोडाफार संचय करावा हें युक्त दिसतें.

७

## गृहस्वामिणी !

एका इंग्रज स्त्रीनें स्त्रियांस यासंबंधानें उपदेश केला आहे. तो वाचण्याजोगा आहे. " जिच्या हातांत सैंपाकघरापासून तों दिवाणखान्यापर्यंत आणि तिखटामिठाच्या पाळ्यापासून तों ट्रेझरीच्या पेटीपर्यंत सगळी व्यवस्था करण्याचा पूर्ण अधिकार असतो, नव्हे, तसें करणें हें जिचें कर्तव्य–ती घरांतली बायको, कशी असली म्हणजे पुरुषाला आपल्या घरासंबंधीं फारशी काळजी वाहण्याचें सहसा कारण रहात नाहीं, तें खालीं सांगितलें आहे. नुसतीं घरांतलीं चार ठोकळ ठोकळ कामें बडवलीं म्हणजे तिनें आपलें कर्तव्य बजावलें असें मुळींच नाहीं. प्रपंचभार वाहून नेण्यास लागणाऱ्या आवश्यक गुणांचाही तिनें आपले ठिकाणीं संग्रह केला पाहिजे. गृहस्वामिणीचा अधिकार हलकासलका नव्हे. त्या अधिकारांत पुष्कळ गोष्टी बायकांना कराव्या लागतात. त्या तिनें चोख, अगदीं बिनबोभाट पार पाडल्या म्हणजे बस्स आहे. मग तिच्या अंगीं जास्त गुण जरी नसले तरी कांहीं हरकत नाहीं.

१ प्रथमतः बायको अभिमानी असावी; म्हणजे तिच्या अंगीं नुसता पोकळ ताठा असतां कामा नये. तिला आपला व आपल्या घरासंबंधीं पूर्ण अभिमान पाहिजे. कोणी कांहीं जर तिच्या घरासंबंधीं अधिकउणें बोललें तर तिला राग आला पाहिजे; नव्हे तें तिच्या जिवाला लागलें पाहिजे; आणि त्या लोकापवाद्–तुफानांतून तिनें आपले घराचा बचाव करणें हें तिचें खरें कर्तव्य होय.

२ कामधंदा करण्याची अंगीं चांगली संवय असावी. अंगीं आळस अगदीं असूं नये. आळशी बायका ह्या संसाराच्या कसरी होत. मोलानें काम देण्याची पद्धत हें जरी श्रीमंतीचें द्योतक आहे, तरी ती सर्वकाळ

फायद्याचीच होते असें नाहीं. आपल्या शक्तीच्या बाहेर जीं कामें असतील, तीं मात्र तेवढ्यापुरतीं मोलानें करून घ्यावींत. घरांतील कामें म्हणजे खाणींत काम करणाऱ्या मजुरांच्या कामाइतकीं कठिण असतात असें नाहीं. 'जितकीं माणसं तितकें काम' अशी एक बायकांची म्हण आहे. होय. ती खरी असेल. पण त्यांनीं त्या कामांची वांटणी केली असतां तीं कामें सोपीं वाटतात. एकंदरींत बायकांनीं कामधाम करण्याची आपली संवय जाऊं देऊं नये. खरें सुख काय तें त्यांतच आहे. मग ती श्रीमंत असो अगर गरीब असो.

३ संसारांत बेताबातानें खर्च करण्याची संवय ही प्रत्येक बायकोच्या अंगीं असणें अगदीं जरूर आहे. उगीच 'उधळमाधळ दिवसा गोंधळ' अशांतली खर्च करण्याची पद्धत असूं नये. 'पैसा हा शरीरांतल्या घामाच्या धारा आहेत,' पैशाचीं झाडें कोणत्याही रानांत अगर बेटांत नाहींत. आपल्या पुरुषाला द्रव्यार्जन करण्याला कोण श्रम पडतात, हें प्रत्येक बायकोनें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. अगदीं जिथें अडेलच तिथेंच मात्र तेवढा पैसा खर्च करावा. पैशाशीं उठणें आणि पैशाशीं बसणें म्हणजे संसारावर पाणी ओतण्यासारखें होय. करितां पैसा फार जपून वापरावा. पैशाच्या पेटीची किल्ली गळ्यांत अडकाविण्यापेक्षां ती दृष्टीआड कोठेंतरी जपून ठेवावी व कारण लागलें म्हणजे ती हातीं घ्यावी.

४ बायकांच्या जातीनें थोडें व कारणापुरतें बोलावें. उगीच दिवसभर तोंडाची टकळी चालूं देणें हें चांगलें नाहीं. ज्या भाषणापासून आपल्याला व दुसऱ्याला काडीचाही फायदा नाहीं असें पानचट भाषण करण्यांत व्यर्थ वेळेचा दुरुपयोग करूं नये. तोच वेळ आपल्या संसारकृत्यांत अगर देवाचें भजनपूजन करण्यांत अगर ज्ञानोपयुक्त व नीतिपर पुस्तक वाचण्यांत घालविला, तर त्या वेळाचें सार्थक होणार आहे. वाजवीपेक्षां फाजील बोलणाऱ्या बायकांस बेलगामी बायका म्हणतात.

५ आपले पति हें घरांतलें मुख्य दैवत. त्यांच्या भजनीं, सेवनीं व चिंतनीं प्रत्येक बायकोनें आपलें अगदीं तनमनधन अर्पण केलें असतां त्यांत तिचें खरोखर कल्याण आहे. जी बायको आपल्या वर्तनानें, भाष-

णानें आपलें पतिदैवत संतुष्ट ठेवीत नाहीं, ती खरोखर कृत्या किंवा दुष्ट समजली पाहिजे. गृहशांततेचा भंग करणारी राक्षसीच म्हटली पाहिजे. बायको म्हणजे 'घरांतली लक्ष्मी.' यासाठीं प्रत्येक बायकोनें नेहमीं शांतवृत्तीनें घरांत असलें पाहिजे.

यावरील सद्‌गुणांचा ज्या माऊलीनें पूर्ण आश्रय केला आहे, नव्हे हे वरील गुण जिच्या अंगीं अगदीं मूर्तिमंत वास करीत आहेत, तीच गृहस्वामिणीच्या पदास योग्य; तिलाच तें पद शोभतें. उगीच गृहस्वामिणीचा डौल घालणाऱ्या बायका खरोखर आपल्या नवऱ्याचें नुकसान करण्यास कारण होतात. त्यांचे हातून कधीं व्यवस्थेशीर खर्च व्हावयाचा नाहीं कीं कांहीं व्हावयाचें नाहीं. संसारज्ञान हें वयाच्या प्रत्येक वर्षाबरोबर कांहीं वाढत जात नसतें. त्याला श्रमच घेतले पाहिजेत. चांगल्या, अनुभवी, पोक्त, प्रपंचांत पुष्कळ ठोकरा खाऊन ज्या शहाण्या झाल्या आहेत, अशा बायकांचा सहवास प्रपंच करणाऱ्या होतकरू बायकांना पुष्कळ हिताचा असतो. घरांतल्या वडिलधाऱ्या माणसांची किंवा सासू असल्यास तिची प्रत्येक कामांत सल्लामसलत ही प्रपंच करणाऱ्या बायकोनें वेळोवेळीं घेतलीच पाहिजे. हल्लींच्या प्रपंच करणाऱ्या बायकांचें मोठें दुर्दैव समजलें पाहिजे. त्यांना वेळोवेळीं जागें करण्यास, त्यांचे कान उघडण्यास व त्यांना हरएक बाबतींत चांगली सल्लामसलत देण्यास व त्यांना उपदेश करण्यास जुनीं अनुभवशीर माणसें फारशीं राहिलीं नाहींत. जीं कांहीं थोडीबहुत झालीं त्यांचें अनुकरण करा. त्यांचीं थोडीं तरी कांहीं पावलें उमटलेलीं असतील तीं पहा, आणि त्याच मार्गानें तुम्हीही मार्गक्रमण करा म्हणजे तुमचें अत्यंत कल्याण होईल यांत अणुमात्र शंका नाहीं. हे देशभगिनींनो! संसाराची घडी एकदां बिघडली म्हणजे ती शेवटपर्यंत तशीच बिघडलेली राहते. आरंभालाच कधीं हयगय करूं नका. संसार करणें हें तुमचें कर्तव्य होय. त्यांतच तुमचें सगळें आयुष्य जाणार. तुमच्या आयुष्याला दुसरी गति नाहीं. बालपणीं, तरुणपणीं व वृद्धपणीं तिन्हीं वयांत तुम्हांला संसार करावा लागतो. लहानपणीं तो लुटीपुटीचा करतां; तरुणपणीं तो साक्षात् करून दाखवितां

आणि म्हातारपणीं तो आपल्या लेकीसुना आदिकरून संसाराच्या आधारभूत मंडळीकडून करवून घेतां. म्हणजे संसारचक्राचे खरे चालक तुम्हीच असतां हें अगदीं निर्विवाद आहे. त्यासाठीं त्याला कंटाळूं नका. आपलें शरीर झिजवा आणि आपल्या प्रपंच–इमारतीचा पाया चांगल्या गोष्टींवर उभारा म्हणजे ती इमारत चांगली मजबुतीची होईल. ही गोष्ट जिनें केली तीच खरी गृहस्वामिणी."

## ८

# सृष्टिसौंदर्य

सृष्टिसौंदर्याच्या अवलोकनानेंच ज्याला कवित्वस्फूर्ति झाली असा वर्डस्वर्थ कवि सृष्टिसौंदर्याविषयीं पुढील उद्गार काढतो : " ज्या हृदयानें सृष्टीवर खरें खरें प्रेम केलें, त्या हृदयाला पृथ्वी कधींही फसविणार नाहीं. या आपल्या सर्व आयुष्यक्रमांत एकाहून एक वरचढ असे आनंद दाखवून आपणांस सुखी करण्याचा एक तिचाच अधिकार. कारण ती आपलें अंतःकरण इतकें ज्ञानमय करून सोडते, शांति व सौंदर्य यांनीं इतकें भरून टाकते, अत्यंत उदात्त अशा विचारांनीं पर्याप्त करून टाकते, कीं निंदकाच्या जिव्हा, वेडेवांकडे विचार, आपस्वार्थी लोकांची गुरगुर, किंवा मनांत प्रेम नसतां वरकांतीं स्वागत करणाऱ्यांचीं गोडगोड बोलणीं किंवा या त्रासमय संसारांत रोज उपभोगावे लागणारे त्रास यांचें अंतःकरणावर कांहीं चालावयाचें नाहीं. सृष्टिसौंदर्याच्या वीक्षणानें सर्व विश्व सुखमय आहे अशी जी श्रद्धा आपल्या मनांत होते ती या साऱ्या गोष्टींनीं अणुमात्र ढळणार नाहीं. "

दुसरा एक नामांकित ग्रंथकार त्याचप्रमाणें सृष्टिसौंदर्यवीक्षणाचें महत्त्व गातो : " ज्या ठिकाणांच्या सृष्टिसौंदर्याचा उपभोग घेतला तेथें म्हटलें तर मला एकटें असें कधींच वाटलें नाहीं. कारण माझ्याबरोबर दुसरा कोणी मनुष्य नसला, तरी प्रत्येक मधमाशी, प्रत्येक फूल, प्रत्येक खडा हीं मला बरोबरीच्या सोबत्यांप्रमाणेंच होतीं. मला आळस असा तर कधींच वाटत नसे; कारण दलदलीजवळून जा, कीं एखाद्या झुडपांच्या झुबक्याजवळून जा, मला सर्वत्र कांहीं तरी यक्षिणीची चमत्कृति असें भासे व त्या चमत्कृतीचा सर्व उलगडा जरी झाला नाहीं, तरी थोडेंबहुत तरी कळून घेण्याचा मी यत्न करीत असें आणि त्या यत्नास

यश येऊन मला मोठी मौज वाटे. इतकी मौज मला आजपर्यंत कोणच्याही पुस्तकाच्या वाचनानें कधीं वाटली नाहीं."

खरोखर सृष्टिसौंदर्यावर ज्यांची भक्ति बसेल, त्यांना आळसावलेलें असें कधींच वाटणार नाहीं. इतर मोहक गोष्टींनीं त्यांचें मन लुब्ध होणारच नाहीं असें नाहीं; पण एवढी गोष्ट खरी कीं, कंटाळा, त्रास, आळस किंवा रिकामपण यांच्यामुळें "क्षणभर आनंद पण सारा वेळ खेद" होईल असें कांहीं करण्याकडे जी प्रवृत्ति होते, ती होण्याचा धाक नको. सृष्टिसौंदर्याच्या प्रेक्षणांत गढून गेल्यानें शिवाय असेंही होतें, कीं मनाची स्वस्थता व समता घालविणाऱ्या ज्या कांहीं यःकश्चित् रिकामटेकड्या काळज्या असतात, त्यांच्यापासून मनाला त्रास होत नाहीं. सकाळीं, संध्याकाळीं हिंडायला जाणें म्हणजे एक सकाळची किंवा संध्याकाळची परमेश्वराची पूजाच करणें होय. या योगानें जीवित आनंदमय होऊन जातें.

पूर्वींच्या काळीं आपण यक्षिणी, नागकन्या, अप्सरा यांनीं इहलोकच्या सुंदर पुरुषांस देणग्या दिल्याच्या गोष्टी ऐकतों. कोणीं आपल्या प्रिय पुरुषांस गुप्तविद्या, जिच्यामुळें कोणच्याही संकटांतून पार पडतां येईल, अशी शिकविली; कोणीं कांहीं जडीबुटी दिली; कोणीं भारलेलीं रत्नें दिलीं; कोणीं आंत हात घालतांच एक मोहोर निघेल अशा गुणाची बटवी दिली; अशा नानातऱ्हेच्या गोष्टी ऐकतों, परंतु अशा यक्षगंधर्वकन्यांनीं आपणांस कांहीं अजब गुणांच्या चिजा देण्याचे दिवस आतां गेले. पण त्यांच्यापेक्षां चांगले दिवस आले आहेत. आतां सर्वांना अजब चिजा मिळूं लागल्या आहेत म्हणण्यास हरकत नाहीं. मात्र त्या अजब चिजा वर सांगितलेल्या तऱ्हेच्या नाहींत. जे सृष्टीवर भक्ति करतील त्यांच्यावर सृष्टीचें प्रेम जडावयाचेंच. ती सृष्टि त्यांना विचित्र देणग्या खास देणार. सृष्टीपासून धन, पदव्या, घोडे, गाड्या मिळतील असें नाहीं. ती असल्या देणग्या किंवा जहागिरी मुळींच देत नाहीं. तर आपलें सर्व भांडार खुलें करून सर्व वस्तु पुढें करितें; सुखकर व उदात्त अशा विचारांनीं अंतःकरण पर्याप्त करून टाकते; समाधान व स्वास्थ्य यांनीं मन भरून टाकते.

सृष्टिचमत्कारांचा जो अभ्यास करील, त्याच्यासारखा कोणीही सुखी नाहीं. ऋतूंचें येणें म्हणजे आपल्या जुन्या मित्रांच्या येण्याप्रमाणेंच त्यास होतें. पक्षी आपल्या गायनानें त्यास समाधान देतात. तो चालला असतां कुंपणावरलीं व जमिनीवरलीं फुलझाडें आपलीं फुलें पुढें करून 'आमचेकडे पहा' असेंच जणूं काय म्हणत असतात व तोही मोठ्या प्रेमानें त्यांस कुरवाळून त्यांची विचारपूस करतो. जें जें वर्ष जातें तें तें त्यास केवळ सुखकर अशा आठवणींचें भांडारगृह होऊन बसतें.

आयुष्य-नदीच्या ओघानें वहावत आपण पुढें गेलों, तर मागें वळणें शक्य नाहीं. एकदां गेलेलें बाल्य पुन्हा मिळणें अशक्य, परंतु सृष्टीवर ज्याचें प्रेम तो सदा तरुण. पण सृष्टीवर प्रेम करणें म्हणजे काय? कित्येकांना असें वाटतें कीं, पुष्कळशीं फुलें गोळा केलीं म्हणजे आपलें फुलांवर प्रेम आहे असें झालें. बागेंतून हिंडतां हिंडतां सहज एकादें फूल तोडावें, अंमळ नाकाशीं न्यावें, कांहीं वेळ हातीं धरावें, 'अहाहा!' करावें आणि कोठें तरी फेंकून द्यावें, म्हणजे पुष्पाचें प्रेम झालें काय? अशीं विनाकारण तोडून टाकलेलीं फुलं कोमेजून कोठें तरी पडलेलीं आपणांस कितीदां दिसतात बरें? अशीं फुलें तोडणें म्हणजे सृष्टिसौंदर्याचें प्रेम तर नव्हेच, पण उलट सृष्टिसौंदर्याचा विनाकारण नाश मात्र म्हणतां येईल आणि सौंदर्याचा नाश म्हणजे सगळ्यांत वाईट नाश होय.

१

## पेशव्यांत थोर कोण ?

रत्न म्हटलें म्हणजे तें टाकाऊ असें नसायचेंच; परंतु त्यांतल्या त्यांत कोहिनूरची दीप्ति जशी कांहीं निराळीच, किंवा देव म्हटलें म्हणजे सर्व वंद्य, पण त्यांतही महादेव जसे सर्व जगास महावंद्य होऊन बसले आहेत, त्याचप्रमाणें ज्यांनीं प्रथम मोडकळीस आलेल्या स्वातंत्र्यप्रासादाचा जीर्णोद्धार केला ते बाळाजी विश्वनाथ, ज्यांनीं आपल्या बाहुबलानें व सद्गुरुप्रसादानें सत्कीर्तीचे मजले त्या प्रासादावर उठविले ते बाजीराव-चिमणाजी व ज्यांनीं आपल्या पितृपितामहांच्या अचाट धाडसाला व कीर्तीला साजेल अशा रीतीनें कैक शत्रूंस दांतीं तृण धरावयास लावून त्या विस्तीर्ण व भव्य प्रासादाची पूर्णता करून त्यावर हिंदुपदपादशाहीचा देदीप्यमान जरीपटका रोंविला ते बाळाजी बाजीराव व दादा, भाऊ हे सर्व थोरांतले थोर व वीरांतले वीर होतेच; पण या अमोल वैजयंतिमालिकेंत कौस्तुभमणीचे ठायीं शोभणाऱ्या राव माधवरावांची थोरवी कांहीं विलक्षणच ! जमीन कितीहि जरी सुपीक असली, तरी कांहीं काळानें जशी ती निःसत्त्व होत जाते, त्याचप्रमाणें भटकुलभूमिकेनें माधवरावांना जन्म दिल्यापासून ती निःसत्त्व होत गेलीसें दिसतें. कारण त्यांच्यामागून जेवढे पेशवे गादीवर आले, तेवढ्यांत एखादाही माधवरावांपर्यंतच्या पेशव्यांसमान झाला नाहीं; मग त्यास कारण भोंवतालची परिस्थिति असो, वा अंगची कर्तव्यहीनता असो ! तेव्हां माधवरावांच्या अंगच्या अमोल गुणांची कसोटी पाहण्यास त्यांची त्यांच्या पूर्वींचे पेशव्यांशींच तुलना केली पाहिजे व त्यांत जर ते श्रेष्ठ ठरले तर ते सर्व पेशव्यांत थोर होत हेंही कबूल केलें पाहिजे.

आतां हेंही खरें आहे कीं, प्रसंग हा मानवी प्राण्यांच्या गुणसिंधूला भरतें आणणारा चंद्र होय. प्रसंगाशिवाय मनुष्याच्या अंगचे गुण वनांत

सुकलेल्या गुलाबाच्या पुष्पांप्रमाणें होत. माधवरावांच्या अंगीं जे जे गुण वास करीत असलेले आपणांस दिसतात, ते ते पूर्वींच्या पेशव्यांचे अंगीं नसतील असें नाहीं; पण ते गुण प्रगट करण्याची संधि जशी माधवरावांना प्राप्त झाली, तशी दुसऱ्या कोणाला मिळाली नाहीं व त्याच कारणांनीं त्यांच्या त्या अदृश्य गुणांची आपल्याला कल्पना होणें नाहीं. माधवराव गादीवर आले त्यावेळची संकटपरंपरा व अत्यंत दुस्तर परिस्थिति व त्यांतून माधवराव निभले ही गोष्ट, ह्या दोन गोष्टी ऐकतांच त्यांच्या अजब कर्तृत्वशक्तीनें मनुष्य थक्क होतो, "व्यावर्तितातपरुजः प्रथमाभ्रवृष्ट्या, वृक्षस्य वैद्युत इवाग्निरुपस्थितोऽयम्" याप्रमाणें हिंदुपद-पादशाहीची पानपतच्या भयंकर रणकंदनानें दुर्दशा झाली आहे; दोन लाख बांगडी फुटल्यानें महाराष्ट्रांतील प्रत्येक घरांतून अबलांच्या हृदयद्रावक किंकाळया व वृद्ध मातापितरांचे हंबरडे ऐकूं येताहेत; स्वराज्य-प्रासादाचे स्तंभ जे सरदार लोक, ते खालुच्या घरचे वासे मोजूं लागले आहेत; नुकताच उदगिरचे लढाईंत बडविलेला निजाम, म्हैसूरचा हैदर, रोहिलखंडचा नबाब, अयोध्येचा नबाब असे एक ना अनेक कोल्हे क्षणभर क्षीण झालेल्या मराठी सिंहास मृतप्राय मानून त्याच्या मांसाची वांटणी करण्यास उद्युक्त झाले आहेत; एका दोन महिन्यांत स्वकुलगृहाचे तीन आधारस्तंभ पडल्यानें वरील इमारत डळमळूं लागली आहे; आजपर्यंत कोणच्याही पेशव्यांना अननुभूत असा फितूर राहू महाराष्ट्र राज्येंदूला ग्रासूं पहात आहे व होळकर, भोंसले, बुंदेले इत्यादि कृतघ्न सरदार, ज्याचें अन्न खाल्लें त्याची अशी दीन स्थिति असतां, खुशाल तमाशा पहात उभे आहेत व आपआपली तुंबडी कशी भरते या आपस्वार्थी चिंतेंत निमग्न आहेत; अशा अत्यंत आणीबाणीचे प्रसंगीं १७ वर्षाचें पोर — कीं ज्या वयांत स्वतःचे शरिराचीही शुद्ध नसते व भावंडांतील कलह मिटविण्याची अक्कल नसते — अशा अल्प वयांत आमचा राजबिंडा माधव, प्रपितामहांनीं संपादन केलेल्या व पितृपितामहांनीं अटकेस नेऊन भिडविलेल्या जरीपटक्याचा असह्य तोल संभाळण्यास दंड ठोकून उभा तो काय रहातो, व कविकुलमुकुटमणींच्या "भुवमधिपतिर्बालावस्थोऽप्यलं

परिरक्षितुम्। न खलु वयसा जात्यैवायं स्वकालसहोभरः।" या वचनास यथार्थ करून एका दहा वर्षांत झंझावाताप्रमाणें वरील अभ्रपटल पार विध्वंसून टाकून महाराष्ट्रराज्याकाश निर्मल न काय करतो ! ! खरोखर असल्या प्रसंगीं जर थोरले माधवरावांविरहित कोणचाही पेशवा गादीवर असता तर त्याला इतक्या बेमालून रीतीनें हीं सर्व संधानें साधणें अशक्य होतें ! कारण माधवरावांच्या वेळेला इतकी कठीण परिस्थिति होती कीं, ती पूर्वीं कोणच्याच पेशव्याचे वांट्यास आली नाहीं. शिवाय माधवरावा-पेक्षां पूर्वींच्या तिघांही पेशव्यांना पुष्कळ अधिक सवलती होत्या. बाळाजी विश्वनाथाला जसा शाहूमहाराजांचा जबर पाठपुरावा होता, तसा माधवरावांना कोणाचाच नव्हता. शिवाय बाळाजी विश्वनाथापेक्षां राज्यशकटचालन माधवरावांचे वेळेस कितीपट तरी दुस्तर झालेलें होतें, हें वरील वर्णनावरून दिसेलच. बाजीरावाशीं तुलना करूं लागलें असतांही असें आढळून येईल कीं, त्याच्यापेक्षां जास्त जबाबदारीचीं कामें माधवरावांस पार पाडावीं लागलीं. त्यांस एक तर चिमणाजी आप्पासारखा कोणी जोडीदार सहकारी नव्हता. शिवाय शिंदे–होळ-करादि सरदारांचीं प्रस्थें बाजीरावाचे वेळेस बिलकुलच डोईजड नव्हतीं व इतकीं कृतघ्नही बनलीं नव्हतीं. बाजीरावाला मोठा व कायमचा शत्रु म्हटला म्हणजे काय तो एकटा निजाम; पण माधवरावांच्या वेळेला तो निजाम तर होताच, पण हैदर, इंग्रज, रोहिले, रजपूत — सारांश, हिंदु-स्थानी सर्व राजे पेशवाईच्या नाशाकरितां " व्रणार्थ पशुच्या शिरावरि वनीं उभे काकसे " राहिले होते ! बाजीरावाला कर्जाचा जाच सोसावा लागला तर तो आमच्या माधवरावांनाही सुटला असें नाहीं; अशा रीतीनें बाजीरावापेक्षां खडतर स्थितींत सांपडूनही ज्यांनीं खची झालेल्या राज्यवृक्षाचा जोम " कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें " या न्यायानें वृद्धिंगत केला, त्यांची थोरवी काय वर्णन करावी ? आपल्या नातवाचें हें अवर्णनीय चातुर्य पाहून त्या पितामहांनीं मात्सर्यरहित होऊन स्वर्गीं आश्चर्यानें तोंडांत बोटच घातलें असेल ! आतां नानासाहेबांसंबंधानें पाहिलें, तर त्यांना शूर, चतुर व कारस्थानी अशा भाऊदादांचें साह्य

होतें. सर्व सरदार लोक आपआपल्या इमानास जागत होते; " विभव यशाचे सदैव पोशिंदे " असे तुकोजी, दत्ताजी व जनकोजी शिंदे व " रिपुंसि महादर देते " राजेबहाद्दर व समशेरबहाद्दर असलेले एकेक वीर हातावर शीर घेऊन उच्चारलेला शब्द सिद्धीस नेण्यास खडे होते व छत्रपतींच्या वेळेपासून मराठ्यांचा बसलेला अद्भुत दरारा कायम होता शिवाय घरांत फितुरानें पोखरण्यास आरंभ केला नव्हता. पण ह्या सव लतीं पैकीं एक तरी सवलत रावसाहेबांस मिळाली काय ? नाहीं; अगदं नाहीं. सर्व प्रकार याच्या अगदीं उलटा. पण त्या पठ्ठ्यांनीं या संकटांस भीक घातली काय ? बिलकुलच नाहीं. त्यांनीं भ्रातृपितृपितृव्यशोकाचे असह्य उमाळे दाबून टाकून काकांचा शक्य तिथवर बोज ठेवला व तोच त्यांचा क्रम जेव्हां मर्यादातिक्रम करूं लागला, त्या वेळेस कोणा च्याही आधाराची वा दपटशहाची पर्वा न करितां सामदंडादि साधनानें योग्य शासन देऊन आधीं घरांतील कलह मिटविला; " सख्या विठ लाच्या " जगप्रसिद्ध शहाणपणाला बिल्ली मांजर बनविलें; राक्षस भुवनाच्या लढाईंत स्वतःचे शौर्याची व कर्तबगारीची कमाल करून निजामाची हड्डी नरम केली; फितुरी रघुजीला यथेच्छ चोप दिला; हैदराल तर वेळोवेळीं चीत केलें; रोहिल्यांचा सूड उगविला; रजपुतांना वठणी वर आणलें व शिवाय दिल्ली बहुतेक हाताखालीं घातली ती निराळीच सारांश, भयंकर वादळाचे तडाक्यांतून गवसलेल्या व समोरील खडका वर आपटून छिन्नभिन्न होण्याच्या बेतांत आलेल्या तारवास जस एकादा कुशल कर्णधार मिळावा व त्यानें त्यास अलगत तीरास न्यावें त्याचप्रमाणें मोठ्या शिताफीनें, माधवरावानें स्वराज्यास त्या वेळेर जगविलें.

ही नुस्ती राजकीय गोष्टींत तुलना झाली. पण प्रजावात्सल्य, मनुष्याचं पारख, इभ्रत, शौर्य, कारस्थानीपणा वगैरे जें जें कांहीं म्हणून राजाल अवश्य पाहिजे, तें तें माधवरावांच्या अंगीं एकवटलेलें होतें. माधव रावांच्या अंगीं बाळाजी विश्वनाथाप्रमाणें व बाळाजी बाजीरावांप्रमाणं कारस्थानपटुत्व होतें; बाजीरावाप्रमाणें शूरत्व व धाडस होतें. शिवाय

मनुष्याची पारख करण्याचे कामांत तर त्यांची कमाल होती ! तसल्या अल्पवयांत जीं जीं मनुष्यें त्यांनीं निवडलीं, त्यांत एकही टाकाऊ निघाला नाहीं. नाना फडणीस, रामशास्त्री, महादजी शिंदे, त्रिंबकराव मामा पेठे इत्यादि त्यांची मंडळी यच्चावत् आपापल्या सद्गुणतेजोराशीनें भारतेतिहासांत लखलखत आहेत ! तसेंच, प्रजावात्सल्याचे कामीं ते किती दक्ष असत हें बिगारी धरण्याची बंदी केली या गोष्टीवरूनही दिसून येईल. सारांश, पूर्वीच्या सर्व पेशव्यांचे गुण पुष्कळ पटीनें गुणीभूत होऊन माधवरावांच्या अंगांत एकवटले होते व म्हणूनच ते — म्हणजे श्रीमंत माधवराव बल्लाळ ऊर्फ थोरले रावसाहेब पेशवे हे सर्व पेशव्यांत अति थोर होत. इतकेंच नव्हे, तर जगांत आजवर जे कोणी नामांकित राजे होऊन गेले, त्यांच्या मालेचे मध्यभागीं आमच्या या भारती रत्नाला सद्गुणें करून गुंफण्यास बिलकुल हरकत नाहीं.

१०

## इंग्लंडांतील गृहव्यवस्था

इंग्रज कुटुंबांत संसाराची सर्व व्यवस्था स्त्रीचे स्वाधीन असते. नवरा महिन्याचे प्रारंभीं कांहीं नियमित रक्कम आपल्या पत्नीजवळ देतो. या पैशाचा व्यय कसा होतो, त्याचा जमाखर्च ती अगदीं तंतोतंत ठेविते आणि नियमित वेळीं आपल्या पतीस दाखविते. संसारांत काय जे जिन्नस-पान्नस लागतील ते पत्नीनें विकत आणावयाचे. बाजारहाट करावयाचें काम तिचें; रोजच्या रोज कोणाला काय लागेल तें ज्याला त्याला नियमित वेळीं द्यावयाचें, कोणाचें कांहीं फाटलें सवरलें तें पाहून शिवावयाचें; सारांश, संसाराच्या संबंधाचें सर्व काम तिचें. घराची मालकीण चांगली सुशिक्षित व दक्ष असल्यावर सुखासमाधानास काय तोटा ? काटकसर करून संसार करणें तिच्या अगदीं हातचें असतें. परंतु तीच जर अगदीं अशिक्षित असली तर संसाराची धूळधाण ठेवलेली आणि सुख अर्थात्च कोणासही मिळावयाचें नाहीं.

इंग्लंडांत मध्यम स्थितींतल्या कुटुंबांत फार तर दोन नोकर असतात. बहुतकरून एकच असतो. ती मोलकरीण असते.

कोण्या कुटुंबांत पुरुष नोकर असला तर त्याची बडेजाव फार असते. त्यास मोठा भबक असा पोशाख दिलेला असतो. त्याच्या त्या पोशाखाचीं बटनें वगैरे अगदीं गिलिटाचीं चकचक करीत असतात. घरचा मालक पहावा तर अगदीं साधा पोशाख करून व साधी टोपी घालून हिंडतो. परंतु त्यांचे बटलरसाहेब पहावें, तर अगदीं चकफक पोशाख करून रेशमी पायमोजे चढवून व केंसावर सुवासिक भुकटी टाकून अगदीं नटलेले असतात. त्याचप्रमाणें गाडी हांकणारा कोचमन्साहेबसुद्धां अगदीं पहिल्या प्रतीचा ऐटबाज पोषाख करतो. उंच अशा त्याच्या त्या टोपीच्या

भोंवतीं एक रुपेरी पट्टा असावयाचा. हातांत हातमोजे असावयाचे; तथापि अगदींच अजाण माणसाखेरीज कोणी त्यास यजमान समजून फसावयाचा नाहीं.

या सर्व वर्णनावरून एवढेंच घ्यावयाचें कीं, इंग्रज गृहस्थांस स्वतः नटण्याचा किंवा ऐटबाज पोशाख वगैरे करण्याचा अतिशय तिटकारा असतो. त्यांचा खरा मोठेपणा आणि त्यांची खरी दानत त्यांच्या उत्तम शीलावरून आणि गृहव्यवस्थेवरूनच दिसून येते.

इंग्रज स्त्रीही दिवसा दागदागिने घालून बसावयाची नाहीं. इंग्रज लोकांत कार्यसमारंभ बहुतकरून रात्रीं होतात, व त्या समारंभाचे वेळीं स्त्रिया आपआपलीं भूषणें घालतात. केव्हां केव्हां दिवसाही कित्येक स्त्रिया आंगठ्या माळा वगैरे घालून दागदागिन्यांचें प्रदर्शन करीत रस्त्यानें जातांना दृष्टीस पडतात. परंतु अशा स्त्रिया कुलीन नव्हेत, असें खात्रीनेंच समजावें.

अशी म्हण आहे कीं, गृह म्हणजे गृहिणीच होय. जेथें नुसता पुरुषच आहे तें गृह नव्हे; ती गुहा.

हें पुष्कळ अंशीं खरें आहे. परंतु ' गृह ' कसें असणार, हें गृहिणी जशी असेल त्यावर अवलंबून असतें.

बहुतेक इंग्रज स्त्रियांना सर्व गृहकृत्यें येत असतात. श्रम करणें म्हणजे हीनपणाचें काम नव्हे, तर त्यांत उलट मोठेपणा आहे असाच इंग्रज लोकांचा समज आहे. इंग्रज लोकांस स्वातंत्र्य फार आवडतें. स्वावलंबनाची खरी योग्यता त्यांस कळलेली असल्यामुळें, त्यांची समजूत अशी झाली आहे कीं, जो स्वतःचें काम स्वतः कराल, त्याचें, काम लोकही तितक्याच आस्थेनें करतील.

या समजुतीमुळें नवीन लग्न झालेलीं वधुवरें चाकरनौकर न ठेवितां संसार करूं लागतात. ही स्थिति गरीबगुरीबांतच आहे असें नाहीं, तर मध्यमस्थितींतल्या सुखवस्तु लोकांतही नौकरांवांचून चालेल तितकें चालविण्याची उत्सुकता असते. इंग्लंडांत नौकर लोकांचे पगार फार असतात, याही कारणामुळें नौकर ठेवण्याची लोकांस फार अडचण पडते.

शिवाय इंग्लंडांत नौकरांवांचून भागविणें सोपेंही आहे. कारण एक तर तेथें खोल खोल विहिरींचें पाणी काढून दूर दूर वाहून नेण्याची जरूरी नाहीं. कित्येक घरांत तळमजल्यापासून शेवटल्या मजल्यापर्यंत पाण्याची उत्तम सोय केलेली असते. नळीची कळ फिरविली कीं, सर्व सांडपाणी खालीं जाऊन गटारांस मिळतें. प्रत्येक घरांत धुराचे दिवेही असतात. यामुळें दिवे साफ करण्याचें वगैरे काम नसतें. नुसती एक कळ फिरवून नळीच्या तोंडाशीं पेटविलेली काडी धरावयाची, कीं पेटला दिवा! विस्तव पेटविण्यास सर्पण म्हटलें म्हणजे दगडी कोळसा होय. हा कोळसा फार संथपणें जळतो. या सर्व गोष्टींमुळें इंग्लंडांतील स्त्रियांचीं बरींच कामें कमी होतात. अन्न शिजवावयाचें तें एकदां तयार करून चुलीवर ठेवून दिलें म्हणजे कांहीं नियमित वेळपर्यंत तिकडे पाहण्याचीसुद्धां जरूरी लागत नाहीं.

प्रत्येक गृहिणीला संसाराचीं सर्व कामें करतां येतात आणि वेळ पडल्यास ती कोणतेंही काम करण्यास मागें घेत नाहीं व तें करण्यास तिला लाज वाटत नाहीं.

इंग्लंडांत धोबी हा मुळींच माहिती नाहीं. कांहीं धोब्यांचीं दुकानें आहेत. परंतु धुण्याचें काम बहुतकरून घरच्या घरींच केलें जातें. आठपंधरा दिवसांनीं धोबीण घरीं येऊन धुण्याचें काम करते. परंतु तिला त्या दिवसाबद्दल दोन किंवा अडीच रुपये द्यावे लागतात. एक दिवस धुण्यांत व दुसरा दिवस इस्तरी करण्यांत जातो. जेवढे कपडे विशेष किंमतीचे वगैरे असतात तेवढेच धोबिणीकडून धुवून घेतले जातात. बाकी सर्व घरच्याघरींच धुण्याची वहिवाट आहे. काय काम करावें आणि काय करूं नये, याबद्दल कधीं कोणी विचार करीत नाहीं. कारण अमुक काम हलकें आणि तें घरांत करूं नये, असें कोणासच वाटत नाहीं.

हें मुद्दाम सांगण्याचें कारण इतकेंच कीं, इंग्रज लोकांचे घरीं पुष्कळ चाकरनोकर असतात, त्यांवांचून त्यांचें चालतच नाहीं, सुशिक्षित मडमांस गृहकृत्यांचा अगदीं तिटकारा असतो; अंगमेहनतीचीं कामें व मुलांची जोपासना करणें त्यांस मुळींच आवडत नाहीं; हीं सर्व कामें त्या

चाकरनौकरांकडून करवितात, असा या देशांतील लोकांचा समज आहे; परंतु हा समज अगदीं चुकीचा आहे. इंग्लंडांतील सर्व कुलशीलवती व सुशिक्षित स्त्रिया असेंच समजतात कीं, संसारांत पतीला सर्व प्रकारचें साहाय्य करणें व आपल्या आणि इतरांच्याही मुलांबाळांची जोपासना उत्तम प्रकारें करून त्यांस सुशिक्षित व सुगुणी करणें हें आपलें मुख्य कर्तव्य आहे; आपला तो धर्म आहे. तो पाळण्याविषयीं त्या फार तत्पर असतात, आणि तो उत्तम प्रकारें आपल्या हातून पाळला जावा अशासाठीं परमेश्वराचें साहाय्य मागतात.

आतां मध्यम स्थितींतल्या कुटुंबांतील गृहिणीची दिनचर्या कशी असते तें थोडक्यांत सांगतों; म्हणजे तिला काय काय कामें करावीं लागतात आणि तीं ती कशीं करते हें ध्यानांत येईल.

आदले दिवशीं रात्रीं निजावयास जाण्यापूर्वी ती चुलीपाशीं कागद, सर्पण व कोळसे आणून ठेवते. नवरा उठल्याबरोबर तेथें जाऊन विस्तव पेटवून कॉफीसाठीं आधींच पाण्यानें भरलेली किटली चुलीवर ठेवून देतो. इकडे बायको पोषाख करून तयार होत असते. इंग्लंडांत कोणीही दिवसाचेच कपडे रात्रीं अंगांत घालीत नाहीं. रात्रींचे कपडे लोंकरीचे असतात. हे कपडे अंगांत घालून निजलें असतां प्रकृति चांगली निकोप रहाते, सबब हे कपडे घालणें अगदीं अवश्य आहे. अंथरुणांतून उठून दुसरे कपडे चढविण्यापूर्वी थंड पाण्यांत एक बुचकळी मारून स्नान करण्याची अगर स्पंजानें अंग धुण्याची वहिवाट आहे. असें स्नान किंवा अंगधुणें झालें, म्हणजे अंगांत उष्णता उत्पन्न होऊन रुधिराभिसरण नीट सुरू होण्यासाठीं टुवालानें अंग घांसघांसून पुसतात. या कृत्यास एकंदर पांच मिनिटें सुद्धां लागत नाहींत. परंतु तें यथायोग्य तऱ्हेनें केल्यास सरदी किंवा ताप यांचा उपद्रव होण्याचें भय नसतें.

वर सांगिल्याप्रमाणें स्नान केल्यानंतर यजमानीण आपला झगा वगैरे नेसून व इतर कपडे अगदीं ठाकठिकीनें घालून परमेश्वराची प्रार्थना करते व गृहकृत्यें करण्यास लागते. ती चुलीपाशीं जाते, तों पाण्यास आधण येऊन तें सळसळण्याच्या बेतांत असतेंच. तें उतरून ती कॉफी

तयार करते. शिवाय सकाळच्या न्याहारीसाठीं म्हणून जे काय पदार्थ तयार करावयाचे असतील तेही ती तयार करते. जें काय करावयाचें तें सर्व ठाकठिकीनें करण्याबद्दल फार दक्षता असते. त्यांत नौकर नसून गृहिणीस स्वतःच सर्व जिनसा तयार करावयाच्या असल्या तर विशेषच नीटनेटकेपणानें होतात. जेवणाचें टेबल सुंदर अशा फुलांच्या झुबक्यांनीं शोभिवंत केलेलें असतें आणि काय जिन्नस केले असतील, ते त्या टेबलावर ठेविले जातात. इतक्यांत पति आपलें सर्व आटोपून नीटनेटका पोषाख करून येतो. मग पति आणि पत्नी मोठ्या आनंदांत गप्पागोष्टी करीत जेवतात. जे लोक धर्मनिष्ठ असतात, ते भोजनास सुरुवात करण्यापूर्वीं दोघेही गुडघे टेकून परमेश्वराची प्रार्थना करून आपणांस त्यानें संकटकाळीं रक्षण करावें, अशासाठीं त्याची करुणा भाकतात. जेवण झाल्यानंतर पति मोठ्या प्रेमानें आपल्या पत्नीचा निरोप घेऊन आपल्या कामावर जातो.

## ११

## आर्यांची चर्या

'ज्याच्या सर्व इच्छा गेल्या आहेत, ज्याचें चित्त आत्म्याच्या आधीन आहे, ज्यानें सर्व गुंता सोडिला आहे, तो जर केवळ शरीरानें कामकाज करीत असेल तर त्यास त्या कामाचें पाप लागत नाहीं.' भगवद्गीता, ४।२.

'माझ्या ठिकाणीं मन ठेव, माझा भक्त हो, माझें पूजन कर, मला नमस्कार कर, मी सत्यप्रतिज्ञा करितों कीं, तूं मला प्रिय आहेस, तूं मला येऊन मिळशील.' –गीता १८।६५

नीतिविशिष्ट वर्तन हें बाहेरील वागणुकीच्या मुळाशीं व आंतील इच्छांच्या मुळाशीं असतें व दुनियेंतील प्रत्येक राष्ट्रांत कांहीं विशेष प्रकारचें वर्तन आढळतें व तेंच त्या राष्ट्राच्या इमारतीच्या पायाच्या भरणीचें काम होय. हे वर्तनाचे निरनिराळे मासले एकत्र केले म्हणजे त्या काळच्या सर्व मनुष्यजातीच्या गुणधर्माचा बोध होतो. हे मासले म्हणजे मनुष्यजातीचीं निरनिराळीं घटक-द्रव्यें व मूलतत्त्वें होत. कांहीं लोकांच्या बाहेरील सामाजिक स्वरूपाचा सारासार विचार करीत असतां, हें स्वरूप त्या राष्ट्राच्या वर्तनाचें बाहेरील अंग होय व त्याची सर्व घटना हळूहळू आंतून होते हें समजणें जरूर आहे. राष्ट्राच्या पूर्वगत वर्तनास जुळेलसे कांहीं फेरबदल करूं म्हटलें तर ते सहज करतां येतात व असल्या जातींचीं कलमें वाढीस लागतात व तीं मूळ खोंडांत कांहीं विशेष रूपांतर करूं शकतात. पण जीं कलमें अगदीं विजातीचीं असतात तीं तशीं वाढत नाहींत, तीं मरतात.

मूळच्या आर्य लोकांचे जे नमुने होते ते ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत व त्या उत्तम मासल्यांची जी काय थोडीबहुत शिल्लक बाकी प्रस्तुत राहिली आहे, ती त्यांचें सौंदर्य व शोभा यांची हल्लींही साक्ष देते. लोक अत्यंत

धार्मिक होते व त्या धार्मिकपणापासून आपोआप एक समाजसंस्था उत्पन्न झाली. तिची घटना धार्मिक कल्पना तडीस नेण्यासारखी व शरीरादि नीच सृष्टीस मनसादि उच्च सृष्टीच्या आधीन ठेवण्यासारखी होती म्हणून हें सर्व राष्ट्र एक शाळा बनून तींत आत्म्याच्या विकासास हरएक गोष्टीची अनुकूलता व मदत मिळत असे. अशा त्या भूतकाळाचा परिणाम वर्तमान-काळीं असा झाला आहे कीं, हें भरतखंड सांप्रतकाळीं अगदीं निकृष्ट स्थितीस येऊन पोहोंचलें आहे, त्याच्या धार्मिक वृत्तीचा नाश झाला आहे व त्याच्या धार्मिक तेजाचा समूळ उच्छेद झाला आहे. तरी पृथ्वीच्या पाठीवर असा हा एकच देश आहे, कीं ज्या ठिकाणीं आत्म्यास प्रथम-पासूनच कोणी सर्व जड व ऐहिक सुखांच्या शिरोभागीं नेऊन ठेविलें तरी त्याची वेड्यांत गणना होत नाहीं; व असा हा एकच देश आहे कीं, ज्यांत धार्मिकपणा अद्यापही त्याच्या वातावरणांत घिरट्या घालीत आहे व ज्यांत बाहेरील परिवार कितीही असला तरी तो आत्म्यास ऐहिक सुखास बद्ध करीत नाहीं व तो त्यास वर चढण्यास हातभार लावितो.

पण ह्या उच्च धार्मिकपणाशिवाय ह्या आर्यवर्णाची दुसरी एक बाजू आहे व तिचें हल्लीं फारच महत्त्व आहे. या आर्यांच्या ठायीं दुर्जय, सत्त्वशीलपणा व अत्युच्च नीतिमत्ता वसत होती व ज्या कोणास आर्यांच्या धार्मिकपणानें यापुढें पुन्हां आपलें डोकें वर काढावें असें वाटत असेल, त्यांनीं आपलें लक्ष्य आतां आर्यांच्या सद्गुणांकडे द्यावें व झाडून सर्व गृहस्थांच्या चरित्रांमध्यें त्याचें होईल तितकें पुनरुज्जीवन करण्यास झटावें.

पूर्वी धार्मिकपणापासून मातापितरें, गुरुजन, व इतर वाडवडील यांच्याविषयीं पूज्यभाव उत्पन्न झाला. देवाविषयीं पूज्यभाव एका व्यक्ती-पासून सर्व कुटुंबांत पसरला व सर्व समाजाचा पूज्यभाव ज्यांनीं प्राण-अन्न देऊन जड शरीर पोशिलें, त्या आईबापांकडे — व ज्यांनीं द्विजत्व देणारी विद्या देऊन आंतील मन पोशिलें त्या गुरुजनांकडे — व ज्यांच्या परिपक्व झालेल्या शहाणपणानें त्यांस दुसऱ्या इहपर गोष्टींचा बोध केला व ज्यांच्या तोंडून त्यांस प्राचीन दंतकथा कळल्या त्या वाडवडिलांकडे

वळला. अशा त्या काळीं मुलांस आदरशील होण्यास शिकवीत असत. पण हल्ली तो मनु बदलून गेला आहे.

ह्या पूज्यभावापासून सभ्यपणा उत्पन्न झाला. त्या सभ्यपणाचा ठसा सर्व वर्णांच्या वर्तनावर उमटला व आतां देखील तें वर्तन येथें केवळ मासल्याला राहिलें आहे, तरी तें आहे व त्यानें संसाराच्या रथाच्या चाकांत वंगण घालून त्यांचें घर्षण मोडिलें आहे. नंतर आतिथ्य उत्पन्न झालें. त्याप्रमाणें अतिथीचा देवासारखा आदरसत्कार करण्याचा प्रघात पडला. हें काम सढळ हातानें व उदार अंतःकरणानें करावें लागे. त्या आदरसत्काराची बहीण दया म्हणून आहे ती येथें आली; तेव्हां इतरांजवळ भरपूर सामुग्री आहे तों कोणीही उपाशीं मरत नसे व इतरांस जें पाहिजे तें कोणाजवळ असलें तर तो तें त्यास आनंदानें देत असे व तें त्यांस देवविण्यास कायद्याची जबरदस्ती लागत नसे. कारण गृहस्थ म्हटलें म्हणजे सर्व राष्ट्राचे कोठीवाले किंवा मोदी समजले जात असत. तेव्हां ह्या आर्यभूमातेचीं मुलें अन्नवस्त्रांवांचून कोणीही नसत. भक्ति, विनय, आदरशीलता, दया हे सामाजिक सद्गुण आहेत. ते ज्या आर्यांत वसत असत, त्यासच गृहस्थ म्हणत व ह्या गुणांनीं गृहस्थाचें चरित्र मोठें लोभनीय होऊन गेलें होतें.

पण हे गुण इतके मोहक आहेत, तरी आर्यांच्या वर्तनाचा पाया सत्याच्या खडकावर उभारिला नसता तर त्या वर्तनाची घटना पाहिजे तशी नीतिविशिष्ट झाली नसती ह्यांत संशय नाहीं. आर्य कधींही खोटें बोलत नसत. असत्यानें आर्यांची जीभ कधींही विटाळत नसे. वचनपालनाचें व्रत, निरंतर कांटेतोलपणा व रेखलेपणा—ह्यांचें शिक्षण लोकांस धर्मसूत्राप्रमाणें उत्तम उदाहरणांवरून मिळत असे. जें सत्य हरएक गोष्टीचें जीवन आहे व ज्याच्यावांचून हरएक गोष्ट सुकून मरते, त्या सर्वोत्कृष्ट सद्गुणाचें ह्या राष्ट्राच्या चरित्राशीं असें बेमालूम संमेलन झालें होतें कीं, आर्यांचा शब्द जेव्हां छापील कागदावरील करारनाम्यापेक्षां जास्त योग्यतेचा होता, त्या काळाची आठवण हल्लींच्या हिंदूंच्या कांहीं चालीरीति अद्याप देतात. पण हाय हाय! आर्यभूमीच्या हल्लींच्या भ्रष्ट

संततीस सदरहू वर्णन लागू पडत नाहीं व हिंदुस्थानच्या कांहीं भागांत जेथें पूर्वीं सत्याचें साम्राज्य होतें, तेथें हल्लीं असत्याचें साम्राज्य होऊं पहात आहे. म्हणून माझी अशी इच्छा आहे कीं, प्रत्येक आर्यपुत्रानें आपल्या मनानें असें एक व्रत धरावें कीं, मी तहाहयात सत्यास काळीमा लागूं देणार नाहीं. कारण सत्यप्रतिज्ञ होऊन त्यास स्वदेशाचें जितकें हित करतां येईल, तितकें तो पंडित, वकील व मुत्सद्दी यांच्या मंडळाचा शिरोमणि होऊन सदोदित झळकत राहिला, तरी तें त्यास करितां यावयाचें नाहीं.

धैर्य हें सत्याच्या संगतीनें असतें व निर्भयपणा हा आर्य लोकांचा विशेष गुण होता. जो कोणी इतरास इजा करीत नाहीं तो कोणास भ्यावयाचा नाहीं. तसेंच निर्भयपणाचें दुसरें अंग मार्दव असे. दुःख दिलें कीं पुढें त्याचेबद्दल दुःख भोगणें भाग असतें. कारण ईश्वरीसूत्राचा अंमल बिनचूक चालतो व प्रत्येक पापाच्या कर्माबद्दल दुःखाचें बक्षीस रोकडें ठेवलेलें असतें. म्हणून निरुपद्रवीपणा हा मोठा परमधर्म होय व म्हणूनच ब्रह्माच्या वर्णनांत ब्रह्मास ‘ निर्भय ’ असें विशेषण लाविलेलें आढळतें.

राष्ट्रांच्या चढाओढींत ह्या आपल्या हिंदुस्थानानें आपलें डोकें वर काढावें असें असेल तर हिंदुस्थानच्या नव्या पिढीच्या मुलांनीं आपल्या चरित्रांत त्या मासलेवाईक प्राचीन आर्यांच्या नीतिविशिष्ट वर्तनाचें अनुकरण केलें पाहिजे. मीं सद्गुण सांगितले, ते त्या वर्तनांतील ठळक गुण आहेत व त्याविषयीं कोणाचा वाद नाहीं व आर्यांच्या हल्लींच्या बालकांमध्यें त्यांचें पुनरुज्जीवन झालें तर ह्या मोडकळीस आलेल्या राष्ट्राची पुन्हां उत्तम घटना होऊं लागेल. ‘ वर्तन जसजसें नीतिविशिष्ट असेल तसतसें नशीब बदलतें, ’ व हिंदुस्थानचें नशीब हिंदूंच्या वर्तनावर अवलंबून आहे. ज्या तरुण बांडांचें हृदय स्वभूमिमातेच्या प्रेमानें जळत असेल, त्या लोकांकरितां ही कामगिरी तयार आहे. कारण फक्त शुद्ध नीतीच्या अग्निकुंडांत दिव्य अग्नीची ज्योत उत्पन्न होते व तिच्या योगानें अर्पिलेल्या इच्छारूप समिधांचें धर्मज्वालांत रूपांतर होतें.

## १२

## छत्र्या

कोणचीहि नवी गोष्ट अस्तित्वांत कशी आली यासंबंधाचा इतिहास शोधूं जाणें हेंही एक मौजेचें काम आहे. कित्येक गोष्टी अशा आहेत कीं, ज्याचा वापर आपण दररोज दरघडीं करतों आहों, परंतुती गोष्ट प्रथमतः अस्तित्वांत आणली कोणीं आणि कां, असा जर प्रश्न आपणांस कोणी केला तर त्याचें उत्तर देणें अगदीं कठीण आहे. ज्या गोष्टीचा उगमच आपणांस समजत नाहीं त्यास आपण अनादिसिद्धच समजतों. बटाटे आपल्या देशांत नव्हते ते परकीय देशांतून आले, या गोष्टी शिकलेल्या लोकांस जरी ठाऊक असल्या, तरी साधारण सर्व लोकांस तें ठाऊक नाहीं. इतकेंच नव्हे, तर परकीय देशांतून ते आले असतील ही गोष्ट त्यांस खरीसुद्धां वाटावयाची नाहीं. छत्र्या या आमच्या देशांत तरी निदान अगदीं अनादिसिद्धच आहेत अशी आम्हां सर्वांची समजूत आहे आणि ती समजूत ढळण्याला कांहीं कारणही झालेलें नाहीं. पुराणांतरीं राजांच्या वगैरे कथा आहेत, त्या कथांतून राजचिन्हांपैकीं छत्र-चामर हीं राजाचीं चिन्हें होत असें ठिकठिकाणीं वर्णन आढळतें. आतपत्र म्हणजे उन्हापासून संरक्षण करणारें, तेंही अनेक ठिकाणीं वर्णनांत सांपडतें. छत्र्यांची कल्पना मुख्यतः— किंबहुना सर्वतोपरी मूळची ऊष्ण प्रदेशांतलीच होय यांत तिळमात्र संशय नाहीं. एशिया-खंडांत बहुतेक देशांत छत्र हें राजवैभवाचें चिन्हच होय, इतकेंच नव्हे, तर ज्याच्या हाताखालीं अनेक मांडलिक राजे असतील, त्यास तर छत्रपति ही मोठ्याच बहुमानाची पदवी समजली जाते. छत्रचामर वगैरे राजवैभवाचीं चिन्हें होत हें सर्वत्र ठाऊक झाल्यामुळें छत्र आमचे देशांत अनादिसिद्ध आहे हें म्हणणें सयुक्तिक दिसतें. परंतु आजमितीस अगदीं

गरीबगुरीब लोकसुद्धां ज्याप्रमाणें छत्री वापरतात त्याप्रमाणें प्राचीनकाळीं छत्र वापरीत असत किंवा काय हें समजण्यास मार्ग नाहीं. किंबहुना वापरीत नसतील असेंच म्हणण्यास अधिक आधार आहे. अगदीं जुनीं जुनीं अशीं जीं लेणीं वगैरे आहेत त्यांत देवादिकांचीं चित्रें खोदलेलीं आहेत, त्यांचे डोक्यावर छत्र खोदलेलें असतें. इजिप्त वगैरे जे देश आहेत त्यांतही प्राचीन राजाच्या वैभवाचें चिन्ह म्हणजे त्यांचे डोक्यावर छत्र धरलेलें असावयाचें. एकंदरींत, सर्व एशियाखंडांत राजचिन्हांत छत्र हें एक अगदीं आवश्यक असें चिन्ह आहे. सुमारें चाळीस वर्षांपूर्वीं ब्रह्मदेशांत गव्हर्नरजनरलसाहेब गेले असतां तेथील राजाच्या मुलाखतीच्या वेळीं राजानें आपणां स्वतःविषयीं "पौर्वात्य देशांतील सर्व छत्रपति राजांचा मुख्य छत्रपति मी आहें" असें वर्णन केलें. छत्र हें सतराव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत युरोपांत माहीत नव्हतें. त्याच्या प्रारंभास अतिशय श्रीमंत लोक – विशेषतः त्यांच्या बायका – सूर्याच्या तापापासून आपलें संरक्षण व्हावें म्हणून छत्र्या घेऊं लागले. या छत्र्या कातड्याच्या केलेल्या असून आंतल्या बाजूनें बारीक बारीक लांकडी ताणांनीं तें कापड ताणलेलें असे. घोड्यावर बसणारे लोक अशा प्रकारच्या छत्र्यांचा उपयोग विशेषतः करीत असत. व त्या छत्रीचा दांडा त्यांचे मांडीस जखडलेला असे. इटली देशांतून पुढें स्पेन व पोर्चुगल या देशांत छत्राचा उपयोग लोकांस कळून आला आणि तेथून तो जिन्नस अमेरिकेंत गेला. अमेरिकेंत ब्राझिल देशांत लोक छत्र्या करूं लागले. त्या कातड्याच्याच असून त्या कातड्यावरील केस त्यांजवर तसेच राहूं देत असत. फ्रान्स देशांत पुढें लवकरच हा जिन्नस शिरला. इंग्लंड देशांत सतराव्या शतकाच्या प्रारंभीं या जिनसाचा उपयोग होऊं लागला. प्रथमतः तेथील छत्र्या कांहीं कांहीं पाणपक्ष्यांच्या पिसाऱ्यांच्या आकाराच्या झाल्या व त्या पिसांच्याच बनविलेल्या असत. पुढें पिसांच्या ऐवजीं कातड्याचा उपयोग होऊं लागला. सतरावें शतक अर्धें झालें तेव्हां त्या देशांतील बायका पावसापासून आपलें संरक्षण करण्याकरितां छत्र्या घेऊं लागल्या, परंतु पुरुष घेत नसत. अठरावें शतक अर्धें गेलें

तेव्हां पुरुषांनीं व बायकांनीं दोघांनीही छत्र्या घेण्याचा प्रघात पडला. इ० स० १७५२त पॅरिसमध्यें गेलेल्या एका इंग्रज गृहस्थानें असें लिहिलें आहे कीं, येथील लोक उन्हापासून व पावसापासून आपलें रक्षण करण्यासाठीं छत्र्या घेत असतात; ही उपयुक्त वस्तु घेण्याचा प्रघात इंग्लंडांत अजून का पडला नाहीं ? जोन्स् या नांवाचा एक इंग्रज प्रवासी प्रथमतः इंग्लंडांत छत्री घेऊं लागला. शहरांतून हिंडावयाचें झालें म्हणजे तो छत्री घेऊन हिंडत असे. प्रथमतः अर्थात्च लोकांनीं त्याचा अतोनात उपहास केला. पण त्यानें तिकडे दुर्लक्ष केलें आणि आपला क्रम तसाच चालविला. होतां होतां त्यानें पाडलेला तो प्रघात त्याच्या हयातींत सर्वत्र पसरला. मात्र कित्येक वर्षेंपर्यंत छत्र्या घेणें हें बायकीपणाचें लक्षण आहे अशी लोकांची समजूत होती व छत्र्या घेणारांची तशाप्रकारें थट्टा उडत असे. परंतु आतां तसें कांहींच राहिलें नाहीं. सर्वच गोष्टी नवीन उपयोगांत आणावयाच्या असल्या म्हणजे बहुतकरून प्रथमतः त्या उपयोगांत आणणाराची टर उडते आणि कांहीं दिवसांनीं तो प्रकार सर्वत्र दृष्टीस पडतो.

१३

## कुलीन स्त्रियांचा आदर्श

आपलें आचरण, आपलें भाषण व आपण संसारांत जीं जीं कृत्यें करितों तीं सारीं अशीं असावींत कीं, त्यांच्या योगानें आपल्या स्वतांला व आपल्या कुलाला यत्किंचितही कोणीं नांवें ठेवूं नयेत. ज्या कुलांत आपण जन्माला आलों त्या कुलाचा आपल्या हातून होईल तितका आपण नांवलौकिक वाढवावा. त्याचें बदनाम होईल असें आपण मुळींच वागूं नये. आपल्या घराण्यांतलीं मागचीं माणसें आज जरी हयात नाहींत, तरी त्यांनीं ज्या मार्गानें आचरण केलें, त्यांनीं ज्या म्हणून चांगल्या चांगल्या गोष्टी केल्या, तो मार्ग व त्या साऱ्या गोष्टी हेच आपले कुलधर्म असें जाणून आपणही त्यांच्या कृतींना मान देऊन त्यांनीं घालून दिलेला कित्ता गिरविण्याचा प्रयत्न करावा. कुलशील पाहून जीं स्त्रीपुरुषें संसारांत वागतात तींच पुरुषें थोर व अस्सल कुलवान् असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. कुलवान् स्त्रीपुरुषांनीं जगांत जितकें जपून वागावें तितकें थोडेंच आहे. त्यांत विशेषेंकरून कुलीन बायकांनीं तर फारच जपून व मर्यादेनें वागलें पाहिजे. कुलाची खरी अब्रू व खरा लौकिक हा सर्वथैव त्यांच्यावर अवलंबून आहे. या जग-बाजारांतले बाजारकरी सगळेच प्रामाणिक व सत्यवान् असतात असें नाहीं. यासाठीं ज्या म्हणून खऱ्या वरंदाज, दानतशील व अब्रूदार बायका असतील त्यांनीं आपला पदर आंवरून धरूनच पाऊल टाकावें हें चांगलें. अब्रू ही केवळ कांचच्या भांड्याप्रमाणें आहे. एकदां ती गेली म्हणजे पुन्हां हातीं मुळींच लागत नाहीं. म्हणून आपल्या कुलाची शोभा आपली आपणच राखली पाहिजे. कारण—

> **“ जलकी शोभा कमल है, दलकी शोभा पील**
> **धनकी शोभा धरम है, कुलकी शोभा शील. ”**

एकंदरींत आपलें शील प्राण गेलें तरी सोडूं नये. आपण आपल्या कुलाचा व आपल्या वाडवडिलांचा अभिमान बाळगणें हा आपला खरा धर्म होय. साधारणपणें कुलीन स्त्रियांनीं आपलें वागणें, लेणें, नेसणें व बोलणें या सर्व गोष्टी आपल्या कुलाकडे पाहूनच कराव्यात; म्हणजे कसलीही भीति नाहीं. लोकापवाद हें एक कांटेरी झाड आहे. तें कोणत्याही रानांत गेलांत तरी नाहीं असें मुळींच होणार नाहीं. होतां होई तों त्याच्यापासून दोन पावलें दूरच चालावें म्हणजे झालें. याकरितां खऱ्या कुलांगनांनो, होतां होईल तों, तुम्हीं वाईट व निंद्य अशा गोष्टी अगदीं टाकून द्या. कारण त्याच गोष्टी तुमच्या स्वच्छ अशा कुलाला व स्वतःला कलंक लावणाऱ्या आहेत. कुलस्त्रियांचें लेणें–नेसणें साधें व सभ्य असावें. ज्या प्रकारचीं वस्त्रें आपल्याला शोभतील म्हणजे जीं वापरल्यापासुन लोक आपल्याला नांवें ठेवणार नाहींत अशींच वस्त्रें नेहमीं वापरावींत. खऱ्या कुलशीलाच्या व प्रपंचवाईक बायकांनीं नटणें-मुरडणें चांगलें नाहीं. एकदां ती संवय लागली म्हणजे त्यांचा सारा वेळ त्याखालींच जातो. त्याच्या हातून संसाराचीं, कष्टाचीं व जोखमीचीं कामें मुळींच होईनातशीं होतात; अशा नोकझोंकाखालीं रात्रंदिवस कालक्रमणा करणाऱ्या बायका संसाराच्या मुळींच उपयोगाच्या नाहींत. जिला गाई-म्हशीच्या गोठ्यापासून तों तहत पुढच्या दिवाणखान्यापर्यंत आपल्या प्रपंचाचीं कामें करावीं लागतात, तिला नटणें-मुरडणें स्वप्नांतही कधीं आठवावयाचें नाहीं. शिवाय बायकांचें रूप जात्याच मोहक असतें, म्हणून त्यांनीं आपल्या सौंदर्यांतच रात्रंदिवस मग्न असूं नये. नखऱ्यानें सौंदर्य मुळींच वाढत नसतें. उलटें तें लोकांच्या कुचेष्टेला मात्र पात्र होतें. उगाच येतां जातां घरंदाज बायकांनीं आरशांत आपलें रूप पहात बसूं नये, मोठ्यानें हांसूं नये, व भीडमर्यादा सोडून मोठ्यामोठ्यानें भाषण करूं नये. आपली दृष्टि आपल्या कुटुंबांतल्या माणसांकडे, आपल्या पोराबाळांकडे, आपल्या प्रियपतीकडे असं ढेणें हेंच त्यांना मोठें भूषणावह आहे.

सारांश, कुलवान् बायकांनीं आपल्या ठिकाणीं लज्जा, विनय, भीड व मर्यादा वगैरे गुण रात्रंदिवस अगदीं जागत ठेवावेत. पोकळ नोकझोंक

व नटणें-मुरडणें अगदीं उपयोगाचें नाहीं. साधेपणांतच त्यांनीं सद्रोदित सुख मानावें व त्यांतच त्यांचें कल्याण आहे. अनाथाविषयीं दया, गृह-कृत्याविषयीं दक्षता, स्वकुलाविषयीं अभिमान व घरांतल्या वडील-धाऱ्या माणसांविषयीं पूज्यबुद्धि व आपल्या पतीविषयीं खरें निष्कपट व निर्मल असें प्रेम वगैरे गोष्टी हींच खरीं त्यांचीं भूषणें व त्या योगानेंच त्यांच्या उभय कुलाला शोभा येते आणि हेंच शिक्षण स्त्रियांना मोठ्या हिताचें व प्रपंचांत वेळोवेळीं मदत करणारें आहे. शिक्षण शिकल्या आणि त्यांचे अंगीं जर स्त्रीजातीचे जे अवश्य गुण ते आले नाहींत, तर बागेंत चांगलें सुंदर फूल फुललेलें आहे, पण त्याला वास नाहीं, तर त्याचा जसा लोक तिरस्कार करितात, नव्हे तें जसें अगदीं कुचकामाचें, तशा आमच्या स्त्रिया शिकून व्यर्थ होणारें आहे. यासाठीं खऱ्या घरंदाज कुलीन बायकांना आपल्या घराण्याचें जर खरोखर शील राखावयाचें आहे, तर त्यांनीं अगदीं लहानपणापासून आपल्या आईबापांच्या चांगल्या चांगल्या गोष्टींचें अनुकरण करावें व तसेंच पुढें मोठेपणीं आपल्या मुलां-बाळांस, लेकीसुनांस वगैरे करावयास लावावें. यांतच त्यांचें खरें शिक्षण, खरें ज्ञान व खरें कुलशीलत्व दिसून येणारें आहे.

## १४

## मोहरम

आज ताबूत थंड होण्याचा दिवस असल्यामुळें मोहरमची माहिती दिली आहे. हा सण मुसलमानांचा आहे. मुसलमानांचा हिंदुस्थानशीं संबंध पूर्वीं राज्यकर्ते या नात्यानें व हल्लीं परकीयांच्या ताब्यांत गेलेली प्रजा या नात्यानें कमींत कमी सातशें वर्षें आहे. एवढ्या अवधींत हिंदुलोक त्यांच्यामध्यें इतके मिसळले आहेत कीं, मोहरम हा जरी मूळचा मुसलमानांचा सण आहे, तरी अलीकडे बरेच हिंदू लोक तो भक्तिपूर्वक पाळतात. या सणाची ऐतिहासिक पूर्वकथा ऐकण्यालायक आहे. ती येथें देतों.

मुसलमान धर्माचा मूळ प्रवर्तक महंमद हा आपल्या वयाच्या ६२ व्या वर्षीं इहलोक सोडून गेला. त्यापूर्वीं कांहीं काळ त्याची अतिप्रिय कन्या हजरत फातिमा बिबी ही आपल्या पित्याची मरणोन्मुख स्थिति पाहून अत्यंत शोकाकुल होत्साती भावी पितृवियोगदुःखानें सारखी तळमळूं लागली होती. कन्येची ही स्थिति पाहून महंमदानें तिला आपल्या बिछान्याजवळ बोलाविलें आणि या नश्वरदेहासाठीं दुःख करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हा मायापाश वृथा आहे, वगैरे समाधानाच्या गोष्टी तो तिला सांगूं लागला. तेव्हां कन्येनें उत्तर केलें—

**“ ह्याय पिदर चश्मे जदन्**
**सहवते आखिर सुद्र्**
**रुये गुलंना दिदम्**
**वहार आखिर सुद् ॥ ”**

कन्येच्या मुखांतून ही मनोहर कविता श्रवण करून महंमद म्हणाला— “ मुली, मृत्यु हा प्राण्यांचा सहचर आहे. जो जन्मास आला तो कधीं-

तरी जाणारच. आजपर्यंत मृत्यु कधींतरी कोणास चुकवितां आला आहे काय ? माझी आयुष्यमर्यादा संपली, आतां मी अल्लाचे घरीं जाणार. अल्ला तुला चिरायु करो. तुला बहुगुणशाली सुपुत्र होवोत आणि वाडवडिलांनीं घालून दिलेला सदाचरणाचा आणि मर्यादेचा किता तुझ्या हातून तुझ्या संततीला प्राप्त होवो, हा माझा तुला अखेरचा आशिर्वाद आहे." किंचित् काल थांबून तो पुन्हा म्हणाला, "प्रिय कन्ये, तुझ्या पोटीं दोन बहुगुण पुत्र जन्मास यावयाचे आहेत. ते या पृथ्वीतलावर अखंड कीर्ति करतील. यावच्चंद्रदिवाकरौ त्यांचे गुणानुवाद लोक प्रेमानें गातील. ते मुसलमानांत अत्यंत श्रेष्ठ, सन्मान्य आणि पूज्य अशा सैयद् या नांवानें प्रख्यात होतील. सैयद् या किताबापेक्षां अधिक सन्मानाचा आणि श्रद्धायुक्त किताबच मुसलमानी शास्त्रांत नाहीं. तेव्हां अर्थात् तुझे दोन पुत्र म्हणजे अप्रतिम रत्नेंच होतील असें समज." असें बोलून महंमदानें प्राण सोडला. कालक्रमानें महंमदाच्या म्हणण्याप्रमाणें फातिमेला दोन पुत्र झाले. ते हसन आणि हुसेन या नांवानें सर्वत्र प्रसिद्ध आहेत. हे पहिले सैयद्. अजूनही त्यांच्या वंशांत सयद् हा किताब चालू आहे. सैयदाच्या शरीरांतल्या धमनींतून खऱ्या महंमद् पैगंबराचें शुद्ध रक्त धांवत असतें असें भाविक मुसलमान अद्याप समजतात. सैयद् म्हणजे अत्यंत पवित्र, ईश्वराचे मर्जींतले, दैवी शक्ति धारण करणारे आणि अर्थात् अवध्य असा त्यांचा समज आहे. सैयदाच्या नुसत्या वस्त्रास स्पर्श केला तरी त्यामुळें सर्व पातकांचा नाश होतो अशी मुसलमानांची सैयदांचे ठायीं श्रद्धा आहे. असो. प्रस्तुत आपणांस हसन आणि हुसेन या पहिल्या दोन सैयदांच्या चरित्रांशीं कर्तव्य आहे. हे दोघेही बंधु शरीरप्रकृतीनें सुदृढ, शिक्षणामुळें विनीत आणि धैर्यशौर्यादि गुणांनीं युक्त असे होते. त्यांचा बाप म्हणजे महंमद् पैगंबराचा जांवई हजरत अली हा वृद्धावस्था प्राप्त होऊन मरण पावला. त्याच्यामागें अरबस्थानचें राज्य त्याच्या मुलांस मिळावयाचें, परंतु त्या मुलांच्या दुर्दैवानें फक्त एका प्रांताचें आधिपत्य हुसेन याच्या नांवें मिळालें. हसन हा आपल्या भावाजवळ राहिला. हळू हळू त्या दोघां भावांची सत्ता

इतकी वाढली कीं, अरबस्थानचा राजा त्यांच्या हातांतलें बाहुलें होऊन राहिला. हा त्यांचा उत्कर्ष कोरिष कुळांतील जेजद् नांवाच्या सधन आणि गर्विष्ठ अशा शेजारच्या एका संस्थानिकाला असह्य वाटूं लागला. त्यानें लागलीच एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यांत असें म्हटलें होतें कीं, " जो आम्हांस कर न देतां दुसऱ्या कोणास देईल, आम्ही सार्वभौम नृपति ही गोष्ट लक्षांत न आणितां भलत्याचा सन्मान करील, विशेषतः जो कोणी आमची धातुकाष्ठादि वस्तूची प्रतिमा ईश्वर न समजून तिच्याविषयीं आपली अश्रद्धा दाखवील तो कितीही बलवान् असला तरी त्याच्याशीं युद्ध करून त्याला योग्य दंड केल्याखेरीज आम्ही राहणार नाहीं. " हा जाहीरनामा प्रसिद्ध होतांच बारीकसारीक चटसारे संस्थानिक घाबरले, आणि ते जेजदापुढें नम्रभावानें जाऊन उभे राहिले. परंतु हसन–हुसेन बिलकुल डगमगले नाहींत; ते स्वतः जेजदाला शरण गेले नाहींत, किंवा नजरनजराणा पाठवून त्याला खुष ठेवण्यासाठीं त्यांनीं प्रयत्न केले नाहींत. त्यांच्या आजाचें म्हणजे महंमद् पैगंबराचें शिक्षण मातेच्याद्वारें त्यांना मिळालें होतें. या शिक्षणांत कित्येक गुण विशेष होते. त्यांचाच हा परिणाम. ते गुण म्हणजे निर्भीडपणा, साहस, एकेश्वरभाव, निर्लोभता व स्वधर्मपरायणता हे होत. हसनहुसेनाच्या जोडीला नरम करण्याकरितां रचलेला सगळा व्यूह व्यर्थ झाला असें जेव्हां जेजदास कळून आलें, तेव्हां त्यानें मधुर भाषेनें युक्त परंतु मनस्वी उर्मटपणाचें असें एक पत्र त्या उभयतां बंधूंस लिहिलें. त्यांत मजकूर कीं, " तुम्ही दोघे मुकाट्यानें येथें येऊन आमच्या चरणीं मस्तक ठेवाल तर आम्हांस फार संतोष होईल; आम्हीं तुमचे आजपर्यंतचे सगळे अपराध पोटांत घालूं; इतकेंच नाहीं तर तुम्हांस प्रिय दोस्त समजूं. " हें पत्र पाहतांच हुसेन क्रोधानं संतप्त झाला. त्यानें उत्तर पाठविलें त्यांत लिहिलें कीं " हजरत अल्ली आमचा पिता आणि महंमद् पैगंबर आमचा आजा. आम्ही एकेश्वरवादी आहों. तुमच्यासारख्या नीचहृदयी दुराचारी संस्थानिकांच्यापुढें हें मस्तक लवविण्यापेक्षां तरवारीनें हे कोणी छाटून टाकिलें तरी बेहेत्तर

आहे." काय हें पाणी, कोण ही तेजस्विता आणि किती हा निर्धार ! हा सगळा महंमदाच्या शिक्षेचा प्रभाव ! झालें. याप्रमाणें बोलाचाली झाली, तेव्हां आंतले आंत धुमसत असलेला द्वेषाग्नि एकदम पेट घेऊन उठला. दोन्ही पक्षांकडे युद्धाची तयारी कडेकोट झाली आणि योग्यकालीं लढाई सुरु झाली. हें युद्ध फार भयंकर झालें. रामरावणाचें व कौरवपांडवांचें युद्ध संस्कृत रामायण महाभारतादि ग्रंथांतून ज्याप्रमाणें प्रसिद्ध आहे, त्याचप्रमाणें हें युद्धही फार विख्यात आहे. या युद्धाची कथा साग्र लिहूं म्हटलें तर भारताएवढा ग्रंथ होईल. येवढें खास कीं, या युद्धांत हसनहुसेन या बंधुद्वयानें अतुल पराक्रम, निःसीम स्वदेशप्रेम, स्वजात्यभिमान, अकुतोभयत्व, स्वधर्मपरायणता, दृढप्रतिज्ञा, स्वातंत्र्यप्रियता, आत्मत्यागाविषयीं उत्सुकता, असाधारण रणकौशल्य आणि अपूर्व कष्टसहिष्णुता प्रकट केली. या युद्धाचा वृत्तांत ऐकून ज्याच्या अंगावर रोमांच उभे राहत नाहींत, ज्याचे बाहू स्फुरण पावत नाहींत, आणि रणांत समशेर गाजवून ज्या बंधुद्वयानें आपल्या कुलाची कीर्ति इतिहासांत अजरामर करून ठेविली त्यांच्याविषयीं पूज्य-भाव ज्याच्या अंतःकरणांत जागृत होत नाहीं असा खऱ्या हाडाचा मुस-लमान क्वचितच आढळेल ! कार्बाला येथील अत्यंत विस्तृत रणभूमीवर हुसेन पराभूत होऊन पडला आणि हसन याला जेजद् याच्या लोकांनीं पकडून विष घालून मारलें. या दोन वीरांच्या गुणांचें स्मारक करण्या-करतां मूळ मोहरम हा सण उत्पन्न झाला. मोहरम या शब्दाचा अर्थच शोकप्रदर्शन आणि मृत महात्म्याच्या आत्म्यार्प्रीत्यर्थ प्रार्थना असा आहे. दरसाल एक आठवडाभर हसनहुसेन यांच्या मृत्यूबद्दल शोक आणि त्यांच्या आत्म्याबद्दल प्रार्थना करावी असा मुसलमानांचा फार प्राचीन संप्रदाय आहे. वर सांगितलेलें महायुद्ध चाललें असतां दहाव्या दिवशीं हसन याचें सैन्य तृषेनें व्याकुळ झालें, परंतु त्यांस पाण्याचा थेंबहीं न मिळाल्यामुळें तें बिचारें 'पाणी पाणी' करून मेलें. या गोष्टीच्या स्मर-णार्थ मोहरमच्या दहावे दिवशीं मुसलमान लोक तृषार्तांला पाणी पाजून संतुष्ट करतात. हा सण वीर पुरुषांच्या स्मरणार्थ असल्यामुळें नाना

तऱ्हेचे दांडगाईचे आणि वीरत्वसूचक खेळ या दिवसांत खेळतात आणि हसनहुसेन हे दोघे बंधु प्रत्यक्ष महंमद पैगंबराचे नातु आणि त्यांनीं स्वधर्मरक्षण व स्वजात्याभिमान यासाठीं धारातीर्थी देह ठेविले, यामुळें या सणास धार्मिक स्वरूप प्राप्त झालें. मोहरमची ही उत्पत्ति लक्षांत ठेवून तदनुसार मुसलमान बंधु या सणांत वर्तन ठेवतील तर कांहीं वाईट नाहीं.

१५

## सेव्य व सेवक

हा सेव्यसेवकभावसंबंध मनुष्यांनींच आपल्या सोयीसाठीं व सुखासाठीं अस्तित्वांत आणलेला आहे. परंतु त्यांनीं त्याला एका प्रकारच्या जुलमी सत्तेचें रूप दिलेलें दृष्टीस पडतें, याबद्दल थोडा खेद व आश्चर्य वाटतें. जे ज्ञानानें, संपत्तीनें व मानमान्यतेनें मोठे असतात तेच लोक चाकर ठेवितात. त्यांत विशेषेंकरून जे संपत्तीनें मोठे असतात, त्यांचीच सेवकवर्गाकडून कामें करून घेण्याची प्रवृत्ति फार असते. चाकरमाणसें ठेवण्याला विद्वत्तेची व ज्ञानाची जरूरी फारशी लागत नाहीं. वास्तविक पाहूं गेलें तर हा मनुष्यांचा श्रमविभाग होय. सगळींच कामें एका मनुष्याच्या हातून होणें अगदींच अशक्य, म्हणून तीं कामें वेळच्या वेळीं व चांगलीं व्हावीं म्हणून दुसरीं माणसें मदतीला घेऊन तीं हातीं घेतलेलीं कामें पार पाडायचीं आणि जे दुसऱ्याकडून त्या कामीं श्रम घ्यायचे, त्याबद्दल त्याला पैशाच्या रूपानें मोबदला द्यावयाचा. मग तो एकादा बिगारी असो, कीं मोठा थोरला मोठ्या पगाराचा अंमलदार असो ! केलेल्या श्रमाचा मोबदला दोघांसही कामाच्या मगदुराप्रमाणें कमजास्त प्रमाणानें मिळतो. राजापासून रंकापर्यंत सर्व लोक या सेव्यसेवकपाशीं बद्ध झालेले आहेत. ते कोणीं केले असें मुळींच नाहीं. परंतु स्वाभाविकपणेंच समाजांत हा संबंध उत्पन्न झाला. त्याखेरीज समाजाचीं, राष्ट्राचीं व कुटुंबांचीं कामें मनुष्याच्या हातून कधींही पार पडायचीं नाहींत, हें अगदीं उघड आहे. सेव्य मनुष्यांनीं आपल्या सुखासाठीं माणसेंच सेवापाशीं जखडून टाकिलीं आहेत असें नाहीं. रानावनांत स्वैर विहार करणारीं जनावरें व पक्षी यांना देखील आपल्या ताब्यांत ठेवून ते त्यांच्याकडून कामें करून घेत आहेत. पण पर्यायानें तीं सेव्य मनुष्येंही त्या सेवकांचे बंदे चाकर आहेत.

उदाहरणार्थ, एका मनुष्यानें एक घोडा आपल्यास बसण्यासाठीं पाळला तर ज्याप्रमाणें तो घोडा आपल्या धन्याला आपल्या पाठीवर घेऊन त्याच्या उद्दिष्ट स्थानीं नेऊन पोंहचवितो, त्याप्रमाणें त्या स्थळीं गेल्यावर त्याच्या पाठीवरचें खोगीर काढणें, त्याच्या आंगाचा घाम पुसणें, त्याला खरारा करणें, त्याला गवतपाणी देणें, हीं सर्व कामें त्याच्या पाठीवर बसणाऱ्या मनुष्यानें एकाद्या बंद्या चाकराप्रमाणें त्याच्यापुढें वांकून केलीं पाहिजेत हें निर्विवाद आहे. तेव्हां मी स्वामी, मी धनी, मी मालक असें कोणीही म्हणूं नये. राजाही प्रजेचा चाकर आहे व प्रजाजनही राजाचे पर्यायानें मालक आहेत. परस्परांनीं एकमेकांचीं कामें हीं केलींच पाहिजेत. श्रमाचा मोबदला देणाऱ्या माणसानें सर्वस्वीं स्वामीचा अधिकार आपल्याकडे घेऊन श्रम करणाऱ्यांना पायांखालीं तुडवावें हें अगदीं अनुचित आहे. राजा जो प्रजेच्या स्वकष्टार्जित मिळविलेल्या द्रव्यांतून कांहीं करभाररूपानें पैसा घेतो, तो त्याच्या श्रमाचा मोबदला नव्हे काय? स्थानिक स्वराज्याचे संपूर्ण अधिकारी हे प्रजेचे बंदे चाकर नव्हेत काय? म्हणजे प्रजाजन त्यांचे धनी झाले ना? बरें, ते प्रजाजनांला कर वेळच्यावेळीं देण्याविषयीं सक्तीचे हुकूम सोडतात, मनास वाटेल तेव्हां वाटेल तितके कर चढवितात, यावरून त्यांच्या हातीं स्वामिसत्ता आहे असें वाटतें ना? या सर्वांवरून सिद्ध इतकेंच होतें कीं, जे आपल्याला मालक, धनी, यजमान समजतात, त्यांना देखील सेवाधर्माचें आचरण करावें लागतें, आणि जे त्यांच्या दृष्टीनें त्यांच्या हुकमांतले म्हणून वाटतात तेही धन्याचे अधिकार चालवूं शकतात. सारांश, जे लोक आज दुसऱ्याचीं कामें करून द्रव्यार्जन करितात, ते त्यांचे बंदे गुलाम नसून त्यांच्या कार्यश्रमविभाग्यांपैकीं विभागी होत. यासाठीं, ज्यांच्या हाताखालीं ईश्वरकृपेनें अशीं कामें करणारीं माणसें असतात, त्यांना क्रूरतेनें व निष्ठुरपणानें मुळींच न वागवितां त्यांना प्रेमानें वागवावें यांतच त्यांना मोठें भूषण आहे.

## १६

## अमृतमणि ?

जगाकडे बारकाईनें पाहूं लागलें म्हणजे तें किती तऱ्हेनें मिश्र झालें आहे याचा लागावा तसा पत्ताच कोठें लागत नाहीं! ज्याला आपण अमृत म्हणतों त्यांतच विषसंचार आहे, असें अनुमान होतें. तेव्हां विषांतच अमृत निघतें आणि केव्हां केव्हां अमृत आणि विष यांच्या मिश्रणानें तिसराच प्रकार निष्पन्न होतो. सारांश, परमसमर्थ परमेश्वराची लीला आम्हां मानवांस अगम्य आहे! आम्ही तिचा जितका विचार करावा तितकी आमची बुद्धिमत्ता थक्क होत जाते, आणि कित्येक वेळ असेंही वाटतें कीं, देवानें मनुष्यमात्रास सौख्य व्हावें एतदर्थच सर्व वस्तु निर्माण केल्या आहेत. परंतु मनुष्यानें त्यांचा यथायोग्य उपयोग करून घेतला पाहिजे. प्रत्येक वस्तूचे गुणधर्म शोधिले पाहिजेत आणि तिच्या मिश्रणानें काय काय प्रकार घडतात त्याचा सिद्धांत ठरवून त्याप्रमाणें वर्तन ठेविलें पाहिजे. तरच त्याला सौख्य मिळेल, नाहीं तर विपत्तिग्रस्त व्हावें लागेल.

आपण विषांतच अमृत आहे असें म्हटलें, परंतु असें वाक्य वाचतांच कोणी चटकन् म्हणेल कीं, 'काय चमत्कार आहे? अहो! अमृत तें कोठेंही गेलें तरी अमृत, आणि विष तें विषच!' परंतु सर्वत्रच असा प्रकार दृष्टोत्पत्तीस येतो असें नाहीं. उदाहरणार्थ, सर्पच घ्या. आपल्या महाराष्ट्रांत सर्पाला काळासमान मानितात. रात्रींच्या वेळीं त्याचें नांव देखील कोणी घेत नाहींत. आणि या प्रांतांतील सर्पांची कर्मे परम भयंकर असतात हेंही खोटें नव्हे. महाराष्ट्रप्रांतच विषमिश्रित. मग त्यांतील जीवजंतू तरी सौम्य कसे निपजावे! कारण आपल्या महाराष्ट्रांत जितक्या विषारी प्राण्यांच्या जाती आहेत, तितक्या दुसऱ्या कोणत्याही देशांत

नसतील ! फुरशीं, मण्यारी, कांडर, घोणस, नाग, एक कीं दोन ? छीः ! त्यांचे आणखी पोटभेद पाहूं लागलें तर हजारांच्या जवळ जवळ संख्या जाईल ! दयाळू सरकारानें जरी सर्पसत्र सुरू ठेविलें आहे, प्रत्यहीं त्यांचा संहार होतो आहे, तरी त्या दुष्ट प्राण्यांच्या वृद्धींत कमतरता म्हणून बिलकुल नाहीं. आणि तेंही खरेंच. सर्पसत्रांत शेंकडों प्राण्यांचा संहार होतो. पण प्रत्येक प्राणी जर शेंकडों प्राण वितो, तर सत्रानें सत्रा हजार वेळां हात टेंकले म्हणुन त्यांत आश्चर्य कसलें ? असो. वरील प्रकार कसाही असला, तरी मुंबई इलाख्यांत जशा प्रखरतर विषारी प्राण्यांच्या अनेक जाती आहेत, तशा इतर कोणत्याही इलाख्यांत नसतील. गुजराथ प्रांतांत सर्प आहेत, परंतु ते सौम्य असतात. बंगाल इलाख्याचीही स्थिति अशीच. तेथील सर्प इतके अजस्र असतात कीं, कित्येक सर्पांस धरावयास तीन तरी भक्कम जवान गडी पाहिजेतच. असें जरी आहे तरी त्यांचा विषप्रभाव कमीच. मद्रासचाही बंगाल इलाख्याप्रमाणेंच प्रकार. मग परमसमर्थ जगदीशानें आमच्याच डोक्यावर कसा काय वरदहस्त ठेविला असेल कोण जाणे ? इकडील लोक जसे वीर्यवान् तसेच इकडील जीवही फार जाज्वल्य. कोणालाच नांव ठेवण्यासारखें नाहीं. एकापेक्षां दुसरा तेजस्वी. जणूं काय चढाओढच लागली आहे. जो पहावा तो एकापुढें एक छाती ठोकून तयार. नाहीं तर बेटें फुरसें तें काय ? फार तर वीत नाहीं तर दीड वीत लांब. पण प्रभाव कोण जबरदस्त ! !

असो. आज हे विचार सुचण्यास इतकेंच कारण झालें कीं, परमेश्वरानें ज्या ज्या वस्तुपासून अपाय होण्याचें साधन ठेविलें आहे; त्यांतच त्याच्या निरसनाचाही बहुतेक अंश ठेविला असावा असें दिसतें. कोंकण प्रांतांत तूर्त काजूच्या झाडांना बहर आला आहे. त्याचाच विचार करूं. काजूच्या ओल्या बिया सोलल्या तर हातास एक प्रकारचे डाग पडतात. ते डाग काजूच्या पाल्यानें किंवा काजूनें जातात. काजू खाल्ले तर एक प्रकारचा रांप घशांत बसतो. तो घालविण्यास काजूच्या भाजलेल्या चार बियांतील गर खाल्ले कीं, तावडतोब रांप सफाई नाहींसा होतो. असाच विषारी प्राण्याचाही प्रकार असावा असें दिसतें. उदाहरणार्थ, सर्प घ्या.

सर्पाचें विष किती जालीम असतें हें कोणालाही सांगावयास नको. पण त्याच्या विषाचा प्रतिकार करणारें औषध त्याजपाशींच असतें. बहुतेक सर्पांच्या डोक्यांत एक दगड असतो. त्याला अमृतमणि अथवा मोहरा असें म्हणतात. तोच सर्पविषावर दिव्य औषध आहे असें सांगतात. तो कसा मिळवावा याविषयीं मिळालेली माहिती थोडक्यांत सांगतों. बहुधा जुनाट सर्पाच्या विषारी दांताचे वरच्या अंगास तालूंत अमृतमणि असतो. तो काळा, भुरा, पिंगट किंवा पिंवळट रंगाचा असतो, अथवा त्याचे रंगाबद्दल नियमच नसतो असें म्हटलें तरी चालेला – तो कोणत्याही एकाद्या प्रकारच्या रंगाचा असतो. तो काढायचा म्हणजे काळाच्या दाढेंतील अमृतच काढायचें. सर्प मारल्यावर एकादे वेळीं तत्काळ जर त्याचें डोकें चिरलें तर तो मणि सांपडतो, पण त्यांत असावा तसा गुण नसतो असें ऐकिलें आहे. एतदर्थ एकादा जुनाट सर्प आपल्यास दंश करणार नाहीं अशा युक्तीनें धरावा. त्याचे जाभाडास दोन फांस घालून एकानें खालीं व वर ओढून ते फांस धरावे. दुसऱ्यानें त्या सर्पाच्या शेपटावर व मध्यभागीं दोन पाय ठेवावे, म्हणजे त्या सर्पास फारशी चळवळ करतां येणार नाहीं आणि तो जिवंत आहे तोंपर्यंत प्रथमतः सांगितल्याप्रमाणें जेथें खडा–अमृतमणि असेल तेथें नस्तरानें किंवा दुसऱ्या प्रकारच्या एकाद्या शस्त्रानें चिरावें, म्हणजे अमृतमणि मिळतो, तो काढून घेऊन त्या सर्पाची मग मनास वाटेल ती दशा करावी. मिळालेला मणि खराच अमृतमणि आहे किंवा नाहीं हें पहावयाचें असेल तर अफूचे पाण्यानें–कुसंब्यानें–मेलेली माशी दहा मिनिटें त्या मण्यावर ठेवावी म्हणजे ती जिवंत होते. माशी जिवंत झाली तर तो अमृतमणि चांगल्या प्रकारचा असें समजावें; नंतर जेव्हां केव्हां कोणालाही सर्पदंश होईल तेव्हां तो मणि दंश झालेल्या जागेवर तत्काळ लावावा म्हणजे तेथें तो चिकटून राहून सर्व विषशोषण करून घेतो आणि खालीं पडतो. नंतर तो दुधांत टाकावा. म्हणजे तें दूध विषयुक्त होतें. खड्यांत असलेलें सर्पविष दुधांत शोषण होतें. तें दूध खड्ड्यांत गाडून टाकावें. जर कोणाच्या प्राशनांत येईल अथवा रक्ताशीं सन्निविष्ट होईल तर सर्पविषापासून जो

परिणाम होतो तोच परिणाम होईल. तर तो मणि कोणालाही सर्पदंश झाला असतां वर सांगितल्याप्रमाणें कृति केली म्हणजे उपयोगी पडेल.

बहुतेक माशांच्या डोक्यांत अशा प्रकारचे मणि असतात. किती एकांच्या एक, दोन, तीन देखील असतात. बेडकाच्या डोक्यांतही असे मणि असतात. बेडकाच्या डोक्यांतील मणि प्रसूत होतांना अडलेल्या स्त्रीच्या पोटावर बांधला तर ती तत्काळ प्रसूत होते असें सांगतात.

सर्पाच्या डोक्यांतील मणि मुंबईस एका पारशाकडे आहे. त्यानें तो बडोदें व कोल्हापूर येथील महाराजांकडे विकावयास नेला होता, असें वर्तमानपत्रांत वाचिलें होतें. पुढें त्याचें काय झालें व त्याचे अंगीं काय गुणधर्म होते याची माहिती कळली नाहीं.

सर्पाच्या डोक्यांतील मणि काढणें किती जोखमीचें आहे याचा विचार केला, म्हणजे गारुडी लोक सर्पाच्या डोक्यांतील मणि म्हणून जे खडे चार दोन पैसे किंवा आणे घेऊन विकतात, त्याचें किती महत्त्व मानावयाचें, हें सहज लक्षांत येईल. गारुडी लोक जे विकतात ते शुद्ध गाळेचे खडे असतात. ते घेऊन कोणीही फसूं नये.

## १७

## तरुणांस उपदेश

तरुणपण हा अंगची कर्तबगारी दाखविण्याचा योग्य काल आहे. पुरुषांनीं तरुणपणांत मोठमोठीं अचाट कृत्यें करून नीतीनें व सद्धर्मानें द्रव्यार्जन करावें, व आपला नांवलौकिक वाढवावा. आपल्या पुढील पिढीसाठीं कांहीं तरी चांगल्या चांगल्या गोष्टींचा संग्रह करून ठेवावा. आपल्या संसारांत सुखाभिवृद्धि करावी. कुटुंबांतील लहान माणसांचें ज्ञान वाढवून व त्यांचें उत्तमप्रकारें पोषण करून त्यांना प्रपंचरथ ओढण्यास तयार करावें. प्रत्येक स्त्रीपुरुषाला बालपण व म्हातारपण या दोन स्थितींपेक्षां तारुण्यांत फारच काळजीनें व जपून वागलें पाहिजे. समुद्रावर तुफान आलें असतां जहाज पैलतीराला नेणें जसें मोठ्या धोक्याचें असतें, त्याप्रमाणें तारुण्यांत आलेल्या स्त्रीच्या किंवा पुरुषाच्या अंतःकरणांत अविचार, अनीति वगैरे नीच मनोविकारांचें भयंकर वावटळ सुटलें असतां त्या स्त्रीच्या हातून किंवा त्या पुरुषाच्या हातून जीवितनौका कधींही धडपणें पार जात नाहीं.

लहानपणीं संपादन केलेल्या चांगल्या शिक्षणाचा व ज्ञानाचा आणि राखून ठेवलेल्या शक्तीचा उपयोग खरा म्हटला म्हणजे यौवनावस्थेंत आल्यावरच करणें अत्यंत जरुर आहे; परंतु कित्येक असें समजत नाहींत. वाईट आचरणानें ते आपला आयुष्याचा कितीतरी तोटा करून घेतात व त्यांच्या या दुराचारी व स्वछंदी वर्तनानें त्यांच्या पुढील संततीचें ते किती तरी नुकसान करण्यास कारणीभूत होतात, या गोष्टींचा त्यांनीं आपल्या मनांत कधीं तरी विचार केला आहे काय ? असे लोक जन्माला आले काय आणि न आले काय सारखेच. त्यांना तारुण्य येवो कीं महातारुण्य येवो, त्यांच्या हातून त्यांच्या कुटुंबाचीं,

त्यांच्या समाजाचीं व त्यांच्या राष्ट्राचीं कांहीं कामें होतील अशी आशा सुद्धां बाळगायला नको. श्रीमंत आहेत, ते केवळ सुखांत बसतात; दुसरें कांहीं करीत नाहींत; जे मध्यम स्थितींतले लोक आहेत ते फार करून कशाचीही काळजी घेत नाहींत; पोटाची व्यवस्था योग्यपणें लागलीं म्हणजे झालें व जे गरीब आहेत म्हणजे ज्यांना नुसतें पोट भरण्याला सगळा दिवस दुसऱ्याची कुत्तेघाशी करावी लागते, त्यांना अशीं वरच्या-सारखीं परोपकाराचीं कामें करण्याला त्यांच्या सगळ्या आयुष्यांत एक क्षण देखील सांपडत नाहीं. परंतु प्रत्येकानें आपल्या आयुष्यांतील हा जो अत्यंत अमोलिक तारुण्याचा काळ आहे, तो कांहीं तरी चांगल्या रीतीनें जाईल आणि आपल्यामागें आपली कीर्ति राहील असाच दृढ हेतु मनांत रात्रंदिवस धरून त्यानें जगाच्या रंगभूमीवर पाऊल टाकावें हें चांगलें. हीच गोष्ट स्त्रियांनींही मनांत धरण्याजोगी आहे. तरुणपणीं प्रपंचरथ मोठ्या दक्षतेनें व आनंदानें हांकून आपल्या मुलांबाळांसाठीं, आपल्या पतीसाठीं व आपल्या वडील, सन्मान्य अशा माणसांसाठीं संसारांत रात्रंदिवस खपून आपल्या बुद्धिवैभवाचा व शरीरसंपत्तीचा चांगला उपयोग करून दाखवावा हेंच त्यांच्या तारुण्याचें व सौंदर्याचें खरें भूषण आहे. ज्या स्त्रीपुरुषांना प्रपंच म्हणून करायचा आहे त्यांनीं कधीं आळशी व उदासीन असें राहतां कामा नये. नेहमीं उद्योगांत आपलें आयुष्य घालवावें. घरांत बेताबातानें खर्च करून प्राप्तीपैकीं कांहीं द्रव्य शिल्लक ठेवावें. निर्व्यसनी असावें. कधीं कोणाचें कर्ज करूं नये. सदा-सर्वदा सुप्रसन्न चित्तानें घरांत वागावें. मुलांबाळांच्या शिक्षणाकडे अवश्य लक्ष द्यावें व आपल्या म्हातारपणीं आपल्याला सुखानें भाकरी खातां येईल अशी तरुणपणांतच व्यवस्था करून ठेवावी. कारण दिवस आहे तोंच आपली घराची मजल गांठणें हें बरें. सूर्यास्त झाला म्हणजे पस्ता-व्यांत पडण्याची वेळ येईल. तारुण्य हा दिवस व म्हातारपण हा सूर्या-स्ताचा समय आहे.

१८

## सृष्टीचा प्रभाव

ही सृष्टि मनुष्याच्या वस्तीस लायक आहे. तिची ती लायकी तिच्या ठायीं कोणीं तरी मुद्दाम निर्माण केली असावी असें दिसतें. कारण मनुष्याच्या उत्पत्तीबरोबर त्यास लागणाऱ्या धान्याच्या कोठ्या, द्राक्षांचे मळे व भव्य आनंदभवनें हीं करण्याचीं साधनें तींत ठेविलीं आहेत. कांहीं ठिकाणीं ती सृष्टि अन्नपूर्णेसारखी उदारही दिसते व दुसऱ्या ठिकाणीं ती अक्काबाईसारखी अनुदारही दिसते. कांहीं ठिकाणीं ती सौंदर्यशाली दिसते व दुसऱ्या ठिकाणीं ती प्राकृतिक-सौख्य-संपन्न दिसते. एका ठिकाणीं ती अमोल ठेव जमिनींत खोल लपवून ठेवते व दुसऱ्या ठिकाणीं ती जमिनीच्या पृष्ठभागाजवळ आणून ठेविते. कांहीं ठिकाणीं ती आसपासच्या लोकांस व्यापार – व्यवहार करण्यास निमंत्रण करिते; पण दुसऱ्या ठिकाणी ती निरनिराळया लोकांच्या आड दुर्गम दुर्ग बांधून ठेविते. कांहीं ठिकाणी ती रहिवाशांस स्वस्थपणें व निरामयपणें कामधंदे करण्यास लालचावते, पण दुसऱ्या ठिकाणीं पहावें तों ती आपल्या भयप्रद व अवर्णनीय शक्तीचा प्रभाव दाखवून तेथील रहिवाशांस गर्भगळित करिते. तसेंच मनुष्याच्या प्रत्यक्ष उपयोगाकरितां कांहीं प्रदेश केलेले नाहींत असें प्रथम वाटतें, पण त्या प्रदेशांतील रखरखीत वाळूचीं मैदानें, निर्जन व पाषाणमय पर्वत व दुर्ज्ञेय, दुर्गम व हिमवलयांकित ध्रुवप्रदेश हेही मनुष्याच्या गरजा भागविण्याकरितां उत्पन्न केले आहेत असें दिसतें. कारण त्यांचे मनावर जे ठसे उठतात, त्यांनीं मनुष्याची कल्पनाशक्ति उत्पन्न होते व सौंदर्याचें ज्ञान वृद्धिंगत होतें; आणि ते पदार्थ त्याच क्षणीं त्याच्या सर्व गर्वाचा परिहार करून दुनियेंत सहज व तात्कालिक बोध होण्यासारखें जें जें आहे, त्याच्या पलीकडे अव्यक्त वस्तु कांहीं तरी

खचित आहे असें भासवितात. ते दुनियेचा विस्तार, अपव्यय व दुर्बोधपणा ह्यांचें थोडक्यांत ज्ञान करून देतात.

आणि असल्या गोष्टींचा विचार केला असतां सृष्टीच्या ज्या परिस्थितींत मनुष्य निर्माण होतो, त्या परिस्थितीच्या योगानें त्याच्या संबयी, त्याची राहणी, त्याची संगत, फार तर काय, पण निरनिराळ्या जातींचा इतिहास व आचारविचार कसे बदलतात हें आपणांस समजतें. नीलवर्ण आकाशांतील चटकचांदणीप्रमाणें त्या नीलवर्ण हिंदी महासागरांत चमकणाऱ्या आपल्या सुंदर द्वीपकल्पाचें चित्र मनापुढें कल्पावें, आणि पृथ्वीचा गोल घेऊन आपलें हें भरतखंड पृथ्वीच्या मध्यभागीं जसें आहे तसें तें त्या गोलावर पुढें मध्यभागीं आणवावें तें एशिया खंडाच्या मध्यभागीं सोइस्कर स्थलीं कसें ठेवण्यांत आलें आहे व तें एशिया खंडाच्या इतर भागाला जोडून आहे, तरी समुद्र व पर्वत यांच्या वेढ्यांनीं अलग राखून त्यांतील लोकांस परवांपर्यंत कसें स्वतंत्र ठेवण्यांत आलें, याचा विचार करावा, म्हणजे त्याचा विस्तीर्ण समुद्र-किनारा, त्यांचीं सुंदर बंदरें, त्याची सुपीक जमीन, बारा महिने बत्तीस काळ बिनहरकत काम करितां येण्यासारखी सुखकर समशीतोष्ण हवा, आमचें विद्या-ज्ञानकलांचें वैभव यांचा, आमचे लोकांचा स्वभाव, व त्यांचा आचारविचार व त्यांचा इतिहास ह्यांशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं असें कोणीही म्हणणार नाहीं. दुसरें अरबस्थानचें उदाहरण घेऊं. हा देश सखल, सपाट, रखरखीत वाळूचा आहे म्हणून येथें शेती फार होत नाहीं व जमीन गुरेंचारणीच्या उपयोगाची आहे म्हणून साहसी अरब लोक शेळ्या, मेंढ्या, गाढवें, घोडे व उंट चारीत, वाळवंटांतील खारका खजूर खात, उडाणटप्पु उचल्या भामट्यांच्या टोळ्यांसारखे जागोजाग फिरणारे आहेत. त्यांतील महंमद पैगंबर व त्याचे इमाम दांडगे अनुयायी यांनीं एका हातांत समशेर व एका हातांत कुराण घेऊन स्पेन-पोर्तुगालपासून इराणपर्यंत प्रदेश कसा हैराण केला व इराणपासून हिंदुस्थानपर्यंत मुलूख कसा मैदान केला हें सगळ्यांस ठाऊकच आहे. पण तेथील सृष्टीचा देखावा सुंदर किंवा मनोहर नाहीं म्हणून तेथील लोकांत कल्पनासृष्टीचे

भोक्ते जे कवी व विद्यादेवतेचे भक्त जे विद्वान् ग्रंथकार हे फारसे प्रसिद्ध झाले नाहींत. तेथील मूळ लोकांची प्रसिद्धि बुद्धिमत्तेपेक्षां रानदांडगेपणाबद्दल व आडमुठेपणाबद्दलच जास्त आहे. फार तर काय, पण त्यांच्यांतील अत्यंत बुद्धिमान् जो महंमद पैगंबर ह्याच्या चरित्राचें अवलोकन केलें, तर विद्वान् लोक दुनियेस गोडीगुलाबीनें वश करितात, त्याप्रमाणें दुसऱ्यांच्या पोटांत शिरून व त्यांच्या हातावर 'पेढा' देऊन त्याला दुनिया वश करितां आली नाहीं व त्यानें जे काय पराक्रम केले आहेत त्यांत त्यानें इतरांवर जुलूमजबरदस्ती करून व हातीं सांपडला त्याची 'मिशेरशी' गांठ घालून दुनिया दीन व जर्जर केली आहे. आतां अरब लोकांच्या नांवावर रसायनशास्त्राचे मूळ शोध आहेत; पण ते त्यांना अरबस्थान सोडण्यापूर्वी करितां आलें नाहींत व त्यांच्या नांवावर चांगल्या कामाच्या उभारणीपेक्षां नाशाचीं कामें जास्त आहेत हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

गंगा, यमुना, सिंधु, नेल, युफ्राटिश व पिंपळी ह्या नांवांच्या दुथडच्यांवरील मळईच्या मातीचीं विस्तीर्ण मैदानें पहा. त्या मैदानांतील जमीन अत्यंत सुपीक आहे, तेथील लोकांच्या गरजा बेताबाताच्याच आहेत, व त्यांचा काबाडकष्ट करण्याकडे ओढा फारसा नाहीं. तेथें लोकांची वस्ती मोठी दांडगी आहे, ते शेतकाम करून राहतात व ते सदा बैठे व पडू म्हणजे बसल्या जागीं व स्थितींत नेहमीं पडून राहाणारे, नव्या आचारविचारांचा वीट मानणारे व सहज जिंकून सदा जित राखितां येण्याजोगे आहेत, आणि म्हणून या ठिकाणींच सुलतानी थाटाचे पिढीजात नबाब बादशाह अनेक होऊन गेले हें वरील वस्तुस्थितीस अनुरूपच झालें. आतां प्राचीन फिनीशिया ( वणिग्देश = वाण्यांचा देश ) ग्रीस ( यवनांचा देश ) व इटाली ह्यांसारख्या दर्याकांठीं वसलेल्या लहान संस्थानांकडे पहा. त्या संस्थानासंस्थानांमध्यें लहानसहान टेकाडांचा आडपडदा होता, त्यांत लोकसमाजाची वस्ती थोडी होती, ते तुटक असत, तरी ते आपल्या स्वतंत्रतेकरितां नेहमीं झगडणारे होते, म्हणून त्यांच्यांत परस्पर मत्सरबुद्धि वसत असे आणि म्हणून ते आपलें

नांव गाजविणारे होऊन गेले व आपसांतील घरफोडीच्या लढाया व स्वतंत्रतेकरितां मर्दपणाचीं युद्धें यांच्या वर्णनांनीं त्यांचे इतिहास भरले आहेत. अशा वेळीं प्राचीन रोमन, इस्ट्रस्कन व ग्रीक प्रजासत्ताक राज्यांतील स्वतंत्र, शौर्यशाली लोकांची रहाणी व तेथील सृष्टिजन्य परिस्थिति ह्यांच्यामधील संबंधाची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं.

अथवा इजिप्शियन, असीरियन, व चिनी बादशाहींतील लोकांच्या स्थितीची, स्वतंत्र तार्तरींतील माळजमिनीवर राहाणाऱ्या लोकांच्या स्थितीशीं तुलना करा. त्या माळजमिनीवर झाडझाडोरा फारसा नाहीं, म्हणून तेथें कायमची वस्ती करून राहण्याची मुळींच सोय नाहीं, व तेथें उडाणटप्पु, चंचल, जंगली, संशयखोर व लढवय्ये जातीचे लोक वास करितात. याप्रमाणेंच कांहीं देशांतील लोकांवर हवेचा परिणाम पाहण्यासारखा होतो. कांहीं देशांत ती हवा मेहनत करणाऱ्या लोकांस कमजोर करिते व कांहीं देशांत ती त्यांस उत्तेजित करून त्यांचे उत्तम गुण प्रकाशित करिते, कांहीं स्थळीं सृष्टीच्या बाह्य स्वरूपानें राष्ट्राचें वळण कसें बदलतें हें पाहण्यासारखें असतें. समशीतोष्ण कटिबंधांतील प्रदेशांत सृष्टीचें स्वरूप सदा सारखें व समान असतें. तेथील लोक अनेक वेळां निश्चयी, स्वावलंबी, स्वाभिमानी व करारी असे आढळतात. पण कांहीं प्रदेशांत वारंवार धरणीकंप व उत्पात होतात व तेथें सृष्टीचें स्वरूप अकाळविकाळ भयप्रद असतें. तेथील लोक भ्याड, धर्मभोळे, नेभळे व रडतोंडे असतात व त्यांस नवीन शोध व युक्त्या काढण्याची हुरूप नसते.

ह्यावरून सृष्टीच्या नियमांचा लोकसमाजाच्या व्यवस्थेवर आणि व्यक्तिमात्राच्या आचारविचारांवर कसा परिणाम होतो ह्याचें थोडेंबहुत तरी ज्ञान झाल्यावांचून रहावयाचें नाहीं. पण ह्यापेक्षां सविस्तर माहिती पाहिजे असेल त्यानें 'बकल'चा इतिहास पहावा. त्यांतील कांहीं तत्त्वें सर्वजनमान्य नाहींत, तरी त्यांत अनेक अमोलिक तत्त्वें व सूचना आहेत. तीं प्रत्येकानें पाहिलीं पाहिजेत हें सुज्ञ व मर्मज्ञांस वारंवार सांगणें नलगे.

१९

## सुंदर पुस्तकें

दुसऱ्या अनेक गोष्टींमध्यें किती तरी बदल होत चालले आहेत, परंतु जीं प्राचीन पुस्तकें सुंदर उपदेशांनीं व मनोवेधक कथांनीं अगदीं भरलीं आहेत, तीं जशींच्या तशींच आनंददायक राहिलीं आहेत. या आपल्या रोजच्या उपद्व्यापांचा गंध त्यांना बिलकुल लागत नाहीं. ज्या मैदानांत अगर शेतांत, वाडग्यांत, बागांत आपण लहानपणीं खेळलों, बागडलों, त्यांच्या जागीं आज मोठमोठाले रस्ते झाल्याचीं अगर तीं सर्व अगदीं ओसाड पडल्याचीं उदाहरणें आपल्यास दिसतील. ज्या घरांत आपण बाळपण घालविलें, तीं पार नाहींशीं होऊन त्यांच्या जागीं दुसरींच नवीं घरें उठलेलीं दिसतात. तीं देवळें गेलीं. तीं त्या काळचीं म्हातारीं माणसें गेलीं; आपण ज्यांच्याशीं खेळलों, संवरलों, तीं मुलें आतां मोठालीं झालीं, त्या वेळच्या मुली आतां आया, आज्या झाल्या. आपली तरतरी कमी झाली. आपण आतां लवकर थकतों. आपले डोळे मंद झाले किंवा होत जाणार. सारांश, सर्व गोष्टींत बदल होत चालला आहे, पण ज्या जुन्या बुद्धिमान् ग्रंथकारांनीं आपल्या अलौकिक लेखांनीं आज हजारों वर्षें हजारों पिढ्यांस आनंद दिला, ते व त्यांचे ते लेख अद्यापि आपल्याला तसाच आनंद देत आहेत आणि पुढल्या पिढ्यांनाही देणार. तीं पुस्तकें आपण वाचूं लागलों, म्हणजे आपल्या पूर्वींचा काळ एकदम डोळ्यांपुढें उभा राहिलासें वाटतें. त्या काळच्या लोकांविषयीं आपल्या चित्तांत प्रेम व आदर उत्पन्न होतो. व्यासाचें भारत वाचलें म्हणजे अद्यापि ज्याच्या मनांत आनंदाच्या, अभिमानाच्या, व प्रेमाच्या लहरी उत्पन्न होत नाहींत असा एक तरी प्राणी असेल काय? रामायणाची कथा वाचून ज्याचें चित्त हलत

नाहीं, असा एक तरी विहृदय मनुष्य असेल काय? कालिदासाचें शाकुंतल वाचून मानवी प्रेमाची सत्यता कोणाच्या अनु भवास येत नाहीं? प्रत्येक सहृदय मनुष्यानें रामकथा, पांडवकथा या अगदीं अवश्य वाचाव्या. सावित्री आणि सीता या दैविक स्त्रिया असतील. राम, कृष्ण, धर्म, भीष्म, बुद्ध, ख्रिस्त, महंमद इत्यादि पुरुष दैविक असतील; परंतु त्यांच्या चारित्रामृताचें पान ज्यानें एकचित्तानें केलें, त्याचें स्वतःचें चरित्र केवळ व्यर्थच होईल हें संभवनीयच नाहीं. एवढ्याकरितां सत्पुस्तकांचें वाचन-विशेषतः सत्पुरुषांच्या चरित्रांचें वाचन–प्रत्येकानें जरूर करावें. मग तो सत्पुरुष स्वधर्मी असो कीं विधर्मी असो. तींच पुस्तकें सुंदर कीं जीं सदासर्वदा सर्व मनुष्यांना सुधारतील, त्यांचीं अंतःकरणें श्रेष्ठतेस नेतील आणि एकंदरींत त्यांस आनंदमय करून सोडतील. पुस्तकांविषयीं असें म्हटलें आहे :— चांगले व हितकर मित्र जसे थोडे, तशींच चांगलीं व हितकर पुस्तकेंही थोडीं. जितके मित्र निवडक असतील, तितका अधिक आनंद होणार. त्याचप्रमाणें पुस्तकांचेंही आहे.

चांगलीं पुस्तकें हेच आपले खरे हितचिंतक. जे श्रद्धापूर्वक त्यांजकडे जातील, आणि त्यांचा उपदेश ऐकतील, त्यांचें कल्याण होईल. इतकेंच नव्हे, तर त्यांच्या द्वारें त्यांच्या देशाचें व राष्ट्राचें कल्याण होणार आहे.

सुंदर पुस्तकांचा संग्रह दिवसानुदिवस घरांत वाढत जाणें हें आपल्यास भूषण आहे. पुस्तकें म्हणजे एक चैनीचा जिन्नस आहे असें समजूं नये, तर तो आपल्या जीविताला लागणारा अवश्य पदार्थ आहे असें समजलें पाहिजे.

इतकें सुंदर पुस्तकाविषयीं लिहिलें खरें, परंतु भाराभर पुस्तकें वाचण्यांत किंवा बाळगण्यांत कांहीं तात्पर्य आहे असें मात्र कोणीं समजूं नये. अगदीं दोन चार शेलकींच पुस्तकें असावीं, आणि तीं पुन्हां पुन्हां वाचून त्यांचें पारायण करावें, तरच त्यांच्यापासून आपल्यावर हितकर परिणाम होणार आहे. नाहीं तर व्यर्थ भाराभर पाठांतर करून पढतमूर्ख बनण्यापलीकडे आपल्याला त्या वाचनाचा कांहींसुद्धां उपयोग होणार नाहीं.

## २०

## प्रेम

प्रेम ही काय अजब चीज विधात्यानें या जगांत उत्पन्न केली आहे? सर्व जगाच्या रहाटगाडग्याचे व्यवहार जे सुरळीत चालले आहेत, ते या प्रेमामुळेंच. ज्याप्रमाणें एखाद्या यंत्राच्या चाकांना नेहमीं तेल द्यावें लागतें तरच तें यंत्र सुरळीतपणें चालतें; त्याचप्रमाणें प्रेम हें या विश्वरूपी यंत्राचें तेलच आहे. एक प्रेम नाहीं तर हें विश्व राहण्यास असह्य होईल.

कोणत्याही देशाच्या काव्यविषयक वाङ्मयाकडे जरा दृष्टि फेंका व त्यांत तुम्हांला काय दिसतें तें पहा. त्या सर्वांमध्यें तुम्हांला प्रेमाचाच सगळा खेळ दिसेल. ख्रिस्ती शतकापूर्वीचे नामांकित ग्रंथ घ्या किंवा एकोणिसाव्या शतकांतील नामांकित ग्रंथ घ्या. जुना ग्रीस, जुनें भारतवर्ष या देशांतील ग्रंथ घ्या किंवा नव्या इंग्लंड किंवा फ्रान्स देशांतील घ्या, त्या सर्वांत एकच विषय आहे. परंतु त्याचा चमत्कार हा कीं, इतकीं शतकें तोच तो विषय कवि, नाटककार व कादंबरीकार प्रतिपादन करीत आले आहेत, तरी तो निःसत्त्व व कंटाळवाणा वाटत नाहीं. याचें कारण उघडच आहे कीं, प्रेम हें मनुष्य स्वभावाला अगदीं खिळून राहिलेलें आहे. मनुष्य कितीही प्रेमहीन दिसो, त्याचेंसुद्धां कोणचें ना कोणचें तरी या जगांत प्रेमस्थान असतेंच. आईबाप, बायकामुलें, नातगोत, स्नेहीसोबती यांनासुद्धां न ओळखणारा एखादा कोणी 'तिमाजी नाईक' असला तरी त्याचें निदान द्रव्यावर तरी प्रेम हें असतेंच. तात्पर्य काय कीं, प्रेम हें सर्वव्यापी आहे. तें जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं अगदीं ओतप्रोत भरून उरलें आहे, असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

यामुळेंच कवि व तत्त्वज्ञानी या दोघांचेंही लक्ष सर्वकाळीं व सर्व ठिकाणी याच विषयावर गेलेलें असतें. ग्रीस देशांतील तत्त्ववेत्त्यांनीं या विषयाचा शास्त्रीयरीत्या ऊहापोह केलेला आहे. विशेषतः ग्रीस देशांतील तत्त्ववेत्ता प्लेटो याचे या विषयावरील ग्रंथ फार नामांकित आहेत. परंतु त्याची सविस्तरपणें हकीकत द्यावयाची म्हणजे एक लहानसा ग्रंथच लिहिला पाहिजे. परंतु तसें करण्याचा हेतु नाही. आज प्लेटोच्या ग्रंथांतील एक मजेदार व 'करमणूक करून ज्ञान देणारा' असा एक उत्कृष्ट उतारा देण्याचा विचार केला आहे.

प्लेटोचे सर्व ग्रंथ संभाषणात्मक आहेत व ते काव्य व तत्त्वज्ञान यांचा एकजीव करून लिहिलेले आहेत एवढें सांगणें जरूर आहे.

या ग्रंथांपैकीं 'मेजवानी' म्हणून एक संभाषण आहे. त्यांतला प्रसंग असा आहे :— ॲगॅथॉन नांवाच्या गृहस्थाला दुःखपर्यवसायी नाटक लिहिल्याबद्दल पहिलें बक्षीस मिळालें होतें. म्हणून त्यानें आपल्या येथें आपल्या मित्रमंडळीला मेजवानीस बोलाविलें होतें. त्या समारंभास साक्रेटीस, त्याची स्नेहीमंडळी व शिष्यमंडळी जमली होती. सर्व मंडळींचें जेवण वगैरे आटोपल्यावर कांहींतरी करमणूक पाहिजे म्हणून प्रश्न निघाला, ग्रीक लोक हे फार वादविवादप्रिय असत व या त्यांच्या स्वभावानुरूप एकानें असा विचार काढला कीं, "आजच्या प्रसंगीं जमलेल्या मंडळींतील प्रत्येकानें 'प्रेम या देवतेची आपापल्यापरी स्तुति करावी.' हा बेत सर्वांना पसंत पडला व ठरल्याप्रमाणें कांहींजणांनीं आपापल्या परी प्रेमाचे पोवाडे गाईले. पुढें ॲरिस्टोफेनीस याची पाळी आली. (ॲरिस्टोफेनीस हा ग्रीस देशांतील एक नामांकित नाटककार आहे. याचीं सर्व नाटकें विनोद व उपरोधोक्ति यांनीं भरलेलीं आहेत). ॲरिस्टोफेनीस यानें खालीं दिल्याप्रमाणें भाषण केलें :—

"प्रेमाची लोक जी हयगय करतात त्यावरून पाहतां, प्रेमाची खरी किंमत त्यांस अजून मुळींच कळली नाहीं, असें मला वाटतें. कारण ती जर त्यांना कळली असती तर खरोखर त्यांनीं त्या प्रेमदेवतेचीं भव्य देवळें व मंदिरें बांधलीं असतीं व तिच्या सन्मानार्थ मोठमोठे यज्ञ केले

असते. परंतु हें आजपर्यंत कोणींही केलेलें नाहीं. परंतु यापुढें तरी ते अवश्य केले पाहिजेत; कारण सर्व देवांमध्यें या देवासारखा मनुष्याला उत्तम मित्र नाहीं. मानवी जातीच्या सुखांत व्यत्यय आणणारीं संकटें दूर करणारा व त्यांना संकटांत मदत करणारा तोच एक देव आहे.

त्या देवाच्या खऱ्या योग्यतेचें चित्र मी आपल्यापुढें उभें करतों व मी जें आपणांस सांगत आहें तें आपण सर्व जगाला सांगाल अशी मला आशा आहे. मनुष्यप्राणी पहिल्याप्रथम होता कसा व त्याच्यांत पुढें काय फरक झाला हें आधीं आपल्याला सांगितलें पाहिजे. कारण आद्य मनुष्यप्राणी हल्लींप्रमाणें नव्हता; तर हल्लींपेक्षां फार निराळा होता. हल्लींप्रमाणें माणसामध्यें दोन जाती नव्हत्या; तर मूळारंभीं तीन जाती होत्या. पुरुषांची जात, स्त्रियांची जात व स्त्रीपुरुषांची जात; या संयुक्त जातीला एक स्वतंत्र नांव होतें व ही तिसरी जात पूर्वींच्या काळीं अस्तित्वांत होती; परंतु सध्यां ती नाहींशी झाली आहे व हल्लीं आपण 'बायक्या पुरुष' हा शब्द निंदाव्यंजक म्हणून वापरतों. त्याचप्रमाणें आद्यमनुष्यप्राणी वाटोळा होता; त्याची पाठ व कुशी मिळून एक वर्तूळ होत असे; तसेंच त्याला चार हात पाय असत; एक डोकें असे व त्याला दोन तोंडें एक पुढें व एक पाठीकडे अशीं असत. तसेंच त्याला चार कान असत व याप्रमाणेंच इतर सर्व अवयव असत. हल्लीं मनुष्यें चालतात त्याप्रमाणें त्याला ताठ चालतां येत नसे. परंतु त्याच्या इच्छेप्रमाणें, तोंड फिरविल्याशिवाय त्याला मागें किंवा पुढें जातां येत असे. शिवाय ज्याप्रमाणें भोरपी लांकडाच्या घोड्यावरून भराभर पाय टाकीत चालतात, त्याचप्रमाणें आद्य मनुष्यप्राण्यालाही चार हात व चार पाय टेकून अत्यंत जलद् पळतां येत असे. याप्रमाणें पूर्वीं तीन जाती असत. त्यांची शक्ति व सामर्थ्य फार भयंकर होतीं व त्यांचे विचारही महत्त्वाकांक्षी होते व म्हणून त्यांनीं देवावर हल्ला केला. राक्षसांच्या वगैरे ज्या गोष्टी सांगतात त्या या मनुष्यजातीच्याच खरोखरी होत. इंद्रादिक देवांना मोठें भय पडलें. वज्रपातानें या मनुष्यप्राण्यांचा नायनाट करावा कीं काय ? परंतु असें केल्यानें पृथ्वीवरील सर्व यज्ञयागादिक क्रिया नाहींशा होणार; परं

मनुष्यप्राण्यांचा गर्व तर कमी झाला पाहिजे. तेव्हां देवांनीं एक युक्ति काढिली. माझ्या युक्तीनें त्यांचें गर्वखंडन होऊन त्यांची वागणूक सुधारेल. मनुष्यप्राणी जिवंत ठेवतों; परंतु त्याचे दोन दोन तुकडे करतों. म्हणजे त्याची शक्ति कमी होईल व त्याची संख्या दुप्पट होईल; हें आपल्या फायद्याचेंच होईल. कारण आपल्याला यज्ञांतील हविर्भाग दुपटीनें जास्त मिळतील. आतां ते दोन पायांवर चालतील. परंतुत्यांनीं आणखी कांहीं उन्मत्तपणा केला तर त्यांना एका पायावर चालावें लागेल." याप्रमाणें बोलल्यावर भरलेल्या मिरच्या करण्याकरतां जशा आपण मिरच्या मधोमध चिरतों, त्याप्रमाणें देवानें मनुष्यप्राण्याला चिरलें व एका मागून एक कापीत चालला असतां त्यानें वरुणाला त्याचें मान व तोंड फिरविण्यास सांगितलें; म्हणजे मनुष्याला आपल्या कापलेल्या अर्धाकडे पाहतां येऊन त्याला विनयाचें शिक्षण मिळेल. त्याचप्रमाणें वरुणाला मनुष्यांच्या जखमा बऱ्या करण्यास व त्यांचें शरीर बनविण्यास सांगितलें. त्याप्रमाणें वरुणानें तोंड फिरविलें व ज्या भागाला आपण हल्लीं पोट म्हणतों, त्या भागाकडे ज्याप्रमाणें आपण धान्याचें पोतें हांसडतो त्याप्रमाणें कातडी हांसडून घेतली व तेथें त्याची गांठ मारून कातडी मिळवून टाकिली (त्या गांठिला आपण नाभि म्हणतों); तसेंच त्यानें छाती तयार केली व अंगावरच्या सुरकुत्या साफ केल्या. मात्र पूर्वींच्या स्थितीची आठवण होण्याकरितां पोट व नाभीच्या भागांत कांहीं थोड्याशा ठेवून दिल्या. याप्रमाणें मनुष्यप्राण्याचे दोन अर्ध झाले. प्रत्येक भागाला आपल्या दुसऱ्या भागाची इच्छा होऊं लागली व ते जवळ येऊन एकमेकांना आलिंगन देऊन बसूं लागले. त्यांना तहानेचें कीं भुकेचें कशाचें भान नाहींसें झालें व ते तहान व भूक यांनीं मरण्याच्या पाळीस आले व मनुष्यप्राणी पृथ्वीवरून नाहींसा होण्याचा रंग दिसूं लागला. तेव्हां देवाला दया येऊन त्यानें स्त्रीपुरुषाच्या आलिंगनापासून मनुष्यजातीची वाढ व्हावी अशी स्थिति उत्पन्न केली (कारण पूर्वींची स्थिति अगदीं भिन्न होती. तिन्ही जाती परस्परांवर अवलंबून नव्हत्या) व मनुष्यप्राणी परस्परा-

वलंबी झाले. आतां पूर्वींच्या स्त्रीपुरुषजातीपैकीं जे आहेत त्यांचें प्रेम स्त्रियांवर बसतें व बायकांचें पुरुषांवर बसतें. ज्या स्त्रिया पूर्वींच्या स्त्रीजातीपकीं आहेत त्यांचें प्रेम स्त्रियांवर जडतें व स्त्रियांच्या मैत्रींतच त्यांना आनंद वाटतो. जे पुरुष पूर्वींच्या पुरुषजातीपैकीं आहेत, त्यांचें प्रेम पुरुषांवर जडतें व त्यांचें आयुष्य मित्रांच्या सहवासांत जातें व अशा आयुष्यांतच त्यांना अत्यंत आनंद वाटतो. याप्रमाणें मनुष्यप्राणी हा प्रेमाचा अगदीं भुकेला आहे व आपल्या समानशीलाचा मनुष्य पाहिल्याबरोबर त्याचें त्याच्यावर प्रेम जडतें व आपण क्षणभरसुद्धां एकमेकांच्या दृष्टीआड होऊं नये असें त्यांना वाटतें व अशीं माणसें सर्व आयुष्य एकमेकांच्या सहवासांत घालवितात. परंतु एकमेकांपासून त्यांना काय पाहिजे आहे असें जर विचारलें तर कांहीं त्यांना सांगतां येणार नाहीं. कारण त्यांचा एकमेकांबद्दलचा विलक्षण लोभ हा कांहा नुसत्या संगतीकरितां नसतो, तर त्यांना दुसरी कसली तरी इच्छा असते. परंतु ती त्यांना सांगतां मात्र येत नाहीं. अशा एकाद्या जोडप्यापुढें आपल्या सर्व साधनांसह विश्वकर्मा येऊन उभा राहिला व ‘ तुम्हांला एकमेकांपासून काय पाहिजे ’ असें जर त्यानें विचारलें, तर तें जोडपें गोंधळांत पडेल. परंतु त्यांची बावरलेली वृत्ति पाहून विश्वकर्म्यानें विचारलें कीं, “ तुम्हांला अगदीं एक होण्याची का इच्छा आहे व रात्रंदिवस एकमेकांच्या सहवासांत रहावें असें का तुम्हांला वाटतें? कारण तुम्हांला जर असें वाटत असलें तर मी तुमचा दोघांचा एक जीव करून देतों म्हणजे तुम्ही दोन असून एक व्हाल व दोघांचें आयुष्य जणूं कांहीं एकाच माणसाचें आयुष्य होईल व मरणानंतरही तुम्ही एकजीवच राहाल. हेंच ना तुम्हांला हवें आहे? व ही स्थिति आल्यावर तुमचें समाधान होईल ना? ” असें विचारल्यावर कोणचा माणूस ‘ खरोखर हेंच आमच्या मनांत होतें असें म्हणणार नाहीं? ’ अशी सार्वत्रि इच्छा असण्याचें कारण मनुष्य हा पूर्वीं पूर्ण व स्वतंत्र प्राणी होत परंतु हल्लीं तो अपूर्ण, परावलंबी व म्हणून लंगडा झाला आहे व ..। म्हणजे पूर्णता व सबंधपणा मिळविण्याचा प्रयत्न आहे. याप्रमाणें प्रेम हा देव मनुष्यांचा

मित्र व मदतगार आहे. त्याचेमुळेंच मनुष्यप्राणी पूर्णत्वाप्रत पावेल. म्हणून प्रत्येकानें या देवाचा मान ठेवावा व आपल्याला सदृश अशा माणसाशीं स्नेह ठेऊन दोघांचीही स्थिति सुधारावी. येणेंप्रमाणें प्रेमाचा पोवाडा मीं म्हटला आहे. यांत कांहींएक थट्टा नाहीं. मी बोललों आहे तें अंतःकरणापासून आहे. आतां ॲगॅथॉन व सॉक्रेटीस हे आपापल्या प्रेमाच्या स्तवाला आरंभ करतील अशी मला आशा आहे."

## २१

### कर्तव्य

कर्तव्यकर्म करण्यास अंगीं धैर्य लागतें. एकदां एका नावाड्याच्या मुलानें पाण्यांत नांव सोडली होती. नावेंत राजा बसला होता. मुलगा लहान असल्यामुळें त्याचें दूरवर लक्ष पोहोंचलें नाहीं. इतक्यांत भयंकर वादळ सुटलें व नाव बुडण्याचा बेतांत आली. तेव्हां त्या मुलाच्या बापानें त्या वादळांत उडी टाकण्याचा बेत केला. सभोंवतालचे लोक त्या मुलाच्या नावाड्याला म्हणाले 'अरे विनाकारण कां जीव धोक्यांत घालीत आहेस?' तेव्हां तो म्हणाला 'मला उडी टाकलीच पाहिजे. राजा आणि मुलगा मरत असावा आणि मीं जगावें हें नीट नाहीं. त्यांना वांचविण्याच्या कर्तव्यांत मी जगो अथवा मरो.' एका अशिक्षित माणसाच्या तोंडांतून हे उद्गार निघावे ही मोठी वाखाणण्यासारखी गोष्ट आहे. यापासून एवढेंच शिकावयाचें, कीं प्रसंग बिकट असो कीं सोपा असो, आपण आपलें आयुष्य कर्तव्य बजावण्यांत घालविलें पाहिजे. आईबाप, देशबंधु, इष्टमित्र वगैरे यांच्या वेळेवर उपयोगी पडणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. स्वार्थासाठीं त्यांचा संबंध न जाणतां निमूटपणें स्वस्थ बसणें हा नीचपणा होय. वॉशिंग्टनचाही कर्तव्यकर्म करण्याविषयीं मनाचा उत्साह असे. अशा त्याच्या वागणुकीनें त्याची लोकांवर छाप बसत असे. तें कर्तव्यकर्म तो अशा रीतीनें करीत असे कीं, त्याचा परिणाम लोकांवर होवो कीं न होवो, केवळ कर्तव्य म्हणूनच तो तें करीत असे. तें कर्तव्यकर्म करीत असतांना त्याचें फल आपणांस मिळेल, हें तो मनांत देखील आणीत नसे. आपणाला वैभव, कीर्ति अगर बक्षिस मिळेल, या लालुचीवर तो कर्तव्य करीत नसे. एक चांगली गोष्ट म्हणून तो ती करीत असे. एक सत्पक्ष म्हणून तो हातीं घेत

असे. त्याचा प्रधान हेतु कर्तव्य असे. अमुक एक गोष्ट प्राप्त होणार म्हणून तो कर्तव्य करीत नसे. असा कर्तव्य बजावणारा साधु कां बरें पुढें येणार नाहीं ? त्याच्या अंगीं विनयही पुष्कळ होता. अमेरिकेचा अधिकार त्याच्यावर बळेंच लादला. तो अधिकार हातीं येण्यासाठीं तो हपापलेला नव्हता. जेव्हां त्याला तो अधिकार मिळाला तेव्हां तो म्हणाला, 'मी ह्या अधिकारास पात्र आहें कीं नाहीं हें मला समजत नाहीं. लोकपक्षानें मला निवडलें. माझ्या चुकीची जबाबदारी त्यांच्यावरच राहील.'

शिवाय याबद्दल त्यानें आपल्या बायकोस असें कळविलें कीं, 'मिळालेला अधिकार नाकारण्यासाठीं मीं पुष्कळ खटपट केली, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. या योगानें तुझा व कुटुंबाचा वियोग होईल पण त्याला आतां नाइलाज आहे. माझी नाखुषी आतां चालणार नाहीं. परमेश्वरी संकेत म्हणून हें जबाबदारीचें काम मजकडे आलें आहे व त्याची फलनिष्पत्ति देखील चांगली होईल असें वाटतें. हा अधिकार मिळाल्यावर मी माघार घेणें हें भित्रेपणाचें होईल व मला अंगीं असलेले गुण दाखवितां येणार नाहींत. ही संधि वायां दवडतां कामाचें नाहीं आणि तसें जर मी करीन, तर देशबंधूंना फार वाईट वाटेल. त्यांच्या सर्वांच्या इच्छेविरुद्ध मीं वर्तन करणें बरोबर नाहीं. आतां हें माझें कृत्य जरी तुला पसंत न पडलें तरी हरकत नाहीं. कारण माझी मनोदेवता असें सांगत आहे कीं, बायकोपेक्षां, कुटुंबापेक्षां दूरवर दृष्टि पोंहचीव.'

आज हा अधिकार त्याला कमांडर-इन-चीफचा मिळाला होता; पण चोख कामगिरीनें तो शेवटीं प्रेसिडेन्टपदाप्रत पोहोंचला. तो संकटाला कधीं भ्याला नाहीं; कारण त्याचें लक्ष पूर्ण कर्तव्यावरच होतें. तो कधीं धोका पाहून मागें हटला नाहीं; कारण त्यानें लोकपक्षाची फाजील फिकीर केली नाहीं. त्यांच्या अज्ञानानें त्यांना त्यांचें हित कळत नव्हतें, तेव्हां यानें आपली सर्व वजनदारी खर्च करून भेद मोडून टाकावा. एकदां एका तहाच्या वेळीं लोकांनीं याला दगडाचा मारा केला. पण हा एवढेंच म्हणाला कीं, 'मला सवंग लोकप्रियतेची जरूरी नाहीं.

माझी सद्सद्विवेकबुद्धि जें सांगत आहे तसा मी वागत आहें.' वॉशिंग्टनसारखेंच वेलिंग्टनचें ध्येय होतें. तो फार राजनिष्ठ होता. एकदां तो असें म्हणाला कीं, 'जर आपण कर्तव्य केलें नाहीं, तर मग जगांत काय राहिलें ? आणि तशा जगण्यांत पुरुषार्थ तो कोणता ?' स्वतः जेव्हां वागणूक नीट ठवावी, तेव्हां दुसरेही त्याचा शब्द ऐकतील. एक जुनी म्हण अशी आहे कीं, 'मी जेव्हां काम करतों तेव्हां माझें काम पाहून जे दगडासारखे समोर उभे राहतात तेही काम करतात.' वेलिंग्टनच्या हाताखालचे शिपाई तरुण आणि सशक्त होते, पण तो म्हणाला, 'जर तारुण्याचा आणि शक्तीचा उपयोग कर्तव्य करण्यांत आणि अधिकाऱ्यांची आज्ञा मानण्यांत आला नाहीं तर व्यर्थ आहे. त्यापेक्षां हुकुमी जनावरें बरीं.' वाटर्लूच्या स्थळीं वेलिंग्टन आपल्या शिपायांना एवढेंच म्हणाला कीं, 'वीरहो, परत जाते वेळीं इंग्लंड तुम्हांला काय म्हणेल याचा तुम्ही विचार करा.' तेव्हां सर्व शिपाई म्हणाले 'हो, आम्हांला आमचें कर्तव्य कळत आहे.' नेलसनचें बोलणें हेंच होतें कीं, 'इंग्लंड प्रत्येकाच्या कर्तव्याची अपेक्षा करीत आहे. ज्यानें त्यानें आपलें कर्तव्य केलें कीं, इंग्लंड तरलेंच समजा.' हे ट्राफल्गारच्या ठिकाणचे उद्गार आहेत. शेवटीं तो असें म्हणाला कीं, 'मीं आपलें कर्तव्यकर्म केलें आणि हें घडवून आणल्याबद्दल मी परमेश्वराची स्तुति करतों.' एकदां लढाईत जाण्यापूर्वीं सर्व शिपायांनीं नेलसनकडे अशी तक्रार नेली, 'आम्ही मरणार या भीतीनें आमच्या बायका देवळांत प्रार्थना करण्यास गेल्या आहेत.' त्यावेळीं नेलसननें एवढेंच उत्तर दिलें कीं, 'देशाचें कर्तव्य हें जें ऋण आहे तें फेडून द्या. जर घरीं राहून, बायकापोरें जवळ घेऊन देश राखला जात असेल, तर फारच आनंदाची गोष्ट आहे.' त्यानें आपल्या एका शिपायाला असा उपदेश केला कीं, 'नुसता अधिकाऱ्याचा हुकूम पाळला म्हणजे कर्तव्य संपलें नाहीं, तर प्रत्येकाचा योग्य असेल तो हुकूमच मानून वर्तन करावें. कधींही असमाधानी राहूं नये आणि असलेल्या स्थितींतच सुख मानावें, कर्तव्य करण्याविषयीं महत्त्वाकांक्षा बाळगा. अमुक एका गोष्टींत कर्तव्य बजावलें म्हणजे संपलें असें समजूं नका.

तर जें पुढें येईल तें करण्यांतच जास्त महत्त्व आहे; आणि शहाणा अधिकारीही मनुष्य पाहूनच काम सांगेल. उगीच अधिक बोजा लादून फळाची अपेक्षा करणें हा त्याचा मूर्खपणा होईल.'

नेलसनला वैभवानें, विजयानें, किंवा मानानें आनंद झाला? नाहीं; कर्तव्य बजावल्यानें. रॉबर्टसन् म्हणतो कीं, 'कर्तव्य हें स्वयंसिद्ध आहे आणि आत्मयज्ञ कर्तव्य बजावण्यांतच व्हावा. एरवीं ती आत्महत्त्या होईल, अगर पशूचें मरण बरें. जो आपलें कर्तव्य करीत आहे, त्यानें भविष्यकाळाविषयीं निराश होण्याचें कारण नाहीं. कर्तव्याचें फळ मिळालेंच पाहिजे.'

## २२

## समुद्राचें गाणें

समुद्रावर आपण हंसादिपक्षी, ढग व गलबतें पाहतो. पण समुद्राचे जे स्वर कांहीं लोकांस ऐकूं येतात ते किती मधुर असतात हें सगळ्यांस समजत नाहीं. जलदेवता व अप्सरा यांविषयीं कांहीं गोष्टी सांगतात. त्या देवता व अप्सरा अशा मधुर गातात कीं, त्यांच्या गाण्यानें गरीब खलाशी वेडावून जाऊन समुद्राच्या खोल तळाशीं बुडी मारून बसतात व ते तेथून जिवंत परत येत नाहींत. पण वस्तुतः कोणींहि आजपर्यंत त्या जलदेवता अथवा अप्सरा पाहिल्या नाहींत. समुद्राचें गाणें व पाण्याची भुरळ ही किती मोहक असते हें दाखविण्याचा हा एक प्रकार आहे.

कांहीं लोक दुनियेस 'देवाचा दुर्ग' असें म्हणतात, तर समुद्र ही त्या किल्ल्याची एक खाई होईल. पण ती दुनिया शरीररूप कल्पिली तर समुद्र हें त्याचें मोठें तोंड होईल. त्याचे स्वर मुरलीप्रमाणें मृदु व कर्ण-मधुर असतात. पण मोठमोठ्या शूर लोकांस भिवविण्याकरितां त्यास ओरडतां व गर्जतां येत. खडकांच्या व गुहांच्या किनाऱ्यावर समुद्राच्या पर्वतप्राय लोटत येणाऱ्या लाटांचा धो धो आवाज व तेणेंकरून अनेक मोठ्या पिपांत जणूं अनेक राक्षसांप्रमाणें गर्जणारे व समुद्रापासून दूरच्या प्रदेशीं ऐकूं येणारे त्यांचे चवताळलेले प्रतिध्वनि हे ऐकण्यास अत्यंत भयप्रद असतात. मला वाटतें कीं, समुद्राच्या तळाशीं अगदीं सामसूम असेल. शिंपा, कालवें, शंख व मासे यांस तें सभोंवार चाललेलें संगीत मुळींच समजत नसावें. त्या गाण्यांतील शब्दन् शब्द आपल्यासही सांगतां न येवो, पण तें गाणें आपल्यास ऐकूं येतें ह्यांत संशय नाहीं. आम्हांस समुद्राचें गाणें ऐकूं येतें. तें अत्यंत गूढ व मोहक असतें. कांहीं लोक

असे असतात कीं, त्यांस तें गाणें उद्देशून असतें व त्यांस त्या गाण्याचा भावार्थ समजतो. त्यांस तें ऐकूं आल्याबरोबर त्यांचा जीव गारीगार होतो अथवा त्यांनीं तें ऐकल्याबरोबर त्यांचा आनंद गगनांत मावेनासा होतो, अथवा त्यांस ऐकूं येत असतां त्यांस भयासारखें कांहीं तरी वाटतें. पण त्याचे अनेक आलाप व ताना ऐकत असतां त्यांच्या ठायीं भक्ति व प्रेम हीं उत्पन्न होतात.

कारण समुद्राचें गाणें अनेक आवाजांचें बनतें. तें एका मोठ्या आवाजापासून उत्पन्न होतें असें कोणास वाटत असेल, पण तें तसें नाहीं. तें अनेक स्वरांचें असतं. ज्या दिवशीं शीतळ मतलईच्या वाऱ्याच्या झुळका वाहतात, त्या दिवशीं समुद्राच्या किनाऱ्यावर आपण वाळूंत पडलों तर हिरव्यागार शेतांतील काळ्या पांढऱ्या शेळ्यामेंढ्यांप्रमाणें, अथवा आकाशांतील लहान लहान पांढऱ्या ढगांप्रमाणें आम्हांस लहान पांढऱ्या लाटा दिसतात. प्रत्येक लाट पुढें धांवत येऊन मोडत असतां लहानसा सळसळाट होतो व त्या सळसळाटांची एकुणांत जी काय असते ती कांहींशी लहान पक्षांच्या कुलकुलाटानें गजबजलेल्या अरण्यासारखी असते. रेतीवर अथवा वाळूवर गडबडां लोळणाऱ्या प्रत्येक लाटेचा ध्वनि उंच उठतो. ती लाट किनाऱ्यावर धांवून येत असतां मुसंडी मारिते, ती मागें सरते तेव्हां ती सूर काढते. ती आपल्याबरोबर जे खडे व गोटे लोटीत येते, त्यांचा एकमेकांवर खडखडाट होतो. ती खालीं जाणारी लाट वर येणाऱ्या लाटांना भेटते व ते खडे व गोटे पुन्हां वर लोटले जातात, तेव्हां लहानसा खळखळाट होतो. भरतीच्या लाटांवर लाटा तासानुतास चढत येत असतात व ओहटी लागली म्हणजे त्या तासानुतास निखरत जातात, तेव्हां त्यांचा आवाज होतो. नद्या नाले कड्यावरून थडथड उड्या टाकून सळसळत व खळखळत समुद्रांत वारे घुसतात; पाव्याप्रमाणें अनेक ताना मारीत असतात व समुद्रावरील बगळे, करकोचे, गल्ल इत्यादि पक्षी कर्कश आवाजानें करकरावत असतात. एवढेच ध्वनि का थोडे झाले ? ते आपण निरनिराळे क्वचित् ऐकतों. पण त्यांचा समुद्रावर एक मोठा संकीर्ण ध्वनि व गायन बनतें–तो ध्वनि व त गायन अगाध महासागराप्रमाणें अगम्य असतें.

## २३

### हातरुमाल

अलीकडील मंडळींपैकीं बहुधा प्रत्येकाच्या खिशांत हातरुमाल सांपडेल. कित्येकांच्या खिशांत दोन दोन, तीन तीनही रुमाल सांपडतील. मात्र, प्रत्येकाच्या खिशांतील रुमाल स्वच्छ असेलच असें सांगण्याचें धाडस आम्ही करीत नाहीं. स्वच्छता किंवा घाणेरडेपणा ही ज्याच्या त्याच्या मर्जीची, आवडीची गोष्ट आहे. कोणी रोज परीटघडीचा नवा रुमाल वापरीत असतील तर कोणाच्या रुमालास अमावास्यपौर्णिमेसही पाण्याचें दर्शन घडत नसेल. कोणी आपल्या रुमालावर तासागणिक वासाच्या पाण्याचा अभिषेक करीत असतील, तर कोणी दर घटकेस घाणीचें नवें पुट त्याजवर चढवीत असतील. ही गोष्ट ज्याच्या त्याच्या मर्जीची आहे.

पण एवढें बरीक खरें कीं, खिशांत रुमाल बाळगण्याची प्रत्येकाला हौस आहे. खिशांत रुमाल नसला तर पोशाखाची कांहीं पूर्तता होत नाहीं. जसा अंगांत सदरा किंवा डोक्याला टोपी ही हवीच, तसाच खिशांत रुमाल हाही पाहिजेच, मग तो मळका, कुजका कसलाही असो. हातरुमालाचा हा दिग्विजय कांहीं सामान्य नाहीं. हातरुमाल तो काय, अगदीं क्षुल्लकांतला क्षुल्लक, वीतभर लांबीरुंदीची कापडाची चिंधी. पण आज तिनें पांच खंड पृथ्वी पादाक्रांत केली आहे.

आमच्या पूर्वजांच्या वेळीं हातरुमाल होते काय ? नसावे असें आम्हांस वाटतें. कारण, मग, 'इंद्रानें देवसभेंत आपल्या खिशांतला हातरुमाल काढून नाक पुसलें,' 'त्याकाळीं त्या रुमालावर शिंपडलेल्या पारिजातकाच्या अत्तराचा घमघमाट चोहींकडे पसरला' किंवा "श्रीकृष्णानें लोण्याचा गोळा चोरून खाल्ल्यानंतर हातरुमालान आपल तोंड पुसलें" असा कोठें उल्लेख

असल्यास तो आम्हांस पहावयास मिळालेला नाहीं. हातरुमालाच्या प्राचीनत्वाचें संशोधन करून तें स्थापित करण्याचें काम इतिहास-संशोधकांचें आहे. ते या कामास लागल्यास कुठून ना कुठून तरी कांहींतरी आधार काढून दाखवितील याबद्दल आम्हांस पूर्ण खात्री आहे. एवढेंच नव्हे, पण त्यांनीं आग्रहानें हा प्रश्न हातीं धरला तर हातरुमालांचें अस्तित्व वैदिककालापूर्वी नेऊन प्रस्थापित करण्यास ते अनमान करणार नाहींत. यासाठींच आमच्या पूर्वजांच्या वेळीं हातरुमाल नसावे एवढेंच आम्ही म्हणतों, नव्हते असें म्हणण्यास आम्हांस धीर होत नाहीं.

आज शिल्लक असलेल्या म्हाताऱ्या लोकांत ज्या चाली शिल्लक आहेत, त्यांवरून हातरुमालाचें काम पूर्वी पंचा, उपरणीं, किंवा नेसाव-वयाचें धोतर यांनीं भागवीत असत असें वाटतें. ह्या रूढीचे अवशेष अद्यापही सर्वत्र दृष्टीस पडतात. सांप्रत उपरण्यावर काळ आला आहे आणि धोतरांवरही तो पुढें मागें येण्याचीं चिन्हें होऊं लागलीं आहेत हें जरी खरें आहे, तथापि नाक शिंकरण्यासाठीं किंवा तोंड पुसण्यासाठीं धोतर वर उचलणारांचे देखावे अद्याप दुर्मिळ झालेले नाहींत. ही आपली जुनी चाल अद्याप लोकांनीं कायम राखली आहे. खिशांत रुमाल असला तरीही जुन्या चालींचा अभिमान बाळगणारे लोक सर्वत्र दृष्टीस पडतील.

हातरुमालाचे अनेक उपयोग आहेत. नाक शिंकरावयास, तोंड पुसा-वयास, थिएटरांत किंवा सभेंत बसलें असतां वारा घ्यावयास,—विशेषतः त्यावर वासाचें पाणी शिंपडलें असल्यास किंवा रुमाल नवीन फॅश-नचा असल्यास त्यापासून वारा चांगला येतो,—तोंडावर धरून हळूंच कोणाशीं बोलावयास, किंवा इष्ट वस्तूकडे दुसऱ्यास न कळत पहावयास, भाजी आणावयास, एखाद्या वस्तूवर पांघरूण घालून तिचा असभ्यपणा झाकावयास वगैरे अनेक कामीं हातरुमालाचा फार उपयोग होतो. हात-रुमाल पाहिजे, त्याची आवश्यकता आहे, यांत कांहीं शंका नाहीं.

आमच्या बायकादेखील हातरुमाल वापरूं लागल्या आहेत आणि या बाबतींत आपण पुरुषांच्या किंवा इतर सुधालेल्या देशांतील बाय-कांच्या मागें नाहीं हें सर्वांच्या नजरेस आणून देण्याकरितां स्पष्टपणें दिसेल

अशा तऱ्हेनें त्या आपला हातरुमाल कमरेस खोंवीत असतात. पुरुष तर नव्यानें किंवा नवीन हातरुमाल वापरूं लागला म्हणजे आपल्या इतर बांधवांपासून ती गोष्ट चोरून ठेवण्यास तो कधींही इच्छित नाहीं. हा त्याच्या स्वभावाचा उदात्तपणा खिशांतून डोकावून पहाणारे रुमाल व्यक्त करितात.

तथापि हा नवा ढंग आहे, हा नवा चोंचला आहे. ह्या नव्या ढंगानें जुन्या पंचांना हांकून लावलं आणि आपण लोकांच्या खिशांत जाऊन बसला आहे. आणि तो आपल्या वाहिवाटीची रूढि घालूं पहात आहे. आपल्या पूर्वजांनीं जी गोष्ट केली ती बरी असली किंवा हवी असली तथापि आपल्या पूर्वजांविरुद्ध आपण तिचा अंगिकार करावा कीं काय याचा निर्णय करण्यास 'सनातन' धर्माभिमान्यांनीं दिरंगाई करूं नये. ते जरी स्वत: भिकार पंचे फेंकून देऊन गुळगुळीत रुमाल वापरीत असले तथापि ती आत्मकृति खाजगी असल्यामुळें लोकांस कोणाच्या खाजगी गोष्टींची बाचाबाची करण्याचा यत्किंचितही अधिकार नाहीं हें प्रमेय प्रतिपादन करून आपल्या अनाद्यनंत धर्माचा लोकांस वेळींच मार्ग दाखवावा.

हातरुमाल वापरण्याची रीत आम्हीं पाश्चात्यांपासून उचललेली आहे. साहेब लोकांत हातरुमाल हा पोशाखाचा एक भागच समजतात. ते हरतऱ्हेचे हातरुमाल वापरतात. प्रथम ते हातरुमाल वापरूं लागले तेव्हां ते सोईकडेच पहात असत. पण पुढें पुढें सोईपेक्षां शोभेचें प्रस्थ वाढत चाललें, अद्याप देखील तें वाढतच आहे.

आतांचे हातरुमाल बहुधा चौकोनी, सारख्या लांबरुंदीचे असतात. पूर्वा ते तसे नसत. चौकोनी, लांबट, वाटोळे, अष्टकोनी, वाटेल तसे असत. चौकोनी हातरुमाल सार्वत्रिक प्रचारांत आल्यास १२७ वष झालीं. फ्रान्सचा राजा सोळावा लुई यास त्याच्या प्रीतींतली एक बाई एके दिवशीं म्हणाली कीं, रुमाल जर चौरस निघतील तर फार चांगलें. राजानें त्याप्रमाणें हुकूम फर्माविला कीं, "माझ्या राज्यांतील प्रत्येक हातरुमालाची लांबी व रुंदी सारखी असली पाहिजे." ह्या हुकमाचा परिणाम

इतका झाला कीं, त्या वेळेपासून हातरुमालाच्या आकारांत जो फरक झाला तो अद्याप तसाच चालला आहे. एके काळीं फ्रान्समधील हातरुमालांची फारच ख्याति होती व अद्यापही गुलहौशी लोक सर्वांत फ्रान्समधील रुमालच अधिक पसंत करितात.

सोळाव्या व सतराव्या शतकांत हातरुमालांस फार किंमत पडे. त्या काळच्या रुमालांवर कशिद्याचें उत्कृष्ट काम करीत. त्यांत सुंदर अक्षरांनीं नांवें घालीत, राजचिन्हें व आयुधं काढीत आणि प्रेमगीताचे चरण लिहीत असत. शेव्हरुजच्या डचेसपाशीं पुष्कळ सुंदर हातरुमाल होते. त्यापैकीं एकावर गुलाबाच्या फुलांच्या माळांच्या आडून मदन शरसंधान करीत आहे असें चित्र काढलेलें होतें.

कित्येक हातरुमालांना मोत्यांचा झालर लावीत व त्यांची किंमत दहा हजार रुपयांपर्यंत असे. इटलीची राणी मार्गारेट इच्यापाशीं एक हातरुमाल आहे. त्यावर पंधराव्या शतकांतील तऱ्हेचा कशिदा काढलेला आहे व त्याची किंमत सुमारें ४५००० रुपये आहे.

हातरुमालांचा कधीं कधीं विचित्र उपयोग करून घेतलेला आहे. १९०६ सालीं एका पलटणीला हातरुमाल वांटले. त्या रुमालांवर अडचणीचे वेळीं घाबरून न जातां काय करावें व कसें वागावें याविषयीं थोडक्यांत माहिती छापली होती. तसेंच फ्रान्स व जर्मनी यांच्यामध्यें युद्ध चालू असतांना कांहीं प्रशियन कामदारांस हातरुमाल दिले होते. त्यांजवर, शत्रूच्या देशापैकीं ज्या भागावर स्वारी करावयाची होती त्याचा नकाशा छापला होता.

फ्रान्समधील लष्करांतील शिपायांना कांहीं वर्षांमागें हातरुमाल वांटले. त्यावर आरोग्याचे नियम छापले होते व लष्करी अधिकाराचीं चिन्हेंही वर छापलीं होतीं.

इंग्लंडची राणी ॲन हिच्या कारकीर्दींत हातरुमालाचा उपयोग साधारण ज्ञानाच्या प्रसारार्थ पुष्कळदां केलेला आढळतो. ता. ५ एप्रिल १७१० रोजीं राणीनें आपल्या पार्लमेंटास उद्देशून जें भाषण केलें तें हातरुमालांवर छापून ते रुमाल सर्व प्रजेस वांटण्यांत आले. दुसऱ्या एका

खेपेस राजद्रोही लोकांचीं चित्रें छापलेले रुमाल तिनें आपल्या प्रजेस वांटले. हे रुमाल वांटण्यांत तिचा असा उद्देश होता कीं, त्या बडखोर इसमांस लोकांस ओळखतां यावें व ज्यांस ते दिसतील त्यांनीं त्यांस पकडून आणावें.

कांहीं दिवसांपूर्वीं माद्रिदमध्यें एक वर्तमानपत्र निघत असे. तें तागाच्या हातरुमालावर सहज धुवून जाईल अशा शाईनें छापलेलें असे. लोक तें वाचून झाल्यावर रस्त्यावर असलेल्या एकाद्या हौदांत बुडवीत. बाहेर काढल्यावर त्यांचा हातरुमाल स्वच्छ होई.

## २४

## संभाषण

ज्याच्याशीं आपल्याला बोलायचें, त्याचें मन वेधून घेणें आणि कितीही वेळ आपण बोललों तरी कोणाला कंटाळा न येऊं देणें हें एक मोठ्या चातुर्याचेंच काम आहे. तें फार थोड्यांस साधतें. उत्तम संभाषण करणें हें एकाद्या उत्तम वाद्यावर वाजविण्यासारखेंच आहे. संभाषणाची आकर्षकता, मार्दव व ज्ञानपरिपूर्णता, इत्यादि गुण म्हणजे मोतीं, हिरे, माणकें इत्यादि मोलवान् वस्तूंप्रमाणेंच अत्यंत मोलवान् आहेत. आपण ज्याच्याशीं बोलत असूं त्याच्या व आपल्या अंतःकरणांतील समविचार असतील, तेवढेंच बेतानें व मजेनें बोलत बोलत काढून, कंटाळा येतोसें वाटलें कीं, वेळेवर तें बोलणें बदलून पुन्हा आपल्या भाषणांत गोडी लागेल असें करणें; एकदां एखादा विषय संपला, कीं आपण पुन्हां विषय मुळींच पुढें न आणतां कांहीं तरी नवीन विषय अगदीं सहजीं निघेल असें करणें आणि त्यांत आपल्याला कांहीं तरी नवें सांगतां येईल तर सांगणें; परंतु आपल्या ठिकाणीं अहंपणा तर बिलकुल दिसूं न देणें; किंवा आपल्याला कांहीं माहिती नाहीं, कांहीं नाहीं, असें त्याच्या मनाला वाटून वाईट वाटेल असें मुळींच होऊं न देणें; एकादे वेळीं आपल्या मित्राचें मत आपल्याला पसंत नसलें, किंवा एकादी गोष्ट असेल त्याच्यापेक्षां भलतीच वाटून त्यानें कांहीं सांगितलें तर त्याचें बोलणें चुकीचें आहे असें त्याच्या निदर्शनाला आणावयाचें असलें, तर तें फारच चातुर्यानें केलें पाहिजे. त्याच्या मनाला तर कांहीं वाटतां कामा नये. हें सांगणें फार कठीण आहे.

चार मंडळींत बसलें असतां उत्तम भाषण करून सर्वांस संतुष्ट करणें म्हटलें म्हणजे एक तर त्याला चांगलें सर्वविषयक ज्ञान पाहिजे. त्याच-

प्रमाणें सुंदर व योग्य शब्दांचा चांगला भरणा पाहिजे. तिसरें असें कीं बोलायच्या गोष्टी जरी नेहमींच्या परिपाठांतल्या अगदीं साधारण असल्या, तरी आकर्षक तऱ्हेनें लोकांच्या पुढें ठेवण्यास कल्पकता फार चांगली पाहिजे आणि मधुरता तर आवश्यक. त्याचप्रमाणें समयसूचकता हा एक गुण फार आवश्यक आहे आणखी अखेरची गोष्ट ही पाहिजे कीं, मनाचा निश्चय पाहिजे. मनाचा निश्चय नसल्याकारणानें पुष्कळांची संभाषणांत अगदीं फजिती उडते. त्याचप्रमाणें आपल्या बोलण्यांत वगैरे अतिशय साधेपणा पाहिजे. सोप्या शब्दानें काम होईल, तर कठिण शब्द भाषणांत कधींच येऊं देऊं नये. तुम्ही अमुक शब्द उच्चारलात याचा अर्थ काय हें कोणाला विचारण्याची पाळी आणूंच नये. आणि जें बोलायचें तें अगदीं सरळ परंतु अदबीनें बोलावें. 'घर' म्हणावयाचें सोडून "गेह, भुवन" किंवा 'गाय' म्हणण्याच्या ऐवजीं "गौः किंवा धेनु" असले शब्द योजूं नयेत. भाषासौंदर्य प्रत्येकाला सांपडणें कठिण. परंतु सरळपणा व साधेपणा सर्वत्रांस साध्य असतो. भाषणांत डामडौलीपणा असूं नये. अर्थ कसा अगदीं नेटका असावा. चांगला मन ओढून घेणारा बोलणारा असला तर कसलाही विषय असला तरी तो असे लोकांना गार करून सोडतो कीं बा! सारांश, उत्तम भाषण हें विषयावर किंवा शब्दांवर तादृश अवलंबून नाहीं; बोलणाऱ्याच्या गुणांवर आहे.

२५

## झोंपेबद्दल

झोंप ! झोंप म्हणजे आहे तरी काय ? कोणी म्हणतात, झोंप म्हणजे शरीरांत जी काय चालक शक्ति असते ती तात्पुरती मंद होणें. परंतु एवढें विवेचन दिलें म्हणजे काय होतें ? कांहींसुद्धां नाहीं. डॉ. विल्सन नांवाच्या एका शास्त्रज्ञानें झोंप लागणें म्हणजे काय याविषयीं असें लिहिलें आहे:-" जणूं काय हें जिवंत इंजन मंदावतें आणि आपल्या ठिकाणचा अग्नि अशा बेतानें सांठवून ठेवितें कीं, अगदींच थंड पडल्याप्रमाणें तर होऊं नये. नाड्या वगैरे चालून शरीरांतली शक्ति कायम राखण्यापुरतें त्यानें काम करावें. आतां शरीरांतील शक्ति कमी झाल्याकारणानें झोंप येऊं लागली म्हणजे शक्ति कमी होत जाते; यांतला कार्यकारणभाव कसा आहे हें मात्र सांगणें फार कठीण आहे. झोंपेच्या कारणाबद्दल नानाप्रकारच्या शास्त्रज्ञांनीं नानाप्रकारचीं तर्कविधानें केलीं आहेत, तीं सर्व पाहिलीं म्हणजे मनुष्यप्राणी आपल्याला घटकोघटकीं शहाणा शहाणा म्हणून नांवाजीत असतो, परंतु जो अनुभव त्यास रोज येतो, त्या अनुभवाबद्दलच ज्ञान त्यास यत्किंचित्सुद्धां नाहीं, याबद्दल हंसूं येतें. हें तर उघड आहे कीं, जागृतावस्थेंत मेंदूचें एकसारखें काम चाललेलें असतें. तें काम बंद पडण्याची वेळ आली, म्हणजे झोंपेचीं चिन्हें होऊं लागतात. मेंदूंत जी काय संहित शक्ति असते, ती सगळी जागृतावस्थेंत एकसारखी विचारांनीं, कल्पनांनीं, स्नायूंच्या चलनवलनानें खर्च होत असते. त्याचप्रमाणें आपण जें कांहीं पहातों, ऐकतों, हुंगतो, चाखतों अगर स्पर्शितों त्या सर्वांनीं डोळ्यांवर, कानांवर, नाकावर, जिभेवर व कातडीवर झालेले परिणाम म्हणजे अनुभव. त्यांचें जें ज्ञान तें मेंदूंत सांठविणें म्हणजेही त्या शक्तीचा खर्च करणेंच होय. अर्थात्च यामुळें

ज्ञानतंतूंचा फार मोठा खर्च होत असतो. जागृतावस्था ही म्हणजे अर्थात्‌च कर्तृत्वपरायण अवस्था होय. या अवस्थेंत संहित शक्तीचा ( Potential energy ) फार उपयोग होतो आणि तितकी ती पुन्हां शिलकींत तर राहात नाहीं. अर्थात्‌च कांहीं वेळानें थकवा येतो. असा थकवा आला, म्हणजे झोंपेचीं चिन्हें होतात. झोंप अर्थात्‌च जागृतावस्थेच्या अगदीं उलट. झोंपेंत मेंदू स्वस्थ असतो आणि तो स्वस्थ असल्यामुळेंच बहुतेक शरीरव्यापार ( जे मुख्यतः स्नायूंवर चालतात ते ) बंद पडतात. हें सगळें झालें, तरी पण झोंप येते कशी? झोंप म्हणजे काय वगैरेबद्दल अगदीं आदिम कारण कोणास कांहीं समजत नाहीं. झोंप म्हणजे एक स्वर्गांतून रोज मिळणारी देणगी असें कवि म्हणतो, पण शास्त्रदृष्टीनें पहातां या त्याच्या कल्पनेनें कांहीं कोणाचें समाधान होणार नाहीं. झोंप लागली म्हणजे निरनिराळ्या रसकोशांचें काम बंद पडतें. आणि सगळ्यांत विशेष ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं, शरीराच्या उष्णतेचें प्रमाण बदलत जातें. ६ वाजल्यापासून १० किंवा ११ वाजेपर्यंत शरीरांतली उष्णता जोरानें वाढत असते. पुढें उष्णता वाढते, पण वाढण्याचें प्रमाण कमी असतें. संध्याकाळीं ६ वाजेपर्यंत हें चालतें. पुढें उष्णता कमी कमी होत जाते. होतां होतां पहांटेस चार वाजण्याच्या सुमारास उष्णता अगदीं कमी होते. ( येथें हें सांगितलें तर वावगें होणार नाहीं कीं, सरदी होते किंवा सरदीनें फुप्फुसांत विकार होतो, ती वेळ बहुतकरून हीच असावी. झोंपेंत अस्वस्थपणा फार असला, तर मनुष्याचें पांघरूण कोणीकडच्या कोणीकडे जातें, आणि त्यावेळीं वारा बसला कीं थंडी हटकून होते.) याचवेळीं म्हणजे पहांटेस चार वाजतां नाडी अगदीं फारच हलके वहात असते. मेंदू अगदीं फिक्का होतो आणि गाजरासारखे लाल लोक सुद्धां अगदीं फिक्कट दिसतात. मृत्यूची कळा म्हणून जी असते, तिच्यासारखी झांक या वेळच्या कळेंत असते. परंतु ही सगळी माहिती जरी कितीही उपयोगी किंवा मौजेची असली, तरी आपल्या झोंपेच्या उद्भवासंबंधानें आपल्याला काय माहिती होते? सुषुप्तावस्था-झोंपेची अवस्था-म्हणजे शरीराची विवक्षित स्थिति

एवढेंच. शरीरांत खेळणारा जो आत्मा जागृतावस्थेंत इतका चंचल असतो, तो झोंपेंत कोठें असतो? त्याला स्वतःलाही झोंप लागते काय? त्याला विश्रांति हवी असते काय? मनुष्याच्या मानासिक व नैतिक शक्ति झोंपेंत कोठें असतात? त्यांचें काय होतें? स्वप्नें पडतात तीं कशीं? काळ आणि स्थळ यांनीं अबाधित असा जो आत्मा आजपर्यंत अनुभूत अशा लोकांत प्रविष्ट होतो कीं काय? किंवा आपण निरनिराळ्या वेळीं अनुभविलेल्या गोष्टी स्वप्नांत एकत्र होऊन त्यांचा विलक्षण संबंध जुळतो आणि कांहीं तरी एक विचित्रच देखावा दिसूं लागतो, या सगळ्याचें कारण काय? यांबद्दल विचार करितां मन अगदीं बुचकळ्यांत पडतें. परंतु आपले निरनिराळे अनुभव आपण पुन्हां पुन्हां अनुभवतों आहों असें आपणांस वाटतें तें झोंपेंतसुद्धां अर्धवट ज्ञान असल्याखेरीज नाहीं, हें उघड आहे. बरें, स्वप्न पडणारास केव्हां केव्हां भविष्यकाळीं घडणाऱ्या गोष्टी आधींच दिसतात त्याचें काय? जर भविष्यकाळच्या गोष्टी झोंपेंत दिसतात तर त्यावेळीं मनाची स्थिति कांहीं विलक्षणच असली पाहिजे असें म्हणावें लागतें आणि मेंदू विशेष प्रकारानें चंचल असला पाहिजे. पण मेंदू स्वस्थ असला तरच झोंप येते, असें विधान बहुतेक शास्त्रज्ञ करितात. तर मग मेंदू कितीही स्वस्थ असला, शरीर कितीही स्वस्थ पडलें असलें, तरी आत्मा त्यापासून अर्धवट मुक्त झालेला असतो. मूर्च्छेच्या अवस्थेंत त्याहून अधिक मुक्त असतो व मृत्यूच्या अवस्थेंत पूर्णपणें मुक्त असतो आणि पुन्हा त्या शरीरांत परत येतच नाहीं, असें म्हणावयाचें काय? या प्रश्नास अमोघ असें उत्तर देतांच येत नाहीं, आणि म्हणून 'माहिती नाहीं' असेंच म्हणत स्वस्थ बसावें लागतें.

## २६

### वसंतऋतु

काश्मिरांत जेव्हां वसंतऋतूस आरंभ होतो तेव्हां तेथील सृष्टीस जी शोभा प्राप्त होते तशी इतर ऋतूंत कोठेंही नसते. आकाश निरभ्र व निळें असतें तेव्हां त्याची शोभा किती मोहक असते म्हणून सांगावें ? त्याचा मनोहर रंग पाहून पाहणाराचें मन भक्तिरसानें दाटून जातें. सगळ्या वस्तूंस ज्याच्या योगानें नवीनपणा येतो त्याचे आभार मानावे तितके थोडेच असें वाटूं लागतें. वसंत हा शब्द किती गोड आहे ! जिकडे तिकडे झरे, कळया, फुलें, पक्षी यांची रेलचेल होते. तेव्हां सगळें गोडच गोड होऊन जातें. सूर्याचे किरण पडल्याबरोबर चोहोंकडे जिवाशिवाच्या भेटी होत आहेत आणि प्रेम व प्राणी यांचा नवीन प्रादुर्भाव होत आहे असें दिसूं लागतें.

त्या आनंदकारक वसंतसमयीं पक्षी इकडून तिकडे नाचूं लागतात. त्याप्रमाणें खेड्यांपाड्यांतून जंगली व डोंगरी लोक स्वच्छंदानें बाजारहाट करण्यास धांवूं लागतात. त्यांस पाहून एखाद्याच्या मनास जो आनंद होतो, जे आशा फलद्रूप झाल्याचे साक्षात्कार होतात, व पुढें होणाऱ्या गोष्टींचे जे इंद्रधनुष्यासारखे रंग दिसूं लागतात, त्यांचा अनुभव कोण सांगूं शकेल ? सृष्टींतील प्रत्येक वस्तूस मोहक रंग येतो.

सृष्टीस जणूं काय चित्रविचित्र रंगाची विशेष आवड आहे असं दिसतें. कुरणें व जंगलें पाचेसारखीं हिरवींगार होऊन चमकूं लागतात. फुलें हीं हिरे, माणकें, मोत्यें, इंद्रनील, पुष्पराग व याकुत यांच्या मुकुटाप्रमाणें झळकतात. रंग हें सृष्टीचे हंसें होय. जेव्हां ह्या रंगांची जास्त खुलावट होते तेव्हां त्यास सृष्टीचा परिहास म्हटलें तरी चालेल. हंसणाऱ्या सृष्टीचें चित्र रेखण्याकरितां वसंतऋतु हा जणूं फुलें उमलवितो.

हिंदु लोकांस भडक रंगाची व विशेषतः लालभडक रंगाची मोठी आवड आहे. जों जों उत्तर हिमालय–काश्मिराकडे वळावें तों तों फुलें चित्रविचित्र लाल व गुलाबी होत जातात; तशीं तिकडील माणसेंहि अधिकाधिक गौरवर्ण, गुलाबी-लाल होत जातात; ज्याच्या त्याच्या डोक्यावर इकडे लालभडक पगड्या व टोप्या पाहून साहेबलोकांस मोठी गम्मत वाटते व त्यांच्या रुचिहीनत्वाबद्दल ते त्यांची कधीं कधीं गम्मत-ही करितात. पण त्यांची ही रुचि इकडील सृष्टीच्या व्यवस्थेस अनुरूप आहे ह परक्यांस काय समजतें? इकडील निळ्या आकाशांत व काळ्या माणसांस लाल पोषाख जास्त खुलतात व काळ्या पोषाखापेक्षां लाल व पांढरे पोषाख ह्या उष्ण हवेंत जास्त सुखावह आहेत.

सृष्टीस लाल व पिंवळ्या रंगाची मोठी आवड आहे. तिचे पोषाख सतेज व चित्रविचित्र रंगांचे असतात. वसंत–तिला हिरवागार; ग्रीष्म तिला निळा, केशरी व कुसुंबी; वर्षा–तिला हिरवट ( पोपटी ) व हिरवा; व शिशिर–तिला पांढरा, पिंवळा, व गुलाबी ह्या रंगांचे पोषाख शिवून घालितो. ती नेहमीं रत्नजडित दागिन्यांनीं अलंकृत असते, तिच्या शिरोभागीं तारकारूप कोंदणांनीं युक्त नभोमंडळ असतें, तिच्या पाद-त्राणावर हिरे व मोत्यें ह्यांचा काशिदा असतो, आणि तिच्या मनगटा-वरील इंद्रधनुष्यरूप पोंचींत सात रंग चमकतात.

पुढें जिकडे तिकडे नंदनवन बनतें. आम्रवृक्षांस मोहोर येऊन त्याच्या परिमलानें हवा सुगंधित होते. कोकिलांचे ' कुऊ कुऊ ' आलाप वृक्षो-वृक्षीं ऐकूं येऊं लागतात. मधुमक्षिका आपलीं मधाचीं मोहोळें उंच झाडांवर बांधण्याचें काम सुरू करितात. जाई, जुई, मोगरी, मधुमालती, वगैरे वल्ली एकांत–कुंजवनें पाहून आपले ताऱ्याच्या आकाराचे हस्त हे सहकारादि वृक्षांच्या गळ्यांत घालितात व त्यांच्याबरोबर सूर्यप्रकाश भोगीत असतां आपले नूतन पुष्पगुच्छ जणूं काय त्या उपकारांचा मोब-दला म्हणून त्यांच्या नाकाशीं धरितात.

काश्मीर व हिमालय हें हिंदुस्थानचें नव्हे तर दुनियेचें नंदनवन होय. तेथील वसंताची शोभा काय वर्णावी? तेथील आजूबाजूचे गुलाबांचे

ताटवे सुंदर व सुगंधी फुलांनीं भरून जातात. महाराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्यावर नारळी पोफळी अनादिसिद्ध आहेत, त्याप्रमाणें तिकडे गुलाब अनादिसिद्ध आहेत. हिमालयावर गुलाब जंगलांत होतात. त्यांचीं तिकडे मैदानेंच मैदानें आहेत. दुनियेंतील कांहीं गुणी मनुष्यें रसिकांच्या अभावीं नांवारूपास न येतां जागच्या जागीं मरून जातात, त्याप्रमाणें तेथील गुलाब कोणी त्यांचा तिकडे आस्वाद न घेतां जागच्या जागीं कोमेजून जातात. कारण त्या पर्वतावर माणसांची वस्ती नाहीं. गुलाबांच्या झुडपांचा पसारा मोठा सुंदर असतो. त्यांच्या उभ्या लहान सकंटक दांडर्यांच्या बाजूस आडव्या फांद्या एकावर एक वांकलेल्या असतात. त्यांस कातरपानें मध्यें रुंद व शेवटीं अणकुचीदार असतात. त्यांच्यामधून निघालेल्या हिरव्या धुमाऱ्याच्या शेवटीं फिकट लाल फुलांचे गुच्छ असतात. गुलाबाचीं फुलें हीं गुप्ततेचीं चिन्हें आहेत. इंग्रज लोकांत उत्सवसमयीं खोलीच्या छतास गुलाबाचें फूल अडकवून त्याच्या सभोंवार पुढील अर्थाचा लेख लिहिलेला असतो:—

जो चहाड आमच्या चहाड्या करील
तो आमच्याच छपराखालीं मरेल.

त्या गुलाबाखालीं बसून जें बोलणें चालणें झालें असेल तें जो फोडील तो ‘ दोस्त ’ या नांवास अयोग्य आहे असें इंग्रज लोक पूर्वापार मानीत आले आहेत.

जंगलाच्या तारुण्यास कधींही खंड पडत नाहीं. तेथें सृष्टीचा देखावा भक्तिरस उत्पन्न करणारा असतो. कारली, कान्हेरी आदिकरून लेण्यांतील गौतमबुद्धाच्या मूर्तीप्रमाणें राष्ट्रदेवता छातीवर हात जोडून व मान सनम्र करून उभी असते. ज्यास सृष्टीजवळून भक्तीचा उपदेश घ्यावयास सांपडतो त्यासारखा सुखी पुरुष त्रैलोक्यांत मिळणें दुर्लभ होय !

एकादा मनुष्य जंगलाच्या दाट झाडीमधून फिरत असतो, तेव्हां वाहणाऱ्या नाल्यांचा आवाज जणूं त्याच्या कानांस सलामी देतो. हा धांवत्या पाण्याचा कर्णमधुर स्वर कधींही विराम पावत नाहीं. कारण तो सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत सर्वांस बोलावण्याचें काम करीत असतो.

याप्रमाणें त्रावणकोर, मलबार, कोंकण वगैरे प्रांतांतील समुद्रकांठच्या खेड्यांची वनशोभा मनोहर असते, तशी घांटमाथ्यावरील देशांत नसते; पण ती मुंबईसारख्या शहरांत अगदींच नसते असें नाहीं. हें सुंदर शहर सर्व हिंदुस्थानचें नाकें नव्हे, तर प्रत्यक्ष नाकच आहे. शिशिरवसंताच्या मधल्या काळांत गुलाबी थंडी पडते—तेव्हां अलिकडे पांच चार वर्षें येथें रोग उत्पन्न होतो—पण एरवीं या काळांत नेहमीं येथें वर्षांतील सुख-सर्वस्व नांदूं लागतें. यापूर्वीं सर्व पिकें निघतात व दुनियेंतील व्यापाराच्या देवघेवी धुमधडाक्यानें चालू होतात. रस्तोरस्तीं माणसें मुंग्यांप्रमाण वावरूं लागतात, गाड्यांखालीं पायांनीं चालणारीं बायकामुलें न चेंगरूं देण्याचें काम जागोजागा उभ्या राहिलेल्या पोलिसांस मोठें कठीण जातें. नारळींच्या वाड्यांतून सूर्यप्रकाशानें सुप्रकाशित झालेलीं व चित्रविचित्र रंगांचीं व आकारांचीं व सात सातताली अशीं अगणित घरें माण-सांच्या दाटीनें गजबजून जातात. तेव्हां अशा गर्दीच्या कलकलाटींतून मोरांचे टाहो, काकाकुवांचे भिन्न पशुपक्ष्यांसारखे हुबेहुब शब्द, चिम-ण्यांचें चिवचिंवणें, मैना वगैरे देशोदेशींचे पक्षी यांचे कूजितविशेष जसे ऐकूं येतात, तसे दुसऱ्या कोठें कानीं पडतात काय? व 'बॅकबे'वरील वाड्या, बागा, क्रीडाभुवनें, मैदानें, पायरस्ते, बाळवंटें यांवरील माणसांचे घोळके व थवे नेत्रांस क्षणभर रमवीत नाहींत काय ?

ह्या शहरचा दुसरा मोठा देखावा म्हटला म्हणजे माळिणी होत. उन्हाळा, पावसाळा, थंडी—कांहींहि ऋतु असो, मदनबाण, मोतिया, मोगरी, पारिजात, गुलाब, चांफा, कमळें वगैरे प्रत्येक रंगाच्या—ऋतु-परत्वें भिन्न फुलांच्या पाट्या भरून त्या सकाळीं रस्तोरस्तीं जिकडे तिकडे धांवत असतात व हार, तुरे, गजरे व वेण्या गिऱ्हाइकांस विकीत असतात. तीं सव फुलें त्या जवळच्या बगीच्यांतून आणतात. शिवाय कोठें पुणें व अहमदाबाद— येथून तीं भाजीपाल्याप्रमाणेंच आणितात.

खेड्यांप्रमाणें शहरांतही वसंत बहार करून सोडितो. विशेषतः वसंत-समयीं सर्व कांहीं नवें नवें होतें, तेव्हां सर्व प्राण्यांस नवीन हांव व हुरूप उत्पन्न होतो. म्हणून—

'ऋतूंमधें हा पहिला वसंत। वाटे जनाला बहुधा पसंत ॥'

२७

## अनुवंशिक सारखेपणा

हें सर्वांना माहीत आहे कीं, बापाच्या चेहऱ्याची साम्यता, ढब आणि गुणदोष मुलाच्या अंगीं येतात. तसेंच त्याचें व्यंग अगर खूण कांहीं तरी मुलाच्या अंगीं उतरते. तोंडवळणाची ठेवण आणि आवाजाचा सारखे-पणा देखील दृष्टोत्पत्तीस येतो. आपण एकाद्याच्या घरांत शिरतों, तेव्हां चेहऱ्यावरून घरांतील मंडळी अमुक म्हणून सहज ओळखतां येते. लहान मुलांचे चेहरे बहुधा आई किंवा बापासारखे असतात अथवा दोघांचें कांहीं तरी वैशिष्ट्य त्यांच्यांत दिसून येतें. या नेहमीं दिसून येणाऱ्या विषयाची मीमांसा विद्वानांनीं अजून पुरती केली नाहीं. तत्त्वज्ञान्यांना देखील ही मोठी विचार करण्यासारखी गोष्ट आहे. ग्रंथाधारें आणि स्वानुभवावरून जें आम्हाला याबद्दल माहीत आहे, तें आम्ही आज सांगणार आहोंत. कधीं कधीं मुलाची चहेरेपट्टी आणि अंगकाठी पूर्ण-पणें बापासारखी दिसते. कधीं बापासारखा फक्त चेहरा आणि बाकी डोकें किंवा इतर एखादा अवयव आईसारखा असतो. नुसता अव-यवाचा सारखेपणा असून उपयोग नाहीं, तर जर बापाच्या डोक्याला टेंगूळ असलें तर मुलाच्या डोक्याला असत, किंवा चालण्याची लबक हुबेहूब बापासारखी असते. जसा चेहऱ्याचा सारखेपणा तसाच आवाजाचाही असतो. जर गोविंदाचा सख्खा भाऊ गोपाळ याची व विष्णूची ओळख असली व गोविंदाचें आणि विष्णूचें कधीं भाषण झालें नसलें, पण जर गोविंदा आडबाजूला बोलत असला तर विष्णूला गोपाळच आहे असें वाटून तो गोविंदास भेटण्यास जाईल. यापेक्षां सारखे-पणा तो आणखी कोणता पाहिजे? मुलाची वागणूक पाहून तो बापाचा कित्ताच गिरवीत आहे असें वाटतें. मुलाचा बाप मेला आहे हें कुणाच्या

ध्यानीं येणार नाहीं. जणूं काय बापाचाच पुन्हां जन्म झाला ! चेहरा, आवाज, लकब, वागणूक इतकें साधल्यावर निराळा सारखेपणा शिल्लक रहात नाहीं. बापाच्या प्रकृतीचे परिणाम मुलांच्या ठिकाणीं येतात. एखादा रोग पिढ्यानपिढ्या चालू रहातो. दमा अगर क्षय जर बापाला असला तर मुलगा जन्मापासून खोकूं लागतो, किंवा पांढरा ( फिका ) दिसूं लागतो. त्या रोगाच्या भावनेचीं चिन्ह त्वरित दिसून येतात. असें पाहून असें वाटतें कीं, बापाची नक्कल मुलगा आहे. जरी एक चेहरा नसला तरी सारखेपणा दिसून यावा हें फार मौजेचें आहे. जरी बापासारखा मुलगा दिसून आला नाहीं तरी काका, मामासारखा तरी दिसेल; परंतु सारखेपणा राखील.

कित्येक वेळां असें होतें कीं, मुलाचा चेहरा आजोबा अगर पणजोबासारखा असतो. जरी बापासारखा नसला व एक दोन पिढ्या गळाल्या तरी घरांतील सारखेपणा नाहींसा होत नाहीं. पिढीजाद सारखेपणा बहुधा एकदम नष्ट होत नाहीं. त्याच्या अंगावर कांहीं विशेष खूण अगर डाग दिसून आला व तो पूर्वीं घरांतील मृत मनुष्याच्या ठायीं होता एवढें समजलें, कीं तो पोटीं आला असें मानून, त्या मृत मनुष्याचें नांव त्या मुलाला ठेवतात. तसें न केलें व मूल रडूं लागलें कीं शहाणी मंडळी वडिलांची नामावळी मूल उगें राहीपर्यंत पाठ म्हणूं लागतात. अशा तोडग्यानें नव्हे, आनुवंशिक सारखेपणानें तो मुलगा जगांत जन्मास आला असतो व ज्याचें त्याला नांव ठेविलें जातें, तशी कमीजास्त प्रमाणानें त्याची वागणूक दिसून येते. कित्येक वेळां असें दिसून येतें कीं, मुलाचा चेहरा बापासारखा आढळून येत नाहीं व आईसारखाही दिसून येत नाहीं, त्या वेळीं आपण मोठ्या बुचकळ्यांत पडतों; परंतु त्याच्या आईचे जे दुसऱ्या घराण्यांतील नातेवाईक असतात त्यांच्या चेहऱ्याशीं या मुलाची साम्यता असलीच पाहिजे हा धर्मच आहे. सृष्टीविरुद्ध इतकी या नियमाची सत्यता दिसून आली आहे. यावरून आपल्याला दुसरा एक नियम असा बांधतां येईल कीं ज्या ज्या ठिकाणीं चेहऱ्याची साम्यता दिसून येईल, त्या त्या ठिकाणीं

दूरचें कांहीं तरी पण नातें असलें पाहिजे, तें नाकबूल करणें म्हणजे घराण्याची माहिती नसण्यासारखें आहे. हें साम्य जसें चेहऱ्याचें असत, तसेंच तें गुणदोषांचही असतें. ज्याप्रमाणें चेहऱ्याचें साम्य आणि गुणदोषांचें प्रमाण वाढत जातें, त्याचप्रमाणें हळूहळूं सारखेपणाचा लोपही होत जातो. एकदां एका गृहस्थाचा भाऊ घरांतून फरारी होऊन परदेशीं जाऊन राहिला. तेथेंच त्यानें आपलें आयुष्य घालविलें; प्रपंच केला. पुढें बरेच दिवसांनीं वरील गृहस्थाचा मुलगा त्या देशीं गेल्यावर त्याची व फरारी झालेल्या मनुष्याच्या मुलाची गांठ पडली. अगोदर त्यांचा संबंध असावा अशापैकीं बोलणें झालें नाहीं. कामकाजाविषयींची भाषा झाल्यानंतर ते घराण्याची पूसतपास करूं लागले. तेव्हां अगदींच जवळचा संबंध निघाला. चेहऱ्यांच्या साधारण सारखेपणावरून अगोदर एकमेक एकमेकांला भाऊ समजले नाहींत, परंतु ओळख पटल्यावर सभोंवतालच्या प्रेक्षकांना आश्चर्य वाटलें. हे ठोकताळे बहुशः जमतात. प्रथम एकमेकांना जिवंत आहेत कीं नाहींत हें माहीत नव्हतें. यांचा एकमेकांशीं पत्रव्यवहार नव्हता, परंतु त्यांच्या या सहज भेटीनें सिद्धांत काढण्याचें एक कार्य झालें. ऐतिहासिक पुरुषाचें देखील असेंच आहे. बापापेक्षां मुलगा शूर आणि बाप दास तर मुलगा गुलाम अशी स्थिति दिसून येते. एकदां एक इंग्रज ग्रंथकार शेक्सपियरच्या गांवीं माहिती मिळविण्यासाठीं गेला. तेथे त्याची व एका शिक्षकाची भेट झाली. तो शिक्षक म्हणाला, "माझ्या वर्गांत शेक्सपियरच्या सातव्या पिढींतला मुलगा आहे." तेव्हां त्या ग्रंथकारानें त्या मुलाची चेहेरेपट्टी पाहिली, त्यांत त्याला एवढेंच दिसून आलें कीं, शेक्सपियरच्या डोळ्याशीं त्या मुलाच्या डोळ्याचें साम्य होतें. शेक्सपियरच्या प्रतिमेकडे पाहिलें आणि त्या मुलाचे डोळे पाहिले तर पूर्ण सारखेपणा दिसून येत होता आणि तो मुलगा कवीहून फार कमी पण पाणीदार होता. ग्रंथकाराचें निरीक्षण फार बारकाईचें असतें. एकजण वर्गांत बसून चालला होता, तेव्हां त्याच्या दृष्टीकडे पाहून ग्रंथकार आपल्या मित्राला म्हणाला, 'हा सर वुइल्यम वॉलेसचा भाऊ असावा.'

त्या मित्राला हंसूं आलें. तो म्हणाला, “ वुइल्यम वॉलेसचा नुसता फोटो पाहिला आणि बगींतला गृहस्थ पाहिला आणि दिलें नातें जोडून ! वुइल्यम वॉलेस काळा कीं गोरा हें माहीत नाहीं व फोटो खरा कीं खोटा हेंही माहीत नाहीं. बरें तपास तर करूं. ” तपासाअंतीं असें कळून आलें कीं, तो गृहस्थ स्कॉट देशांतील एक वीर होता व त्याचें वुइल्यम वॉलेसच्या घराण्याशीं लांबचें नातें होतें. ह्या सर्व गोष्टींवरून असें सिद्ध होतें कीं, आपलें शरीर जातें, पण मूर्ति व गुण कायम राहतात. एकजण म्हणतो कीं, ‘ एवढ्यावरूनच आत्मा अमर आहे असें म्हणतात.’ तरी प्रत्येकानें आपलें वर्तन शुद्ध ठेवावें, म्हणजे मुलाच्या अंगीं तेच गुण उतरतील. नाहीं तर त्याचा मूर्खपणा पिढ्यान्‌पिढ्या चालू राहील. जगांतील गुणांच्या उन्नतीला स्वतःच्या वागणुकीचा थोडा फार उपयोग झालाच पाहिजे.

२८

## मत्कुण-मीमांसा

कविश्रेष्ठ तुकारामाची "ढेंकणाच्या संगें हिरा जो भंगला" ही उक्ति प्रसिद्धच आहे. पण हिरा भंगविण्याचें सामर्थ्य ढेकूणबोवांचे अंगीं कितपत आहे याचा अनुभव मला नाहीं. तथापि निद्रा भंगविण्याचे सामर्थ्य याच्या अंगांत विलक्षण असून शय्यागारांत त्याला मज्जाव करण्याचे कोटकिल्ले मोठ्या शिताफीनें फोडून माणसाच्या रक्तापर्यंत आपली मजल पोंचविण्याचे कामीं याचें विलक्षण चातुर्य दिसून येतें. हा प्राणी लहान खरा, परंतु मोठा त्रासदायक असल्यानें त्याच्याबद्दल व त्याचा त्रास चुकविण्याबद्दलच्या उपायाबद्दल दोन शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

कोणच्या प्रकारची हवा व कोणची परिस्थिति ढेंकणांच्या वाढीस पोषक असावी याचा अद्यापि चांगलासा निर्णय झालेला दिसत नाहीं. कित्येकांच्या मतानें घाणेरडीं चिरगुटें, इतर घाणसाण व उष्ण हवा अशा परिस्थितींत ढेंकणांची वाढ झपाट्यानें होत असते. परंतु एवढींच कारणें निश्चित म्हणावींत तर इंग्लंडसारख्या थंड प्रदेशांतही ढेंकणांचा सुळसुळाट आढळून येतो. परंतु एवढी गोष्ट खरी कीं, बिछान्यांतली चिरगुटें स्वच्छ राखल्यानें ढेंकणांचें सर्वस्वी निर्मूलन जरी झालें नाहीं, तरी त्यांच्यापासून होणारा ताप बराच चुकवितां येतो. समुद्रकांठच्या हवेपेक्षां वऱ्हाड, पुणें इत्यादि घांटावरील हवेंत ढेंकणांच प्राबल्य जास्त आढळून येतें. पुणें व वऱ्हाड प्रांतांत विशेषेंकरून पुण्यांत माझीं बरींच वर्षें गेलीं—व सध्यां मी वापरीत असलेलें मत्कुणास्त्र माझ्या हातीं लागेपर्यंत या प्राण्यापासून मला अतोनात त्रास भोगावा लागला. जागेची व चिरगुटांची कितीही स्वच्छता ठेवा, विशिष्ट हवेची पोषकता मिळाली असतां या प्राण्यांची वाढ अतिशय होते. माणसामाणसांच्या रक्तांत

फरक असून साध्याच माणसांचें रक्त ढेंकूणमामास प्रिय असतें असें नाहीं. मी पुण्यांत असतां ज्या पलंगावर व खुर्चीवर घरांतील माणसें तासांचे तास गाढ निजत असत अगर निश्चल बसत, त्याच सुखासनावर पांच मिनिटें निजण्याबसण्याची माझी छाती नसे! शोधाअंतीं ढेंकूण त्यांच्या मुळींच वाटेला जात नसत असें मला समजून आलें. या प्राण्याची चाहुल हुडकून काढण्यांत माझें शरीर इतकें चपल ( Sensitive ) आहे कीं, ढेंकणाचा माझ्या अंगावरून प्रवास चालला असतां त्याच्या सूक्ष्म पायाचा स्पर्श मला समजतो; व अनेक वेळां अंधारांतही अंगावरील कपड्यांत शिरलेला ढेंकूण मीं अचूकपणें बाहेर काढलेला आहे. ढेंकणाच्या पायीं आठवड्यांचे आठवडे जागत काढून झोंप सांपडण्याकरतां या वाड्यांतून त्या वाड्यांत अनेकवार मला स्थलांतरें व पेठांतरें करावीं लागलीं व त्यांचा त्रास चुकाविण्याकारितां साधारणपणें माहित असलेले उपाय केले. विलायती दुकानांतून विकत मिळणारीं मत्कुणनाशक चूर्णेंहि वापरलीं, परंतु त्याचा म्हणण्यासारखा उपयोग झाला नाहीं. दुसरी एक ध्यानांत घेण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, ऋतुमानांप्रमाणें व हवेच्या आर्द्ररुक्षतेप्रमाणें ढेंकणांच्या चावण्याचें प्रमाण व तीव्रताहि कमीजास्त भासूं लागते. अनुभवानें असें समजून आलें आहे कीं, ढेंकणांचा समूळ नाश असा कधींच होत नाहीं. पलंगाच्या सांधीकोपऱ्यांतून असणारीं ढेंकणाचीं अंडीं spirit wine किंवा turpentine यानें मारलीं व जरी त्यांचा नाश झाला असें आपणांस वाटलें, तरी पूर्णांशानें असा त्यांचा बींमोड कधींच होत नसून पोषक परिस्थितीचें त्यांना खाद्य मिळतांच ऋतुकालीं त्या मृतवत् अंड्यांपासूनही ढेंकणांचा विस्तार व्हावयास लागतो! व यावरूनच ' ढेंकूण–मादी एका रात्रींत सात वेळां विते ' ही म्हण प्रचारांत आली असावी. वरतीं सांगितलेंच आहे कीं, रक्तारक्तांत फरक असून एका प्रकारचें रक्त ढेंकणांस फारच आवडतें. तें इतकें कीं, या माणसानें अंगांत घातलेला नुसता कपडा जरी खुंटीवर ठेवला असला तरी कांहीं वेळपर्यंत त्या कपड्याभोंवतीं ढेंकणाची टेहळणी चालूं राहील.

ढेंकणांचा त्रास चुकविण्याकरतां अनेक उपाय प्रचारांत आहेत त्यापैकीं मुख्य सांगतों. माझ्याप्रमाणें ढेंकणांच्या त्रासानें गांजलेल्यांस त्यापासून फायदा होईल अशी मला आशा आहे, तरी त्यांचा त्यांनीं अवश्य फायदा घ्यावा. चिरगुटें धुवून व जागा झाडून सारवून स्वच्छ राखावी, ही तर साधारण अवश्य गोष्ट होय. बिछान्यांत कोठें कोठें ढेंकण्या वापरण्याचा प्रचार आहे, परंतु यांचा उपयोग ढेंकणांचा नीमोड करण्याच्या कामांत फारसा होत नसुन उलट त्यांत राहण्याला ढेंकणांस सोईवार जागा मात्र सांपडते. पलंगाच्या पायांखालीं दगडी वाट्या पाण्यानें भरून ठेवाव्यात. परंतु या युक्तीचा उपयोग जोंपर्यंत पलंगांत ढेंकूण झाले नाहींत तोंवरच होतो. बिछाना जमिनीवर घातलेला असल्यास त्याच्या सभोंवार राखेचा कोट करण्याची चाल सुप्रसिद्धच आहे. जागेंत थोडेसे ढेंकूण असतां या युक्तीचा थोडासा उपयोग होतो खरा. परंतु ढेंकूण हा प्राणी इतका वस्ताद व हिकमती आहे कीं, तो उपासमारीनें चवताळला असतां माणसाच्या रक्ताचा माग काढीत काढीत भिंतीवरून कडीपाटावर चढून बरोबर खालीं निजलेल्या माणसाच्यासमोर येऊन रुधिरप्राशनार्थ त्याच्या अंगावर धाडकन् उडी टाकण्यास कमी करीत नाहीं! कापराची वडी एका पिशवींत घालून ती बिछान्यावर टांगली असतां ढेंकणापासून कांहीं काल बचाव होतो. पलंगांत ढेंकूण झाले असतां अगोदर त्याच्यावर एकादें पातळ धोतर पलंगाच्या चारी बाजूला हात पाऊण हात पडेल अशा बेतानें घालू., नंतर त्यावर बिन ढकणांचा बिछाना घालावा. धोतराच्या कांठापर्यंत पलंगांत ते ढेंकूण रक्ताच्या वासानें येतात, परंतु त्यांना उलट वळून वर चढतां येत नाहीं असा अनुभव आहे. Proof Spirit one pint ‡ Camphor or. 2 ‡ Oil of turpentine oa. 4 व Corrossive sublimate or. 1 या चार द्रव्यांचें मिश्रण करून पलंग, खुर्च्या इत्यादि ढेंकणांच्या वसतिस्थानास लावल्यास ढेंकूणबोवांचा बराच संहार होतो असा अनुभव आहे. तथापि हे सारे हंगामी व जुजबी उपाय आहेत व कालांतरानें मत्कुणराज या सर्व उपायांना दाद देईनासे होतात. मला एकच रामबाण

उपाय दिसतो व त्यालाच मीं मत्कुणास्त्र असें नांव दिलें आहे, हें मत्कुणास्त्र म्हणजे कापडाचा तुरुंग होय. ज्याला दिवसाच्या उद्योगानंतर रात्रीं सुखानें सात आठ तास अभंग निद्रा पाहिजे असेल त्यानें ढेंकणाच्या राज्यांत या मत्कुणास्त्राची कांस धरल्याशिवाय तरणोपाय नाहीं! सबब त्या अस्त्राची माहिती देऊन व त्याचा उपयोग करण्यास शिफारस करून मी मत्कुणमीमांसा संपवितों.

हा कापडी तुरुंग ऊर्फ ढेंकूणदाणी सिंगल किंवा डबल पाहिजे तितकी लांबरुंद करावी. हिला दोन प्रकारचें कापड वापरावें लागतें. आणि तें पांढरें वापरावें. ही सर्व बाजूंनीं शिवून एका बाजूला मात्र आंत जाण्याकरतां दोन अडीच फुट रुंदीचें तोंड ठेवून त्याला एक सोंड जोडावयाची. या सोंडेच्या शेवटीं वर्तुलाकार रीतीनं चढावयाला असतें त्याप्रमाणें एक उघड-मीट फीत अगर नाडी घालावी. या सोंडेच्या द्वारानें आंत जाऊन फीत आवळतांच ढेंकूणदाणीचें तोंड बंद होतें. ही ढेंकूणदाणी फार कुशलतेनें शिवावी लागते. शिवण्याचे सांधे असतील तेथें नुसती टीप न घालतां सुमारें पाव अंगुळ रुंदीची फीत लावून नंतर शिवावी. वरचा चांदवा व खालचा भाग यांना साधारण जाड कापड वापरावें. खालचा भाग नेहमीं अंगाखालीं वापरण्यांत येत असल्यानें पातळ कापडाचा असल्यास लवकर झागरून जाण्याचा संभव आहे व सर्वसाधारण टिकाऊपणा ढेंकूणदाणींत आणण्याकरतां चांदवाही जाड कापडाचा असणें जरूर आहे. ढेंकूणदाणीचे चारही बाजूचें कापड पातळ मलमलीवजा असावें; परंतु मच्छरदाणीच्या कापडाप्रमाणें जाळीदार नसावें. नाहींतर जाळीवाटे ढेंकूण आंत येतील. कापड जितकें पातळ असेल तितकें चांगलें. म्हणजे आंत निजणारास मुबलक खेळती हवा सांपडून उकाड्याचा त्रास होणार नाहीं. या ढेंकूणदाणीचा उपयोग पलंगावरील व जमिनीवरच्या दोन्ही बिछान्यांकडे करण्यांत येतो. मात्र थोडा फेरफार टांगण्याच्या बाबतींत करावा लागतो. तो कसा करावयाचा हें शिंप्याच्या व चाणाक्ष माणसाच्या तेव्हांच ध्यानांत येईल. चादर व पांघरावयाची बनात अगर गेटम् एवढीं

वजा करून सारा बिछाना नेहमींप्रमाणें तयार करावा. नंतर वर टांग-लेल्या ढेंकूणदाणीखालचा भाग गादी व सत्रंजी यांच्यामध्यें चारही बाजूंनीं दुमडावा, नंतर आंत जाऊन ढेंकूणदाणीच्या खालच्या कापडी भागावर चादर हांतरून तीही गादी व संत्रजी यांच्यामध्यें चोहोंबाजूंनीं दुमडावी. ढेंकूणदाणीच्या आंत चादर व पांघराबयाचें चिरगूट या-व्यतिरिक्त जास्त चिरगुटें ठेवूं नयेत व तींही नेहमीं स्वच्छ ठेवावीं. या रीतीनें ढेंकूणदाणीचा उपयोग केला असतां ढेंकणांचा त्रास अजि-बात नाहींसा होतो. मात्र सकाळीं उठतांच ढेंकूणदाणीच्या बाहेरच्या अंगानें वरच ढेंकूण मार्गप्रवेशाची टेहळणी करतांना आपणास आढळ-तील ! तवढे काढून टाकावेत म्हणजे झालें !

## २९

## टॉरपेडो

आजपर्यंत निरनिराळ्या ठिकाणच्या मनुष्यांनीं प्राणिमात्रास महाघातक खड्गादि लढाईचीं अनेक व नानाविध हत्यारें निर्माण केलीं आहेत. त्या सर्व हत्यारांत टॉरपेडो नामक अर्वाचीन हत्यार जितकें हिकमतीचें असतें तितकें दुसरें एकही हत्यार आढळत नाहीं. हें समुद्रांत बुडालेलें असतें. त्याचा स्पर्श येणाऱ्या जाणाऱ्या गलबतास झाला कीं, त्याच्या तात्काळ होणाऱ्या धडाक्यानें तें गलबत छिन्नविच्छिन्न होतें. त्यांत जुने नवे प्रकार बहुत आहेत व त परस्पर फार भिन्न आहेत. पण हल्लीं जपान व रशिया यांमध्यें जी मोठी आणीबाणीची लढाई जुंपली आहे तींत जपानच्या अमुक अमुक टॉरपेडोनें रशियाचीं अमुक अमुक लढाऊ जहाजें नष्ट किंवा नष्टप्राय केलीं असें म्हणतात, तेव्हां त्या बोलण्याचा इत्यर्थ म्हणून जो असतो तो एवढाच होय कीं, ते टॉरपेडो एक तर 'व्हाईट हेड्' नामक असावेत किंवा ते दुसरे ब्रेजेन नामक असावेत. व्हाईटहेड नामक टॉरपेडो ही झिलई दिलेल्या पोलादाचीं सिगारेटसारखीं किंवा मृदंगाच्या आकारासारखीं नळकांडीं असतात व त्यांच्या एका टोंकास लहान सुकाणें असतात व दुसऱ्या टोंकास कांहीं नियमित प्रमाणाची दारु भरलेली असते. ब्रेजेन नामक टॉरपेडो फारसे प्रसिद्ध नाहींत पण ते व्हाईटहेड नामक टॉरपेडोपेक्षां जास्त भयंकर असतात. ह्यांचा उपयोग मुख्यत्वेंकरून बंदरें व समुद्रकिनारे यांच्या संरक्षणाकरितां करितात. ह्या टॉरपेडोची युक्ति एका आस्ट्रेलियननें काढिली व ते करण्याचा सर्व हक्क त्यानें ब्रिटिश सरकारास विकला. तें सरकार हें ब्रेजेन नांवाचें टॉरपेडो सरकारी गौप्यापैकीं आहेत असें मानितें, त्याअर्थीं त्यासंबंधानें पुढें जें काय सांगितलें आहे त्यापेक्षां जास्त कांहीं एक

सांगतां येण्यासारखें नाहीं; हे टॉरपेडो हुकूमचंदे असतात. म्हणजे टॉरपेडोचें काम करणारानें टॉरपेडो लोटिला कीं, त्यास जोडिलेल्या तारेनें तो स्वतःच्या आधीन ठेवितां येतो. किनाऱ्यावर राहणाऱ्या मनुष्यास विजेच्या योगानें त्याचीं सुकाणें फिरवितां येतात. म्हणजे तो त्याच्या इच्छेनुरूप वागतो. आतां व्हाईटहेड व ब्रेनेन या टॉरपेडोंतील सांगण्यासारखा फरक म्हणून एवढाच होय कीं, व्हाईटहेड नामक टॉरपेडो सर्व लढाऊ जहाजांवर असतात, मग तीं जहाजें इंग्रजांचीं असोत किंवा इतर लोकांचीं असोत; पण ब्रेनेन टॉरपेडो फक्त इंग्रजांच्या जहाजांवर असतात व ते इतरांच्या जहाजांवर नसतात. गेल्या महिन्या दोन महिन्यापासून टॉरपेडोच्या पाण्याखालील लढाईविषयीं पुष्कळ गोष्टी आपल्या ऐकिवांत येत आहेत. या टॉरपेडोना हल्लीं व्हाईटहेड किंवा दुसरें कोणतेंहीं नांव द्या, पण त्यांस व्हाईटहेड हें जें मूळचें नांव प्राप्त झालें तें त्या नांवाच्या प्रथम तयार केलेल्या असल्या गलबतावरून पडले. हे टॉरपेडो मोठ्या चतुराईनें केलेले असतात. त्यांवर नाखुवा किंवा खलाशी नसतांही ते समुद्रांतील लहान सफरी बिनधोक करितात. त्यांस ह्या सफरी कांहीं यांत्रिक हिकमतीनें करितां येतात. त्यांचे पुष्कळ भाग असतात. त्यांतील पहिल्या भागांत दारूची सामुग्री असते, दुसऱ्यांत हवेची खोली असते व शेवटच्या भागांत तोल संभाळणारी खोली असते.

ह्या खोलीची योजना अशी केलेली असते कीं, तो टॉरपेडो पाहिजे तितके फूट खोल राहून धांऊं शकतो व त्याचा प्रवास सरल्यावर मर्जीप्रमाणें तो बुडून किंवा पोहत राहूं शकतो. लढाईच्या वेळीं या टॉरपेडोचा नेम चुकून ते शत्रूंच्या हातीं लागूं नयेत म्हणून ते नेहमीं बुडून राहूं देतात. व्हाईटहेड टॉरपेडोंना कित्येक हजार रुपये पडतात. म्हणून आरमार खात्यांस त्यांचा जपून उपयोग करावा लागतो. टॉरपेडो हे नळ्यांतून उडवितात पण ते उडविण्याची तऱ्हा गोळ्यांप्रमाणें नसते. ह्या व्हाईटहेड टॉरपेडोंच्या मागें ते लोटले जाण्याइतका टोला देतात. म्हणजे ते ‘ ट्रिपर ’ नांवाच्या पोलादी लहान खिळ्यानें उचलले जातात

व त्यांच्या योगानें त्यांचीं 'एन्जिनें' सुरू होतात. खिशांतील उत्तम घड्याळाची यंत्ररचना जशी व्यवस्थित पण गुंतागुंतीची असते, तशी त्या एन्जिनाची यंत्ररचना असते व तीं एन्जिनें दाबलेल्या हवेनें सगतिक होतात. प्रत्येक तासास दर्यांतील तीस मैलांप्रमाणें आठशें वारपर्यंत हे टॉरपेडो ढकलले जाण्याइतकी हवा त्यांतून असते. पूर्वी ह्या हत्यारांची गति स्वैर असे, म्हणजे ते नेमाच्या ठिकाणीं कधीं अचूक जात व कधीं जात नसत, पण त्यांत दैनंदिनगतिदर्शक यंत्राची योजना केल्यापासून टॉरपेडो हे चांदमारीवर किंवा निशाणावर नेमके मारितां येतात. नाश करणाऱ्या 'डिस्ट्रॉयर' व दुसऱ्या लहान गलबतांत सद्रहू टॉरपेडोच्या नळया पाण्यावर असतात. पण हे टॉरपेडो त्या नळयांतून निसटून जाण्यापूर्वी शत्रूकडून आलेल्या गोळयांनीं उडून धुमधडाका होण्याची भीति असते म्हणून तसल्या पाण्यावरच्या नळया मोठ्या घातक होत. कारण त्या धडाक्यानें गलबत व त्या गलबतावरील खलाशांची बहुत हानि होऊं शकते. बॅटलशिप व क्रूझरें नामक लढाऊ गलबतें ह्यांस पाण्याखालील नळया असतात. ह्या नळया संरक्षक 'डेक' नामक मजल्याखालीं अगदीं गलबताच्या तळाशीं असतात व त्या डेकवर जो मनोरा असतो त्यास असलेलें 'बटन' चेपून विजेच्या प्रवाहानें त्यास सरबत्ती देतात. त्यांतून पाण्याचा एक थेंबही गलबतांत येत नाहीं व पाण्यांतून वाहतांना ते टॉरपेडो गलबतानें उत्पन्न झालेल्या ओघांत सांपडूं नयेत म्हणून ते कांहीं अंतरापर्यंत मजबूत पोलादी कांबीवरून सरकत जाऊं देतात. ह्या कांबी नसत्या तर पाण्याखालील नळयांचा उपयोग मुळींच करितां आला नसता. कारण तेणेंकरून टॉरपेडोची मूळ गति भ्रष्ट झाल्यावांचून राहिली नसती. या टॉरपेडोंचा मारा मोठा घातक असतो, पण त्याचा उपयोग लढाईंत चांगला होईल कीं नाहीं ह्याबद्दल निवाडा नीट झाला नव्हता. फार तर काय पण दर्यांतील युद्धांत निपुण म्हणून नाणावलेल्या इंग्लंड देशांतील लोकही ह्या हत्याराच्या उपयोगीपणाविषयीं साशंक होते. कारण मागें एकदां त्यांच्या शहा नामक लढाऊ

गलबतानें पेरूव्हियाच्या हास्कर नामक लढाऊ बोटीचा नाश करण्याचा प्रयत्न केला होता, पण त्यांत त्यांस यश आलें नाहीं. पण ती शंका जपानच्या रशियाशीं समुद्रावर प्रस्तुत चाललेल्या युद्धानें निखालस दूर झाली आहे. कारण त्यास जो मोठा जय प्राप्त झाला आहे त्याचें मुख्य कारण हे टॉरपेडो होत. त्यांच्या योगानेंच जपानसारख्या एशियांतील एका अप्रसिद्ध राष्ट्रानें रशियाच्या एवढ्या मोठ्या आरमाराचा अगदीं धुव्वा उडवून देऊन पीत समुद्रावर जणूं त्या टॉरपेडोचा कीर्तिस्तंभ उभारून ठेविला आहे असें वाटतें ! आतां लढाईंत टॉरपेडोचा उत्तम उपयोग होईल हें निर्विवाद ठरलें. तेव्हां इतर राष्ट्रांतील लोकांचें ह्या हत्याराकडे जास्त लक्ष्य वेधून गेलें आहे. इंग्रज लोक आपले अधिकारी व खलाशी यांस जादा पगार देऊन आपल्या आरमारांतील टॉरपेडोंच्या उपयोगाचें नैपुण्य वाढवूं पहात आहेत. जुन्या टॉरपेडोच्या प्रकारांपैकीं ‘ आऊटरिगर ’ नामक टॉरपेडो फार प्रसिद्ध आहेत. त्यांत एका काठीच्या शेवटीं कापसाची एका प्रकारची दारू करून भरलेली असते. अशा काठ्या शत्रूच्या गलबताच्या तळाशीं रात्रीं नकळत नेऊन उडवाव्या लागतात. अमेरिकेंत जी मागें आपसांत लढाई झाली होती, तींत ह्या टॉरपेडोंचा उपयोग करण्यांत आला होता व त्यांचा उपयोग इंग्रजांच्या आरमारांत अद्यापही करितात. पण अलीकडे लढाईंत सर्चलाईट म्हणजे शोधक दिव्यांचा उपयोग करूं लागले आहेत म्हणून ते टॉरपेडो घेऊन शत्रूच्या गलबतापर्यंत नकळत जाणें मुष्किलीचें झालें आहे. म्हणून हे टॉरपेडो सर्वस्वी माजी पडण्याचा रंग दिसत आहे. आणखी एका प्रकारचे टॉरपेडो असतात त्यांस ‘ माईन्स ’ किंवा सुरुंग म्हणतात. त्यांस टॉरपेडो म्हणण्याची वहिवाट नाहीं.

## ३०

## दुष्काळ ! दुष्काळ ! ! दुष्काळ ! ! !


हें चवथें वर्ष ! दुर्दैव हात धरून आमच्या या दीन देशाच्या पाठीस लागलें आहे. सत्याण्णव सालीं दुर्मुख संवत्सरानें आपलें काळें तोंड आमच्याकडे केल्यापासून काळानें आपलीं भयंकर अशीं दोन रूपें घेऊन आमचा पुरा सत्यानास करण्याचा निश्चय केला व घातापातानें जो संहार करावयाचा, जो सत्यानास करावयाचा, तो जणूं काय काळाच्या मनाप्रमाणें झाला नाहीं म्हणूनच दुष्काळ महाराजांना पुन्हां त्यानें यंदाच्या सालीं पाठविलें. प्लेगानें काय प्राणहानि केली आणि वित्तहानिही किती झाली, किती घरें ओसाड पडलीं, किती कुटुंबें नष्ट झालीं, याचें वर्णन नव्यानें करायला नको. तें प्रत्येकाच्या दृष्टीस पडलें आहे; पुष्कळांच्या अनुभवास आलें आहे. मला वाटतें, या महाराष्ट्रांत असा एक कुटुंबी नसेल कीं, ज्याचा कोणी सगासोयरा, इष्टमित्र त्या दुष्ट रोगानें ओढून नेला नाहीं. असा कोणी असेल, तर त्यानें आपल्याला फार धन्य मानावें आणि परमेश्वराची थोर कृपा समजावी. प्लेगनें केलेला संहार जितका शहरांतून झाला, तितका खेड्यापाड्यांतून झाला नाहीं हें जणूं काय त्या दुष्ट काळाला खपलें नाहीं किंवा शहरांतल्या लोकांचे बळी इतके घेतले तरी त्याचा कधीं न विझणारा जठराग्नि शांत झाला नाहीं, म्हणूनच त्यानें धष्टपुष्ट अशा शेतकऱ्यांचे व त्यांच्या गुरांचे बळी घेण्याचा ठराव करून या दुष्काळरूपी अजस्र अजगराला महाराष्ट्राचा पक्का समाचार घेण्याला पाठविलें. दोन वर्षांपूर्वी त्यानें बजावलेली कामगिरी अपुरी झाली असें वाटूनच कीं काय त्यानें पृथ्वीवर येण्याच्या पूर्वी पूर्वसामग्री म्हणून सगळ्या ढगांतलें पाणी शोषून घेतलें ? अर्थातच पावसानें ' आ ' वांसला आणि सर्व प्राणिमात्रास तेंच

करण्यास लाविलें. तेराव्या शतकांत एकसारखीं बारा वर्षें अनावृष्टि होऊन दुर्गादेवीनें महाराष्ट्रास उजाड करण्याची वेळ आणली; तशाच प्रकारची स्थिति पुन्हां आमच्या या दुर्दैवी देशावर येते कीं काय अशी भीति वाटून प्रत्येक मनुष्याचा थरकांप होतो आहे. दुष्काळव्याळानें आपलें प्रचंड व लांब असें शरीराचें वेटोळें बहुतेक सगळ्या महाराष्ट्राच्या सभोंवतीं व गुजराथ, राजपुताना वगैरे प्रांतांच्या सभोंवतीं घालून आपल्या अंगीं जितकी म्हणून ताकद् असेल तितकी एकवटून रगडण्यास प्रारंभ केला, आणि सगळ्यांचीं हाडें अगदीं मोडून टाकलीं. आपल्या पोटाच्या खाईंत हजारों गरीबगुरींबांचे बळी घेतले आहेत. खेडींचीं खेडीं उठवून लावलीं. ज्यांनीं पन्नास पन्नास वर्षांत आपला गांव सोडला नाहीं, त्यांस आपल्याजवळ काय होतें नव्हतें तें विकून टाकून देशोधडीला जावें लागलें. नवऱ्यांनीं बायका टाकून फुटेल ती वाट सुधारली. बायकांनीं नवरे सोडण्याचें दुष्कर कृत्य करण्यापयत आपल्या मनाची तयारी केली. पोटचीं पोरें भुकेनें मरतात, त्यांचे हाल पहावेनात म्हणून त्यांची सोय करणारांना तीं देऊन टाकलीं, आणि त्यांच्या बदली आपल्या पोटास मागून घेतलें. मुलांच्यापेक्षांही ज्यांच्यावर शेतकऱ्यांचा लोभ, तीं गुरेंसुद्धा विकण्याचा प्रसंग येऊन मन घट्ट करून तीं विकून आपलें व आपल्या कुटुंबाचें पोषण करण्यापर्यंत पाळी आली. चांगल्या काळीं जो शेतकरी धर्माचा एक रुपया घ्यायचा नाहीं, कोणी घे म्हटलें तर ज्याला राग यायचा तो आतां आपला गांव सोडून पन्नास कोसांवरल्या एकाद्या गांवीं जाऊन "बाई भाकर घाला हो गरिबाला!" असें म्हणत हिंडतो आहे. कोणी एक कवडी दिली कवडीच! उष्टीमाष्टी भाकरी टाकली भाकरीच!! अशी स्थिति झाली आहे. शहरांतून तर अशी स्थिति झाली आहे कीं, उष्ट्या पत्रावळी टाकायला बाहेर येण्याचा अवकाश, ज्या उष्ट्या पत्रावळींकडे कुत्रींसुद्धां ढुंकून पहायचीं नाहींत अशा पत्रावळींवर पांच पंचवीस भिकाऱ्यांची झुंड पडावयाची आणि शितें वेंचून खाण्याबद्दल त्यांच्यात्यांच्यांतच मारामारीला सुरवात व्हावयाची. परंतु शहरांत राहणाऱ्या


आम्हांला खेड्यापाड्यांतल्या खऱ्या दुष्काळग्रस्तांची काय कल्पना येणार? अन्नामुळें त्यांस भिक्षा मागण्यापेक्षां मरण बरें असें वाटतें. तसें नुसतें वाटतच नाहीं, तर तें आलें तरी, कोणाच्या दाराशीं तोंड म्हणून वेंगाडायचें नाहीं असा ज्यांचा कृतनिश्चय त्यांच्या खऱ्या स्थितीची कल्पना आपणां शहरवासी लोकांना कशी येणार? जें काय होईल तें झांकल्या पाठीनें घरांतल्याघरांत मुकाट्यानें सहन करून आज एका भाकरीवर तर उद्यां पाऊण, परवां अर्ध्या, तेरवां पाव भाकरीवरच आपली भूक निवनून किंवा निवली असें खोटेंच समाधान करून घेऊन दिवस मारून नेण्यासाठीं धडपड करणारे व त्याबरोबर आपल्या जीवासही हळूहळू मारणारे अन्नदार शेतकरी आपल्या कुटुंबासकट कसे लयाला जातात याची कल्पना दूधसाखर खाऊन राहणारांना कशी होणार? शेतांत काम करून आपल्या कमाईची भाकरी खाणारे अल्पसंतुष्ट शेतकरी किती सशक्त व कसदार असतात? त्यांचीं शरीरें पुष्ट नसलीं तरी किती पीळदार असतात! चेहऱ्यावर शक्तीचें व आरोग्याचें तेज कसें दिसतें? परंतु आपला अन्नदाता जो पाऊस तो वेळेवर आला नाहीं कीं, त्यांचीं तीं प्रफुल्लित व सतेज मुखें कोमेजून फिक्कीं पडूं लागतात. त्यांची तुष्टता जाऊन त्यांच्या चर्येवर आपलें, आपल्या गुराढोरांचें, बायकामुलांचें कसें होणार याची काळजी दिसूं लागते. पावसानें पुरी निराशा केली कीं, सावकाराचें कर्ज फिटण्याची आशा नाहींशी होऊन सावकार त्रास देऊं लागतो. इकडे सरकार देणें देण्याला कोणी कर्ज देत नाहीं आणि दाणे संपल्यामुळें खाण्याची भ्रांति पडूं लागते. मग एक एक गाय, बैल बाजारांत नेऊन उभा करण्याचा प्रसंग येऊन त्याप्रमाणें सगळ्यांस मुकून आतां विकायला कांहीं नाहीं असें होतें. इकडे काळजीनें त्याचें शरीर व त्याच्या कुटुंबाचीं शरीरें अर्धीं अधिक कृश होऊन एकमेकांस एकमेक नकोशीं होऊं लागतात. अर्थात्‌च धरवेल तितका धीर धरून नंतर तोही संपला कीं, त्यांतल्या त्यांत शक्ति असेल त्यांना लाज, अन्न एकीकडे सारून कोठें कंगालखान्याची अगर रिलीफ कामाची वाट धरावी लागते. कोणच्याही

दुष्काळानें ग्रासलेल्या प्रांतांत जा. शेतकरी व मजूर आणि इतर कामकरी लोक यांची ही कथा. या लेखांत दुष्काळानें पिळून टाकलेल्या लोकांचीं पांच चित्रें दिलीं आहेत, तीं गुजराथेंतला दुष्काळ किती भयंकर आहे, तेथें मनुष्यांची प्राणहानि किती होत आहे हें पाहण्यासाठीं गेलेल्या रा. इंदुलाल चुनिलाल व रेवरंड मि. होटल यांनीं कृपा करून आम्हांस दिलेल्या फोटोग्राफवरून लांकडावर हुबेहूब कोरून छापलीं आहेत. जणूं काय अनुक्रमानेंच दिलीं आहेत. खायाला मिळेना, अर्धवट सुद्धां पोट भरेना, अशा स्थितीला सुरुवात झाली म्हणजे काय स्थिति होते ती पहिल्या दोन चित्रांवरून स्पष्ट दिसते आहे. याच्यापलीकडली स्थिति तिसऱ्या चित्रांत पहावी. बिचाऱ्यांचीं हाडें आंत आणि कातडें वर एवढींच्च कायतीं राहिलीं. जागचें हलवत नाहीं, नुसतें बसवत सुद्धां नाहीं, किंवा बसल असल्यास पडूं म्हटलें तर तेवढें करण्यास सुद्धां अंगांत त्राण नाहीं! या स्थितीच्याही पलीकडे गेलें म्हणजे बिचाऱ्याच्या हालांचा शेवट होऊन प्राण कुडीला सोडून जातात. हीं नुसतीं चित्रें पाहून मी लिहितों आहें, तर माझ्या अंगावर शहारे येत आहेत, लेखणी ठेऊन द्यावीसें वाटतें. परंतु गुजराथेंत या दुष्काळाला महामारी वगैरे साथीदारांनीं अगदीं मनोभावानें मदत करण्याचा निश्चय केला असल्यामुळें कित्येक ठिकाणीं प्रेतांचा खच पडलेला असून (चित्र पांचवें पहा) त्यांना जाळण्याची तजवीज काय करावी याचीच अधिकाऱ्यांस मोठी पंचाईत पडते. गुजराथेंत गोध्रा मुक्कामीं एका कामावर दुष्काळानें व कॉलऱ्यानें इतका संहार केला कीं, चार दिवसांत १५०० प्रेतें जाळावीं लागलीं; दुसऱ्या एका ठिकाणचें असें वर्णन आलें होतें कीं, माणसें रस्त्यावरून मरून पडत असून त्यांस कोल्हीं कुत्रीं ओढूं लागलीं, तरी हात उचलून निवारण करण्याची ताकद नाहीं! आमच्या चौथ्या चित्रांतलीं माणसें अशाच प्रकारच्या स्थितींत असलीं पाहिजेत! माणसांनीं माणसांचें मांस खाऊन पोट भरल्याचीं उदाहरणें अजून कोठें यंदा ऐकिवांत नाहींत, परंतु ९७ सालच्या दुष्काळांत व ७७ सालच्या दुष्काळांत तशीही उदाहरणें घडलीं होतीं. या दुष्काळाचे किती भयंकर परिणाम

## दुष्काळ ! दुष्काळ !! दुष्काळ !!!



चित्र पहिलें




चित्र दुसरें



चित्र तिसरें



चित्र चवथें

होतात ! प्राणहानि आणि वित्तहानि तर होतेच होते, परंतु मनुष्याच्या दानतीचीसुद्धां हानि होते. जे गरीब लोक कधीं कोणाच्या कवडीलासुद्धां हात लावावयाचे नाहींत, ते चोऱ्या करण्यास प्रवृत्त होतात. जे कधीं



चित्र पांचवें

अभक्ष्य भक्षण करावयाचे नाहींत, ते अगदीं गलिच्छ असें अन्नही खाऊन आपला प्राण वांचवितात. पुराणकथा जाणणारांना विश्वामित्राची कथा ठाऊक असेलच. विश्वामित्र ऋषि म्हणजे असा तसा नव्हे, परंतु एके वेळीं दुष्काळ पडला, कोठही कांहीं अन्न मिळेना. वृष्टिच नसल्यामुळें कंद, मुळें, फळें कोठलीं ? शेवटीं माणसें माणसांना खाऊं लागलीं, तेव्हां नाइलाज म्हणून प्राणरक्षण करण्यासाठीं कोठें कांहीं सांपडेल तर पहावें म्हणून ऋषि एका खाटकाच्या घरांत शिरून तेथें मारलेल्या एका कुत्र्याची तंगडी चोरीत असतां त्यास खाटकानें पकडलें ! यंदाचा दुष्काळ विश्वामित्राच्या वेळच्या दुष्काळाप्रमाणेंच खरोखर भयंकर होय. गुजराथ म्हणजे कसला सुपीक प्रदेश ! तेथें आज कित्येक शतकांत दुष्काळ ठाऊक नाहीं. पण यंदा त्यानें जणों काय त्या सर्व शतकांचा सगळा वचपाच काढण्याचा निश्चय केला आहे !

या दुष्काळानें ग्रासलेल्या लोकांस सरकार तर अगदीं जीवाभावानें मदत करीतच आहे. आज कांहीं नाहीं तरी ६१,०१००० एकसष्ट लाख लोक दुष्काळ कामावर काम करून अन्न खाऊन आपला जीव तगवीत आहेत. हा दुष्काळ मुंबई इलाख्यांत, मध्यप्रांतांत, पंजाबांत, राजपुतान्यांत, वऱ्हाडांत सगळीकडे पसरलेला आहे. सरकारास या दयेच्या कामीं हातभार लावण्यासाठीं आमचे श्रीमंत लोक मदत करीत आहेत यांत तर नवल नाहीं, पण इंग्लंड, जर्मनी, अमेरिका वगैरे परदेशांतूनही अनेक प्रकारची मदत येत आहे. अमेरिकेनें नुकतेंच एक जहाज भरून धान्य पाठविलें. याप्रमाणें सर्व लोक आपापल्या परीनें आम्हांस मदत करीत आहेत आणि या ईश्वरी कोपांतून निभावून नेत आहेत. सध्यां तर आम्ही आकाशांतील ढगाकडे उत्कंठेनें

> आकिंचन कृषीवलां मिळुनियां तगाई–धनें
> तसें वृषभ, बीज हीं कृषि करावया साधनें ।
> फिरोनि अपुल्या शिरीं गरम घोंगड्या घालुनी
> स्वकर्मरत ते असे कधिं बघेन शेतांतुनी ॥

असाच कवीबरोबर टाहो फोडीत आहोंत !

## ३१

## कार्तिकस्वामी

प्रत्यक्ष वेदांत ज्या देवता प्रधान म्हणून पूजिल्या आहेत, त्यापुढें पौराणिक कालीं पुराणांतून अगदीं-किंवा बऱ्याच-अप्रधान मानल्या जाऊन त्यांचे जागीं नवीन देवतांस प्रधानत्व प्राप्त झालें. ऋक्संहितेंतील मुख्य देवता अग्नि, इंद्र, वरुण, वायु इत्यादि होत. परंतु पुढें पुराणांतून विष्णु, शिव, ब्रह्मदेव आणि पहिल्या दोन देवतांचे अनेक अवतार यांचेंच माहात्म्य फार वर्णिलें गेलें. आजमितीस आम्ही वैश्वदेव केल्या-खेरीज, म्हणजे अग्निदेवतेस आहुति दिल्याखेरीज जेवावयास बसत नाहीं, तरी पण आमची पूज्य देवता कोण म्हणून कोणीं विचारल्यास, विष्णु किंवा शिव या दोहोंपकींच बहुतकरून नांव घेतों. या दोन देव-तांच्या बरोबरीनेंच किंबहुना कांहीं लोकांत कांकणभर जास्तच ज्याचें माहात्म्य वाटतें असा आणखी एक तिसरा देव आम्ही फार पूज्य मानतों. तो देव गणपति होय. हा सर्व कार्यांचा अधिष्ठाता. याच्या कृपेवांचून कोणतेंही कार्य शेवटास जाणार नाहीं अशी आमची दृढ समजूत; व आमच्या कोणच्याही कार्यांत श्रीगणेशाची आम्ही आधीं पूजा करतों तेव्हां पुढें कार्याच्या मंगलास प्रारंभ करतों. ही ‘ गणेश ’ देवता ज्या रूपानें आम्ही पूजितों व हिला जें स्थान आम्ही देतों, त्या रूपानें आणि त्या स्थानीं अधिष्ठान दिलेली अशी ही देवता वेदांत-ऋग्वेदांत नाहीं. जशी ही देवता नाहीं तशीच ‘ कार्तिकस्वामी ’ किंवा ‘ कार्तिकेय ’ ही देवताही ऋग्वेदांत नाहीं. ऋग्वदांत ‘ गणपति ’ ‘ ब्रह्म-णस्पति ’ म्हणून एक देवता आहे, ती देवता आमच्या हल्लींच्या ‘ गण-पति ’ देवतेची मूळ देवता अशी साधारणतः समजूत आहे; परंतु या ‘ गणपति ’ देवाला शंकरपार्वतीचा पुत्र म्हटला आहे ती सर्व पुढली रचना होय. कार्तिकस्वामीची उत्पत्ति पाहूं गेलें असतां त्याच्या

'संभवा'ची कथा जशी पुराणांत सांपडते, तशा उत्पत्तीची देवता ऋग्वेदांत नाहीं. वेदांत एक सप्तवधू आख्यान आहे; त्या आख्यानावरून पुढें कार्तिकेयाची कथा निघाली असावी असा कित्येक पंडितांचा तर्क आहे. सप्तवधू आख्यानांत एवढेंच आहे कीं, ऋषीस सात वधू असूनही त्यास पुत्र झाला नाहीं, तेव्हां कोणी भारत राजानें त्या ऋषीस एका नौकेंत घालून समुद्रांत कोंडून ठेविलें. पुढें 'यथावाता' हा मंत्र म्हणून त्यानें आपली मुक्ति करून घेतली. गर्भिणी स्त्रियांची प्रसूति निर्विघ्नपणें व सुलभ व्हावी, म्हणून हा मंत्र म्हणतात. या मंत्राच्या अंगीं तसें करण्याचा प्रभाव आहे अशी समजूत आहे. या सप्तवधू आख्यानावरून पुढें 'षडानना'ची कथा उत्पन्न झाली अशी कित्येक आधुनिक वेद-कोविदांची समजूत आहे. परंतु कित्येकांस तसें वाटत नाहीं. त्यांच्या मतें अग्निदेवतेलाच पुढें स्वरूपांतर मिळून 'कुमार' 'कार्तिकेय' ही देवता अस्तित्वांत आली.

वेद म्हणजे मंत्रसंहिता व ब्राह्मण. मंत्रसंहिता म्हणजे मूळ वेदमंत्राचा समूह व ब्राह्मण म्हणजे त्या मंत्रांचा कोठें कसा उपयोग करावयाचा याची माहिती देणारा व तत्संबंधीं पूर्वींच्या कथा सांगणारा ग्रंथ होय. मंत्र व ब्राह्मण मिळून वेद. प्रत्येक संहितेच्या शाखेला एकेक ब्राह्मण आहे. वेद चार व त्याच्या शाखा अनेक. ऋग्वेदाची शाखा सध्यां एकच अस्तित्वांत आहे. त्या शाखेच्या ब्राह्मणास ऐतरेयब्राह्मण म्हणतात. त्याचप्रमाणें यजुर्वेदाच्या शाखा हल्लीं दोन आहेत. एक तैत्तिरीय शाखा आणि एक माध्यंदिन शाखा. या दोनही शाखांस त्यांचे ब्राह्मण आहेत. माध्यंदिन शाखेच्या "शतपथ" नांवाच्या ब्राह्मणांत कार्तिकस्वामीच्या उत्पत्तीचें मूळ आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे; आणि तें सयुक्तिक आहे असें वाटतें, म्हणून वर दिलेली माहिती आधीं दिली आहे. या ब्राह्मणांत अग्नीला अनेक नांवें आहेत. तीं नांवें अग्नीच्या भिन्न भिन्न गुणांवरून दिलेलीं आहेत. भव, भैरव, रुद्र अशीं हीं नांवें या ब्राह्मणांत अग्नीला दिलेलीं आहेत. त्यांत "कुमार" हें एक नांव आहे. परंतु कार्तिकेय कुमाराची जी कथा

आहे ती कथा कोठेंही अंशतःसुद्धां उल्लेखिलेली नाहीं. किंबहुना अशी देवता वेदांत आहे किंवा होती असें म्हणण्यास किंचितही प्रमाण आढळत नाहीं. त्याचप्रमाणें बौद्ध ग्रंथांतून पहावें, तर त्यांतहि जुन्या बौद्ध ग्रंथांतून या देवतेचें नांव नाहीं. पुढें पहावें तो पतंजलीच्या महाभाष्यांत एक थोडासा परंतु फार महत्त्वाचा उल्लेख आढळतो. तो उल्लेख कैयटाच्या टीकेप्रमाणें समजावून घेतल्यास असें दिसतें कीं ‘ देवल ’ या नांवाचे प्रसिद्ध असे कोणी ग्रामयाजक ‘ स्कंद, विशाख ’ इत्यादि देवतांच्या लहान लहान मूर्ति करून विकतात व त्यांच्या पूजेचा प्रसार व्हावा म्हणून खटपट करीत आहेत. मनुसंहितेंत या देवतांस अगदीं त्याज्य असें वर्णिलें आहे. यावरून असें दिसतें कीं, “ स्कंद ” या देवतेच्या पूजेचा प्रचार या काळीं उच्च वर्णांत जरी नसला तरी खालच्या वर्णांत तरी पडत चालला असावा.

पुढें महाभारत व रामायण हें ग्रंथ पाहिले तर, कार्तिकेयाचा उल्लेख त्यांतून स्पष्टपणें आहे. महाभारत व रामायण हे ग्रंथ म्हणजे स्वतंत्र असे पुराणग्रंथच होत. या पुराणांतून वैदिक कथा आल्या असल्या तरी त्या अगदीं भिन्न स्वरूपानें वर्णन करून दिल्या आहेत. तेव्हां प्रथम आपण महाभारतांत कार्तिकेयाच्या संबंधानें काय लिहिलें आहे तें पाहूं. महाभारताच्या वनपर्वांत अध्याय २२१ पासून २३१ पर्यंत कुमार कार्तिकेयाचा संभव कसा झाला, त्यानें कार्य काय केलें व त्याचें माहात्म्य काय याचें वर्णन आहे. त्याचे पूर्वी १९९ अध्यायापासून २२१ अध्यायापर्यंत आंगिरसाच्या उपाख्यानांत अग्नीचें माहात्म्य व त्याच्या वंशाचें विस्तारपूर्वक वर्णन करून सांगितलें आहे. त्यानंतर मार्कंडेय–कार्तिकेयाचें वर्णन आहे. या दहा अध्यायांत जें काय आहे, त्याचा थोडासा गोषवारा येथें देतों.

असुरांनीं जेव्हां देवांशीं युद्ध आरंभिलें, तेव्हां एकदां देवांचें सैन्य अगदीं निःस्तब्ध करून सोडलें. आणि केशी नांवाच्या असुरानें त्यावेळीं देवांत शिरून देवसेना नांवाची एक सुंदरी हरण करून नेली. इंद्रानें त्या सुंदरीला पुनः परत आणलें. या सुंदरीनें असें सांगितलें कीं,

आपली बहीण दैत्यसेना हिला दैत्यांनीं अशीच पळवून नेली आहे. पुढें देवसेनेनें आपणांस कायमचा रक्षण करणारा पति मिळावा म्हणून देवांची प्रार्थना केली. इंद्र व ब्रह्मा यांनीं पाहूं म्हणून तिला आश्वासन दिलें.

इतक्यांत इकडे असें झालें कीं, अग्नीला त्याची पत्नी 'स्वाहा' म्हणून होती तिच्यापासून तिनें सहा ऋषीपत्नींचीं रूपें घेतलीं असतां एक पुत्र झाला. त्या पुत्राचें नांव 'कुमार' असें तिनें ठेविलें. यासच स्कंद असेंही म्हणत. हा फारच मोठा बलवान् व प्रतापी उपजला. याचें वाहन "कुक्कट" होतें, मयूर नव्हे. हा इतका बलवान् कीं, शिवाचें शौर्य प्रचंड धनुष्य तव्हांच उचलून वांकवी. असला बलवान् उपजतांच इतकें वीर्य दाखविणारा पुत्र जगल्यास सगळ्या त्रिभुवनाला पादाक्रांत करील असें मनांत घेऊन मातृकागणांनीं (ज्यांस सटवाई म्हणतात, त्याच या होत) याचा नाश करण्याचें मनांत आणलें. परंतु त्यांनीं याला प्रत्यक्ष पाहिलें, तेव्हां याच्यावर त्यांचें प्रेम जडून त्यांनीं याचें पुत्राप्रमाणें रक्षण करण्याचें ठरविलें व हातांत शूल घेऊन त्यांनीं त्याचें बाल्यांत रक्षण केलें. इतकेंच नव्हे तर रक्तसागर-कन्या "शोणितभोजना" (रक्त हेंच जिचें खाणें आहे अशी) हिनेंही त्याचें रक्षण केलें. इंद्राबरोबर या स्कंदाचें फार घोर असें युद्ध झालें. त्या युद्धांत इंद्रानें आपलें वज्र याच्या अंगावर मारलें; तेव्हां त्या अंगांतून विशाख, वगैरे अनेक पुत्र व कन्या उत्पन्न झाल्या. या सगळ्या परिवारामुळें या देवतेस कुमारपिता असेंही एक नांव मिळालें आहे.

असें जेव्हां या अग्निकुमाराचें बल व शौर्य पाहिलें, इन्द्रादिकांसही जेव्हां असें कळलें कीं, आपल्या वज्रादिकांचें याजवर कांहीं चालत नाहीं, तेव्हां ते त्याला पूज्य मानूं लागले; महादेव व पार्वती यांनीं त्यास पूज्य मानिलें. मागें एकदां वर सांगितलेंच आहे कीं, अग्नीला 'रुद्र' ही संज्ञा आहे. अर्थात् रुद्रपुत्र ही संज्ञा या 'कुमार स्कंधा'लाही आली. पुढें 'रुद्र' व 'महादेव' एक अशी समजूत झाल्यावर अर्थात्च रुद्र-पुत्र कुमार-स्कंद हा महादेवाचा पुत्र झाला. परंतु मूळ अग्नीचा पुत्र हीच

कथा खरी. महाभारतांतील बरोबर पाहिली म्हणजे महादेवाचा व कार्तिकेयाचाच पितापुत्रसंबंध हा अगदीं खरा नव्हे. मूळचा अग्नि व कार्तिकेय यांचाच पितापुत्रसंबंध होय असें स्पष्ट दिसतें. परंतु हल्लीं कार्तिकेयाची उत्पात्ति-कथा जी प्रचलित आहे, ती हरपार्वती हीं त्याचीं मातापितरें होत अशा आशयाची आहे. या कथेचा उल्लेख प्रथम रामायणांत आला आहे. त्यांत गंगेचा संबंध आहे. महाभारत-कथेंत गंगेचा व कार्तिकेयाचा कांहीं संबंध नाहीं. परंतु रामायणांत गंगा ही त्याची रक्षयित्री आई म्हणून वर्णिली आहे. गंगेंतून निघाला स्कंद, कृत्तिकांनीं दुग्धपान करवून वाढविला म्हणून कार्तिकेय, अशी त्याच्या नांवांची मीमांसा आहे. याप्रमाणें कार्तिकस्वामीचें माहात्म्य आहे. अर्धवट वैदिक देवतेपासून संभव होत होत कार्तिकस्वामी हा अग्नि, महादेव, पार्वती, गंगा, कृत्तिका वगैरे अनेक देवतांनीं परिवर्धित असा निर्माण झाला. हा देवांचा सेनापति आणि सदा ब्रह्मचारीच राहिला.

## ३२

## शकुंतला व मिरांदा

कालिदासास हिंदुस्थानचा शेक्सपियर म्हणतात. त्याचें सर्वोत्कृष्ट नाटक अभिज्ञानशाकुंतल. हें कन्याकुमारीपासून तों कैलासापर्यंत व द्वारकेपासून पुरीपर्यंत आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस माहिती ! शेक्सपियरचीं नाटकेंही आतां जवळ जवळ तितकींच माहीत होऊं लागलीं आहेत ! 'टेंपेस्ट' ऊर्फ तुफान हें शेक्सपिअरच्या उत्तम नाटकांपैकीं एक. अभिज्ञानशाकुंतल नाटकाची नायिका शकुंतला, तशी तुफान नाटकाची नायिका मिरांदा. शकुंतलेची हकीकत आपणां सवास चांगली माहिती आहे, परंतु मिरांदेची तितकी माहिती नसेल, ती आधीं थोडक्यांत देतों म्हणज या दोन नायिकांची तुलना वाचकांस चांगल्या प्रकारें समजेल. एका राजाला मंत्रशास्त्राचा व योगाभ्यासाचा फार नाद होता. त्यांत तो निमग्न अस. यामुळें त्याच्या धाकट्या भावास राज्यतृष्णा उत्पन्न होऊन त्यानें आपल्या वडील भावास पकडून, बांधून व त्याच्या तान्ह्या मुलीस त्याच्याजवळ एका नावेंत बसवून समुद्राच्या मध्यभागीं एका बेटांत नेऊन सोडिलें आणि आपण राज्य करूं लागला. ज्या राजास याप्रमाणें समुद्रांत एका बेटांत सोडिलें त्याचें नांव प्रॉस्पेरो व त्याच्या मुलीच नांव मिरांदा. ही मिरांदा अगदीं तान्हेपणींच त्या बेटांत येऊन पडल्याकारणानें अर्थात्च तिला आपल्या बापाखेरीज दुसऱ्या कोणाही मनुष्यप्राण्याचें दर्शन सुद्धां नव्हतें. बाप आपल्या मंत्रबलानें कांहीं यक्षयक्षिणींस व शाकिनीडाकिनींस वश करून घेऊन त्यांच्याकडून आपलीं कामें करून घेई. तेवढेच कायते प्राणी या मुलीस माहिती. बाकी ती स्वगभुवनांतील सुकुमार लतेप्रमाणें वाढलेली. अशा स्थितींत त्या बापलेकींचीं बरींच वर्षें गेलीं. तेव्हां एके दिवशीं

किनाऱ्यापासून दूर समुद्रांत एक तारूं त्यांच्या दृष्टीस पडलें. तें पाहून प्रॉस्पेरोच्या मनांत कांहीं विचार आला व तो लागलीच त्यानें अमलांत आणिला. त्यानें आपल्याला वश असलेल्या पिशाच्यांस बोलावून तें तारू बुडविण्याचा हुकूम केला. मात्र त्यावरील एकाही व्यक्तीस कांहीं इजा होऊं देतां उपयोगी नाहीं अशी सक्त ताकीद दिली. त्या तारवावर त्याचा भाऊ व जुनी ओळखींची मंडळी होती. त्यांत फर्डिनंद नांवाचा एक तरुण पुरुषही होता. हा नेपल्सच्या राजाचा पुत्र होय. या राजपुत्राची व मिरांदेचा दृष्टादृष्ट झाल्याबरोबर दोघांच्याही मनांत प्रेम उत्पन्न झालें व पुढें सर्व मंडळींची ओळख पटून शेवटीं आनंदीआनंद झाला. हें संविधानक फारच थोडक्यांत दिलें आहे. परंतु तेवढ्यावरून पुढें जी तुलना केली आहे ती वाचकांस समजून येण्यास सोप जाईल.

शकुंतला व मिरांदा दोघीही ऋषिकन्या. प्रॉस्पेरो व विश्वामित्र दोघेही राजर्षि. त्याचप्रमाणें दोघींचेंही रक्षण अरण्यांत झालेलें. एकीचें रक्षण तिच्या बापानें केलेल, दुसरीचें दुसऱ्या एका ऋषीनें केलेलें. दोघीही वनलतेप्रमाणें वनांत वाढलेल्या परंतु उद्यानलतांपेक्षां फार सुन्दर; दोघीही अति सुन्दर, अति रमणीय; एकीला पाहिल्याबरोबर राजा दुष्यंतानें म्हटलेः— " आमच्या अंतःपुरांतून दुर्मिळ अस हें रूप या आश्रमांत वाढलेल्या मुलीला आहे, तेव्हां वनलतांनीं आपल्या गुणांनीं उद्यानलतांना फार माग सारलें असेंच म्हणावयाचें ! " नेपल्सचा राजपुत्र फर्डिनंद यानें मिरांदेस प्रथम पाहिलें, तेव्हां अशाच अर्थाचे उद्गार काढले ! ता म्हणालाः— " हे सुंदरी आजपर्यंत आमच्या नगरांतून व राजमहालांतून हजारों सुंदर स्त्रिया पाहिल्या. त्यांनीं माझी दृष्टी अगदीं मोहून टाकली. त्याचप्रमाणें त्यांच्या मधुर मधुर अशा आलापांनीं माझे कर्णही अगदीं मोहून टाकले; कोणत्या स्त्रींत कोणचा तर कोणचींत कोणचा असे अनेक गुण अनेकींच्या ठिकाणीं मला दिसले. परंतु तूं ! तूं तर अगदीं सर्वगुणसंपन्न आणि अनुपम. प्रत्येक प्राण्यांत जें काय उत्तम तें एकत्र करून तुला निर्माण केलें आहे ! "

दोघीही अरण्यांत वाढलेल्या, अर्थात् सरलतेचें जें काय अत्यंत उज्वल स्वरूप तें दोघींतही दिसत होतें. ज्या तरुण स्त्रिया नगरांत वगैरे वाढतात त्यांचीं मनें तितकीं शुद्ध व निर्विकार नसावयाचीं. आपण फार सुंदर आहों असें कोणीं म्हणावें, आपण कोणाचें तरी चित्त हरण करावें, अशी इच्छा करून त्यांचे हावभाव व नटणें-मुरडणें चाललेलें असतें. ज्याप्रमाणें चांदणें सुंदर खरें, परंतु ढगांनीं व्याप्त झालेल्या आकाशांत त्याच तेज कमी होतें, तसें सुंदर परंतु शहरांत वाढल्याकारणानें मनांत वरल्या प्रकारचे विचार येणाऱ्या सुंदर स्त्रियांचें माधुर्य कमी होतें. शकुंतला व मिरांदा दोघीही अत्यंत शुद्ध. त्यांच मन विकारहीन, त्या दोघींना जन काय म्हणेल याचे भय, किंवा जनानें असें म्हणावें अशी इच्छा हीं दोनही नव्हतीं. शकुंतला वल्कल नेसून हातांत एक लहानशी कळशी घेऊन आपल्या बापाच्या आश्रमांतील तरूंना पाणी घालून दिवस घालवी. तिला बहिणीप्रमाणें प्रेम करण्यास नव-मल्लिका ही वेल, भाऊ म्हणण्यास आम्रवृक्ष, मूल म्हणून प्रम करण्यास आईपासून वेगळ झालेलें हरिण-बालक. जेव्हां ती पतिगृहीं जाण्यास निघाली, तेव्हां या सर्वांचे आतां कसें होइल हें मनांत यऊन तिला रडूं आलं. जी काय निरवानिरव करावयाची ती यांची. शकुंतला जरी वनांत वाढलेली तरी अशिक्षित नव्हे. सुशिक्षित होती. तिला कांहीं कांहीं गोष्टी लाजण्याच्या असतात याचें ज्ञान झालें होतें. दुष्यंतास पाहिल्यावर तिच्या मनांत प्रेम उत्पन्न झालें. हें प्रेम आश्रमांत राहणारांच्या मनांत उद्भवूं नये अशा प्रकारचें आहे इतकें तिला समजलें. तिच्या फार प्रियकर अशा ज्या अनसूया व प्रियंवदा त्यांचेजवळ सांगण्याजोगें सुद्धां हें नव्हे असें तिला वाटलें, आणि त्यामुळें तिनें बराच वेळ तें लपविलें.

परंतु मिरांदा तशी नव्हे. मिरांदा अगदीं अनभिज्ञ. तिला आपल्या मनांत उद्भवलेलें प्रेम बाहेर व्यक्त करून दाखविण्याजोगें नव्हे हें मुळींच ठाऊक नाहीं. ती फार सरळ. तिला आपल्या बापाखेरीज कोणी मनुष्य-प्राणी कधींच दिसलेला नव्हे. यामुळें फर्डिनंद प्रथम तिच्या नजरेस

पडला तेव्हां तिला फारच आश्चर्य वाटलें. हा प्राणी तरी कोण? हेंच तिला समजेना. ती म्हणतेः— “वा! काय त्याची पाहण्याची ऐट! बाबा, त्याचा बांधा आणखी रूप हीं तर फार ऐटबाज! पण तें एक पिशाच्चच आहे वाटतं!”

शकुंतला अरण्यांत, परंतु माणसांच्या समाजांत वाढलेली; त्यामुळें कांहीं कांहीं संस्कार तिच्या मनावर झालेले होते. मिरांदाचे प्रकार अगदींच भिन्न! कण्वाच्या समोर तर राहूंच द्या, परंतु आपल्या सखीच्या जवळसुद्धां दुष्यंताचे नांव काढण्यास (मग स्वरूपवर्णन करण्याचें तर लांबच) तिला फार संकोच वाटे. एकादें सुंदर चित्र पाहिलें तर त्याचें वणन करण्यास जसा कोणास संकोच वाटण्याचें कारण नाहीं, तसेंच मिरांदेचें झालें. ती फर्डिनंदाला गंधर्व किंबहुना देवच समजूं लागली. कारण सृष्टींत त्याच्याइतकें सुंदर तिनें कांहींच पाहिलें नव्हतें! मिरांदेची मौज करण्याकरितां फर्डिनंदाला कांहीं अंगमेहनतीचें काम सांगितलें होतें. उचलण्याचें व रचण्याचें काम त्यास दिलें होतें. तें करीत असतांना फर्डिनंदास तिनें पाहिलें तेव्हां तिला त्याची फार कींव आली व त्यास असलीं कामें सांगूं नयेत म्हणून ती आपल्या बापाच्या विनवण्या करूं लागली. ‘याच्याहून सुरेख लोक जगांत पुष्कळ आहेत, तूं याच्यावर कां इतकें प्रेम करतेस’ असें तिच्या बापानें मुद्दाम म्हटलें. तेव्हां तिच्या मनांत एकनिष्ठपणाही जागृत झाला. जरी दुसरे पुरुष अधिक सुंदर वगैरे असले, तरी आपलें प्रेम यावर जडलें आहे, तर आपल्याला याच्याच ठिकाणीं प्रेम ठेवावयाचें असें तिनें आपल्या पित्यास सुचविलें. तेव्हां स्त्रियांना अगदीं स्वभावसिद्ध जी एकनिष्ठा ती तिच्या ठिकाणीं होती हें स्पष्ट दिसून येतें.

राजपुत्र फर्डिनंद याची व तिची प्रथम दृष्टादृष्ट झाली त्याचे आधीं तिचे हृदयांत प्रेम नव्हतें. कारण तिनें अगदीं तान्हेपणापासून आपला बाप व क्यालिबन नांवाचें एक भूत या दोघांखेरीज कोणीही पुरुष पाहिलेला नाहीं. शकुंतलेनें राजाला पाहिलें, त्यापूर्वीं तिच्याही मनांत प्रेमाचा संस्कार नव्हता. कारण तिलाही आपल्या पित्याखेरीज व ऋषिमंडळी-

खेरीज कोणी दिसलेलें नाहीं. एक प्रॉस्पेरोच्या तपोवनांत वाढलेली, दुसरी कण्वाच्या तपोवनांत. परंतु अनुरूप पति पाहतांच दोघींच्याही मनांत प्रेम उपजलें. अशा प्रकारें दोघींचें पुष्कळ साम्य आहे खरें, परंतु त्यांतल्या त्यांत जे बारीक परंतु मार्मिक भेद आहेत त्यामुळें दोघां कवींनीं असें कौशल्य दाखविलें आहे. कालिदास आणि शेक्सपियर या दोघांही कवींची बुद्धिमत्ता आणि प्रतिभा अगदीं एका योग्यतेची असें वाटण्याला कारणें आहेत. तीं अशा तुलनांच्या योगेंच नजरेस येतात. शेक्सपियरनें शकुंतला किंवा कालिदासानें टेंपेस्ट (तुफान) लिहिलें असतें तर जशा दोघी नायिका दाखविल्या असत्या, तशाच दोघांनीं निरनिराळीं नाटकें लिहून दाखविल्या आहेत. कारागीर शिल्पी एक परंतु प्रसंगानुसार जितका भेद अवश्य दाखवावयाचा तितकाच भेद ठेवून हीं चित्रें तयार केलीं आहेत, असें स्पष्ट दिसतें. शकुंतला अरण्यांत वाढलेली खरी, परंतु निमर्नुज अरण्यांत वाढलेली नव्हे; तिला समाजाचा—मनुष्यसंगतीचा संस्कार झालेला. अर्थात् त्या मानानें तिला कोणच्या गोष्टी स्पष्ट बोलावयाच्या कोणच्या नाहीं याचें ज्ञान झालेलें. तेव्हां तिनें आपलें प्रेम स्पष्टपणें बोलून दाखविलें नाहीं. हेंच कालिदासाच्या प्रतिभेचें उत्तम लक्षण होय. तिची प्रेमावस्था तिच्या रंगरूपावरूनच दुसऱ्याच्या लक्ष्यांत आली. परंतु मिरांदा अगदीं निर्जन अरण्यांत वाढलेली. तिला आपल्या मनोवृत्ति लपविल्या पाहिजेत ही कल्पनाही नाहीं. फर्डिनंदाबद्दल प्रेम उत्पन्न होतांच तिनें तें शब्दांनीं व्यक्त करून दाखविलें. शकुंतलेची प्रेमावस्था समजावून घेण्यास तिच्या सखींना—तिच्या बालमैत्रिणींनासुद्धां कितीतरी आयास पडले. परंतु मिरांदेचें मुळींच तसें झालें नाहीं. आपल्या मनांत फर्डिनंदबद्दल प्रेम उत्पन्न झालें आहे, तो आपल्यास आवडतो, तेव्हां त्यास तूं दुखवूं नको, त्याचा छळ करूं नको, असें तिनें बापास स्पष्टपणें सांगितलें; इतकेंच नव्हे, तर त्याच्या श्रमांत व दुःखांत आपण वांटेकरी होण्यास तयार आहों असेंही तिनें बोलून दाखविलें! फर्डिनंद हा आपण पाहिलेला तिसरा मनुष्य आणि ज्याच्याकरितां आपलें चित्त तळमळं लागलें आहे असा तोच पहिला असें ती स्पष्ट म्हणाली!

दुष्यंत व शकुंतला यांचा प्रथम भाषणप्रसंग झाला तेव्हां कुलीन स्त्रीला सर्वथैव योग्य अशी लज्जा शकुंतलेनें दाखविली आणि आपल्या मनांतले प्रेमविचार दाबून ठेवण्याचा यत्न केला; कारण कुलीनतेला कोणचें उचित आणि कोणचें नाहीं हें तिला ठाऊक होतें. यामुळें तिचें वर्तन तसें होतें. शकुंतलेस राजानें आपली पत्नी करण्याचें अभिवचन दिलें. शपथ वाहिली, तरीसुद्धां ती एकदम त्यास अनुकूल झाली नाहीं. मिरांदेचा प्रकार निराळा. तिन आपण होऊन फर्डिनंदास सांगितले कीं, " मी तुझ्याशीं विवाह करण्याचा निश्चय केला आहे. तू मला आपली अर्धांगी केलीस तर ठीकच, पण न केलीस तरी मी तुझ्या पायापाशीं दासी होऊन राहीन! तुझ्याखेरीज दुसरा पुरुष मी कल्पनेनें सुद्धां नेत्रांपुढें आणणार नाहीं." अशा प्रकारें आपलें मनोगत स्पष्टपणें सांगण्यास मिरांदा क्षणभरही कचरली नाहीं. एकच योग्यतेच्या कुल-कन्या, परंतु दोघी निरनिराळ्या अगदीं भिन्नतर नव्हे, परंतु थोडया भिन्न अशा परिस्थितींत वाढल्या असतां त्यांच्या चारित्र्यांत कसा भेद उत्पन्न होतो, हें दाखविण्याची कवींची कुशलता किती वर्णनीय, हें यावरून किती चांगल्या प्रकारें दिसून येतें!